म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. नं.



मराठी ग्रंथ संग्रहालय,
वाचनालय शाखा.

REFBK-0010236

विभाग
क्रमांक

सूचना—पुस्तक आठ दिवसांवर ठेवू नका.

१८२३६

म. ग्रं. सं. ठाणे.
क्रि. वा. नं. २९३

१

# नेताजींचें सीमोल्लंघन

[ नेताजी सुभाषचंद्र बोस ह्यांच्या देशत्यागाची रोमांचकारी कथा ]

म. ग्रं. सं. ठाणें.

: लेखक :

उत्तमचंद

अनुवादक

एस्. एम्. जोशी

REFBK-0019236

**भारती साहित्य संघ लिमिटेड**

भीमराज बिल्डिंग : काळबादेवी : नवी हनुमान गल्ली, मुंबई २

फर्नान्डिस् पुलाखालीं : गांधीरोड : अहमदाबाद

ही कथा गुजराती व मराठी भाषांमध्यें प्रसिद्ध करण्याचे सर्व
हक्क भारती साहित्य संघ लि. कडे आहेत.

किंमत
२-४-०

प्रकाशक :
ताराचंद माणेकचंद रवाणी
भारती साहित्य संघ लि.
गांधी रोड
अहमदाबाद

मुद्रक :
वि. पु. भागवत,
मौज प्रिंटिंग ब्यूरो,
खटाववाडी, गिरगांव,
मुंबई ४

# नवा उपक्रम

बरेच दिवसांची आमची इच्छा आज पूर्ण होत आहे. गेलीं अकरा वर्षें गुजरातमध्यें आम्ही लोकोपयोगी पुस्तकें प्रकाशित करण्याचें कार्य करीत आलों आहों. गुजराती व महाराष्ट्रीय जनता ह्यांचें जीवन आणि वाङ्मय ह्यांचा परिचय अल्पांशानें कां होईना, एकमेकांना करून दिला तर बरें, असे विचार मुंबईंत आल्यापासून अनेक वेळां आमच्या मनांत आले. आमच्या ह्या विचारांना मूर्त स्वरूप देण्याच्या हेतूनें श्री. सानेगुरुजींच्या वाङ्मयाचें गुजराती भाषांतर प्रसिद्ध करण्यास आम्ही सुरवात केली आहे. तसेंच गुजराती भाषेंतील उत्तमोत्तम पुस्तकांचें मराठी भाषांतर प्रसिद्ध करण्याचेंही आम्हीं निश्चित केलें आहे.

' नेताजींचें सीमोल्लंघन ' ह्या पुस्तकाचा सबंध देशभर फार मोठा परिणाम झाला आहे. निरनिराळ्या प्रांतिक भाषांमध्यें त्याचे अनुवाद झाले आहेत. ह्या पुस्तकानें आम्ही आमच्या नव्या उपक्रमाची सुरुवात करीत आहों.

ह्यानंतर मेजर जनरल शहानवाझ खान ह्यांनीं लिहिलेलें 'आझाद हिंद फौज आणि तिचे नेताजी ' हें पुस्तक आम्ही प्रसिद्ध करणार आहों. ह्या पुस्तकाविषयीं अधिक कांहीं लिहिण्याची जरुरी नाहीं. आझाद हिंद फौजेच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्यानें लिहिलेली आझाद हिंद फौजेविषयींची खरी माहिती आपल्याला ह्या पुस्तकाच्याद्वारें पहिल्यानेंच वाचावयास मिळणार आहे.

आम्ही ह्या नव्या उपक्रमांत आपल्या सहकार्याची अपेक्षा करीत असून आपण सर्व आम्हांला ह्या कामीं सहाय्य करावें अशी विनंती आहे.

जनलर मॅनेजर
**भारती साहित्य संघ लि.**
मुंबई नं. २

जिच्या सहाय्याविना बोसबाबूंना माझ्या
घरीं पंचेचाळीस दिवस अतिशय गुप्तपणें
ठेवण्याचें कठिण कार्य करणें मला
शक्य झालें नसतें ती माझी
सहधर्मचारिणी रामोदेवी
हिला अर्पण

# अनुक्रमणिका


| | विषय | | पृष्ठांक |
|---|---|---|---|
| १ | झियाउद्दीन पठाण व त्याचा दोस्त रहमतखान | ... | १ |
| २ | काबूलच्या सराईतील तेरा दिवस | ... | १७ |
| ३ | अफगाण गुप्त पोलिसांचा ससेमिरा | ... | २९ |
| ४ | कलकत्त्यापासून तों काबूलपर्यंतच्या प्रवासाचें दिव्य ... | ... ... | ३८ |
| ५ | इटालियन वकिलाकडून मदतीचें आश्वासन | | ५२ |
| ६ | शेजारी घाबरला ! | ... ... | ६३ |
| ७ | रशियाच सहाय्य करूं शकेल | ... | ७७ |
| ८ | रशियन सरहद्द ओलांडण्याचा प्रयत्न | ... | ९२ |
| ९. | इटालियन दूत निघाले ! | ... ... | १०३ |
| १० | मास्कोच्या वाटेवर | ... ... | ११६ |
| ११ | काबुलात शेवटची रात्र | ... ... | १२२ |
| १२ | बर्लिनला प्रयाण ... | ... ... | १२९ |

# निवेदन

नेताजी सुभाषचंद्र बोस काबूलच्या मार्गानें बर्लिनला गेले ही गोष्ट पुष्कळ लोकांना अगदीं नवीन वाटेल. काबूल येथें ते असतांना त्याचें आदरातिथ्य करण्याचें सद्भाग्य मला लाभलें होतें.

मी जवळ जवळ चार वर्षें तुरुंगांत होतों. ह्या काळांत पेशावर, लाहोर, डेरागाझीखान, रावळपिंडी ह्या निरनिराळ्या ठिकाणच्या तुरुंगांत माझी एकसारखी बदली करण्यांत आली.

माझ्या तुरुंगवासाच्या ह्या चार वर्षांच्या काळांत आणि विशेषें करून हिंदुस्थान सरकारच्या हुकुमावरून मला पंजाब प्रांतांत आणण्यांत आलें तेव्हां माझ्या कोणाही मित्राला माझी भेट घेणें ही गोष्ट अतिशय मुष्किलीची झाली होती. कैदी म्हणून मी पंजाबांत आलों ह्या गोष्टीचेंही त्यांना फार आश्चर्य वाटलें; कारण ज्या इसमाला स्वतःच्या प्रांतांतील तुरुंगांतून दुसऱ्या प्रांतांतील तुरुंगांत पाठविण्यांत येतें तो इसम सरकारच्या दृष्टीनें महा भयंकर प्राणी असतो हें त्यांना माहीत होतें. ह्यामुळें मीं आणि माझ्यानंतर दोनच दिवसांनीं ह्या प्रांतांत आलेला माझा मित्र अशा दोघांना ' महाभयंकर प्राणी ' समजण्यांत येत असे.

## मित्रांकडून आदरसत्कार

आम्ही महा भयंकर प्राणी आहोंत अशी त्यांची समजूत होण्यास आणखीही एक कारण होतें; आणि तें म्हणजे आम्ही

दरसाल कोट्यवधि रुपये पाण्यासारखे बिनहिशेबी खर्च करणाऱ्या हिंदुस्थान सरकारच्या गुप्त पोलिस खात्याच्या हातावर तुरी देऊन बंगालचे एक रहिवासी आणि एकदां कॉंग्रेसचे अध्यक्ष असलेले बाबू सुभाषचंद्र बोस ह्यांच्यासारखे महान् नेते अशा प्रकारें अदृश्य होऊन बर्लिनला जाऊन पोंचतात हें माझ्या मतें जगांतील आठवें आश्चर्य समजलें पाहिजे. ह्या बाबतींत बोसबाबूंनीं धाडसाची कमाल केली आणि त्याना काबूलपर्यंत पोचते करण्याची व्यवस्था करणाऱ्या त्यांच्या मित्रांनींही तितकीच कमाल केली ह्यांत कांहींही संशय नाहीं. ह्याबद्दल त्यांची जेवढी प्रशंसा करावी तेवढी थोडीच होईल.

## रावळपिंडी तुरुंगाचा जेल सुपरिंटेंडेंट

पेशावर, लाहोर आणि डेरागाझीखान येथील तुरुंगांत राहिल्यानंतर शेवटीं जेव्हां माझी रावळपिंडीच्या तुरुंगांत बदली करण्यांत आली तेव्हां तेथें दुसरा कोणीही राजकीय कैदी नव्हता. त्या तुरुंगांत मला एकट्यालाच चौदा नंबरच्या वॉर्डमध्यें ठेवण्यांत आलें. ह्या तुरुंगाचा जेल-सुपरिंटेंडेंट अतिशय कडवा अधिकारी होता आणि आपल्या मनास येईल ते हुकूम तो कैद्यांना फर्मावीत असे. अशा अधिकाऱ्याच्या हाताखालीं दिवस काढण्याचें माझ्या नशिबीं आलें होतें. पंजाब सरकारनें सिक्युरिटी कैद्यांच्या बाबतींत जे कायदे केलेले आहेत त्याप्रमाणें हे सुपरिंटेंडेंटसाहेब कधींच वागत नसत; कारण आपल्यापुरते ते स्वत:चेच कायदे तयार करीत असत.

## धैर्याची कसोटी पहाणारे प्रसंग

ह्यामुळेंच मी कोणत्याही प्रकारचा गुन्हा केलेला नसतां त्यांनीं मला एकांतवासाची शिक्षा दिली आणि अंधार कोठडींत डांबून ठेवलें. एक पहारेकरी सबंध दिवस माझ्या कोठडीवर पहारा करीत असे. मला कोणाचीही भेट घेण्याची सवलत मिळालेली नव्हती. ह्या ठिकाणीं मला जे अनुभव आले ते माझ्या धैर्याची कसोटी पहाणारे होते. परंतु ज्यानें लाहोरचा लाल किल्ला, पंजाबचें काळें पाणी, डेरागाझीखानचा तुरुंग आणि रावळपिंडी तुरुंगांतील चौदा नंबरचा वॉर्ड ह्यांमध्यें राहून अनुभव घेतलेला आहे त्याला हा अनुभव फारसा कठिण वाटणारा नव्हता. ह्या एकांतवासाच्या सुरुवातीच्या दिवसांत मी फार बेचैन झालों. पण थोड्या दिवसांपूर्वी माझ्या मनांत जो एक विचार आला होता तो ह्या कठिण परिस्थितींत पुन्हा जागृत झाला. बोसबाबू हिंदुस्थानांतून निसटून बर्लिनला कसे गेले ह्याची रोमांचकारी कथा लिहिण्याच्या कामीं ह्या एकांतवासांतील दिवसांचा उपयोग आपण कां करूं नये? असा विचार माझ्या मनांत आला.

मनांत हा विचार येण्याचाच अवकाश. मीं लगेच ती हकिकत लिहिण्यास सुरुवात केली. सबंध दिवस मी ह्याच कामांत गढून जात असें. बोसबाबू बर्लिनला कसे गेले ह्या विषयीं जे अनेक तर्क कुतर्क करण्यांत येत आहेत त्याविषयींची खरी हकिकत पुस्तकाच्या स्वरूपांत माझ्या हातून लिहून झाली

हा ह्या एकांतवासाचा उपयोग झाला. तुरुंगवासांतील माझे हे दिवस सर्वांत अधिक आनंदाचे गेले.

## क्षमस्व

जी हकिकत समजण्यासाठीं लोक आज अनेक दिवस आतुर झाले आहेत ती हकिकत जशी घडली तशा स्वरूपांत लोकांपुढें ठेवावी हा, ही हकिकत लिहून काढण्यांतील माझा हेतु होता. माझ्या स्मरणशक्तीचें सहाय्य मला झालें आणि ही सर्व हकिकत रोज आठवून आठवून मीं लिहिली. बोसबाबूंनीं संभाषणांत जे शब्द वापरले ते माझ्या स्मरणशक्तीप्रमाणें जसेच्या तसे लिहून काढण्याचा मीं प्रयत्न केला आहे. ह्या हकिकतीला चार वर्षें होऊन गेलीं तरीसुद्धां माझ्या स्मरणशक्तीला थोडा ताण देऊन सर्व हकिकत अगदीं तारीखवार देण्याचा मीं प्रयत्न केला आहे; परंतु त्यांतही कांहीं चुका झाल्या असण्याचा संभव आहे. खरें म्हटलें तर मी कांहीं लेखक नाहीं. म्हणून माझ्या हातून जर कांहीं चुका झाल्या असल्या तर त्यांबद्दल वाचकांनीं मला क्षमा करावी अशी माझी विनंती आहे.

मी स्वतः पेशावरचा रहाणारा असून माझा जन्म एका प्रतिष्ठित कुटुंबांत झालेला आहे. संपत्तीच्या विषम वांटणीबद्दल मला लहानपणापासून आश्चर्य वाटे आणि त्यामुळेंच ती गोष्ट मला आवडत नसे.

एका बाजूला, सबंध दिवस मरेमरेतों काम करूनही स्वतःचें आणि स्वतःच्या कुटुंबाचें पोषण करण्यास असमर्थ अललोस

गरीबवर्ग आणि तोंडांतून शब्द बाहेर पडतांच सर्व प्रकारचीं सुखें ज्यांच्यापुढें हात जोडून उभीं आहेत असा श्रीमंतांचा वर्ग मी दुसऱ्याबाजूला लहानपणापासून पहात आलों आहें. संपत्तीची वांटणी ज्याच्या त्याच्या नशिबाचा भाग आहे आणि ईश्वरानें आपल्या नशिबांत लिहिलें असेल तेवढेंच धन–त्यापेक्षां एक कपडी जास्त नाहीं–आपल्यास मिळतें असें समजणारे बरेच लोक आहेत. परंतु सर्व शक्तिमान परमेश्वर इतका अन्यायी असेल ह्यावर माझा मुळींच विश्वास बसत नाहीं.

## राजकीय जीवनाला सुरुवात

सुमारें १९२८–२९ मध्यें कॉंग्रेसनें पेशावर मध्यें आपली शाखा सुरू केली. ह्या शाखेच्या उद्घाटन समारंभांत मीं भाग घेतला होता. कॉंग्रेसचा जाहीरनामा जेव्हां मीं वाचला तेव्हां आपल्या दैन्यावस्थेचें मूळ कारण आपली गुलामी हें असून हिंदुस्थान स्वतंत्र झाला पाहिजे हें मला कळून आलें. ह्या गोष्टीचा माझ्या मनावर फार परिणाम झाला आणि मी लगेच कॉंग्रेसचा प्राथमिक सभासद झालों.

थोड्या दिवसांनीं पेशावर येथें 'नवजवान भारत सभा' नांवाची नवी संस्था अस्तित्वांत आली. सभेच्या जाहीरनाम्यांत असें स्पष्ट करण्यांत आलें होतें कीं संपत्तीची विषम वांटणी आपल्या समाजव्यवस्थेला अतिशय घातक आहे आणि ती बदलून परिस्थितीमध्यें सुधारणा करणें शक्य आहे. मीं 'सभे'च्या चिटणीसांची भेट घेतली आणि 'सभे'चा सभासद झाल्यावरही कॉंग्रेसचें सभासदत्व चालू ठेवतां येईल किंवा नाहीं

ह्याची चौकशी केली. त्यानें होकारार्थी उत्तर दिल्यामुळें मला फार आनंद झाला. लगेच, समाजवादी तत्त्वांवर चालणाऱ्या ह्या नवजवान सभेचा मी सभासद झालों. ह्यावेळीं माझें वय अठरा वर्षांचें होतें आणि मातृभूमीची सेवा करण्याची माझ्या मनांत तीव्र इच्छा होती.

## नवजवान सभेचा चिटणीस

१९३० मध्यें गांधीजींनीं असहकारितेची चळवळ सुरू केली तेव्हां माझ्या प्रांतांतील बऱ्याच प्रमुख पुढाऱ्यांना अटक झाली. नवजवान सभेचा एक चिटणीसही त्यांमध्यें होता. त्याला अटक झाल्यामुळें चिटणीसाची जागा स्वीकारण्यासाठीं मला बोलावण्यांत आलें. पुढाऱ्यांच्या धरपकडीमुळें जनता भयंकर प्रक्षुब्ध झाली. नंतर कांहीं दिवसांनीं आणखी दोनतीन कॉंग्रेस पुढाऱ्यांना अटक झाली. पोलिस त्यांना पोलिस चौकींत नेत असतां लोक जमा झाले आणि पुढाऱ्यांच्या मागून मिरवणुकीनें जाऊं लागले. पोलिसांनीं ह्या मिरवणुकीवर गोळीबार केला. ह्या गोळीबारामुळें कित्येक देशभक्त मरण पावले. अद्यापही दरवर्षी ह्या हुतात्म्यांच्या पुण्यस्मरणार्थ त्या ठिकाणीं स्मृतिदिन साजरा करण्यांत येतो.

## पहिला तुरुंगवास

ह्यानंतर आणखी कित्येक लोकांना अटक करण्यांत येऊन तुरुंगांत डांबण्यांत आलें. त्यांपैकीं मी एक होतों. कॉंग्रेस आणि 'नवजवान भारत सभा' बेकायदेशीर ठरविण्यांत येऊन दोन महिन्यांनीं आमच्यावर खटले भरण्यांत आले. ह्या खटल्यांचा निकाल लागून मला दोन वर्षें सक्तमजुरीची शिक्षा झाली.

अफगाणिस्तानबरोबर माझे व्यापारी संबंध होते. मला अटक होण्यापूर्वी अफगाणिस्तानांत जाण्याचा परवाना मीं मिळविला होता. तुरुंगांतून बाहेर आल्यावर कांहींही करून मी अफगाणिस्तानांत जाण्याचा परवाना पुन्हा मिळविला आणि काबूलला गेलों. तेथें सात महिने मी राहिलों आणि आमच्या दुकानाची एक शाखा काबूल येथें उघडण्याबाबत माझे काका आणि बंधु ह्यांच्याशीं विचारविनिमय करण्यासाठीं पेशावरला परत आलों. पुन्हा काबूल येथें जाण्यासाठीं परवाना मिळविण्यांत मला फार अडचणी आल्या. परंतु कसेंही करून मी परवाना मिळविला आणि तिकडे गेलों. काबूल येथें दुकान उघडण्यासाठीं अफगाण सरकारकडून परवाना मिळविण्याच्या बाबतींत १९४२ सालीं माझ्या काकांना पत्र आलें. हिंदुस्थानांतून नुकतेच आलेल्या लोकांना अफगाणिस्तानांत स्वतःच्या नांवानें धंदा करूं देण्यांत येत नसे. १९३८–३९ मध्यें पहिल्यानेंच, अफगाण सरकारनें हिंदी लोकांना अफगाणिस्तानांत धंदे सुरू करण्याची परवानगी दिली. तरीही तसें करतांना ज्या कांहीं थोड्या अटी घालण्यांत आल्या त्यासुद्धां इतक्या कडक होत्या कीं, तेथें जाऊन व्यापारधंदा करण्याचें धाडस नवीन व्यापाऱ्यांना होत नसे.

आमचा धंदा १९४२ सालपर्यंत चालू राहिला. ह्या काळांत मी अनेक वेळां पेशावरला जात असें आणि माझे काका किंवा बंधु काबूल येथें येऊन माझा धंदा संभाळीत असत. परंतु वास्तविक माझाच मुक्काम काबूलमध्यें जास्त असे. बोसबाबू १९४१ च्या जानेवारी महिन्यांत काबूल येथें आले. बर्लिनला

जाण्यापूर्वीचे पंचेचाळीस दिवस त्यांनीं तेथें कसे घालविले ह्याची माहिती ह्या पुस्तकांत देण्यांत आली आहे.

## धोक्याची सूचना

बोसबाबू बर्लिनला गेल्यानंतर जवळजवळ एक वर्षानें एक दिवस मी काबूलमध्यें वर्तमानपत्रें वाचीत बसलों होतों. ह्यापुढें ज्याच्या नांवाचा उल्लेख आला आहे तो बोसबाबूंचा सहकारीही त्यावेळीं माझ्याजवळ होता. आपल्या ओळखीच्या एका इसमास हिंदुस्थान सरकारनें अटक केल्याची लहानशी बातमी माझ्या वाचनांत आली. त्याला अटक होण्याचें कारण काय असावें ह्याची कल्पना आम्हांला त्यावेळीं आला नाहीं. परंतु ह्यापुढें मला कांहीं तरी धोका आहे एवढें मात्र मी समजून चुकलों.

## हद्दपारीचा हुकूम

१९४२ च्या मे महिन्याच्या २५ तारखेला अठ्ठेचाळीस तासांच्या आंत अफगाणिस्तान सोडून जाण्याचा अफगाण सरकारचा हुकूम असलेली नोटीस माझ्यावर बजावण्यांत आली. मी गेलीं बारा वर्षें काबूलमध्यें धंदा करीत असून दर वर्षी हजारों रुपये कराच्या रूपानें अफगाण सरकारला भरीत आहें अशी माझी बाजू मीं मांडली. तसेंच अठ्ठेचाळीस तासांच्या अल्पावधींत माझी मालमत्ता विकून टाकणें मला अशक्य आहे ह्या गोष्टीकडेही मी सरकारचें लक्ष वेधविलें. दुकानाची उधारीची वसुलीही एवढ्या थोड्या वेळांत होणें अशक्य आहे असेंही मी कळविलें. पण माझ्या ह्या विनंतीकडे कोणींही लक्ष दिलें नाहीं

आणि अठ्ठेचाळीस तासांची मुदत संपतांच मला अटक करण्यांत आली. माझ्या पायांत बेड्या घालण्यांत आल्या आणि ता. २७ मे रोजीं मध्यरात्रीं एका लॉरींत घालून मला जलालाबाद येथें नेण्यांत आलें. जलालाबाद येथें पोंचल्यावर दुसऱ्या दिवशीं सकाळीं मला एका लहान अंधारकोठडींत ठेवण्यांत आलें. ह्या अंधारकोठडींत मी दोन दिवस होतों; आणि त्या काळांत मला कांहींही खायला देण्यांत आलें नाहीं. ह्या खोलींत इतका काळोख होता, कीं दिवस आहे कीं रात्र आहे हेंही समजणें शक्य नव्हतें. दोन दिवसांनीं जेव्हां मला खोलीबाहेर काढण्यांत आलें तेव्हां मीं माझ्या कबरींतून बाहेर आलों आहे असें मला वाटलें.

## अफगाणिस्तानच्या सरहद्दीबाहेर

माझ्या घरांत आणि दुकानांत माझी जी मालमत्ता होती त्यापैकीं फक्त एक इराणी सतरंजी बरोबर घेण्याची परवानगी मला देण्यांत आली होती. परंतु ही सतरंजीसुद्धां मी पोलिस चौकीवर गेल्यावर माझ्या जवळून काढून घेण्यांत आली; आणि जलालाबादच्या पोलिसांनीं माझ्याजवळ असलेला पैसा-अडका घेऊन माझा भार हालका केला. नंतर जूनच्या १ तारखेला मला अफगाणिस्तानच्या सरहद्दीबाहेर काढून लावण्यांत आलें.

पुढें मी पेशावरला गेलों तेव्हां मला अटक करण्यांत येऊन चार महिने पोलिस कस्टडींत ठेवण्यांत आलें. ह्या चार महिन्यांत मला सात पोलिस चौक्यांमध्यें हिंडविण्यांत आलें. शेवटीं युद्ध संपेपर्यंत तुरुंगांत ठेवण्याचें ठरलें.

१९४३च्या सप्टेंबरपर्यंत मी वायव्य सरहद्दप्रांताच्या सरकारचा

कैदी होतों; पण त्यानंतर मला हिंदुस्थान सरकारच्या हवालीं करण्यांत आलें. हिंदुस्थान सरकारनें नंतर मला पंजाबसरकारच्या ताब्यांत दिलें. ह्या काळांत माझें तीस पौंडाहून अधिक वजन कमी झालें. लाहोरच्या मेयो हॉस्पिटलमध्यें माझ्या किडनीचें ऑपरेशन करण्यांत आलें. तुरुंगांत असतांना मला हा रोग झाला.

ह्यानंतर एकामागून एक सहा तुरुंगांत माझी बदली झाली.

## मालमत्तेचा लिलांव

डेरागाझीखान तुरुंगांत असतांना, काबूलमधील माझी मालमत्ता अफगाण सरकारनें लिलांवानें विकली असल्याचें हिंदुस्थान सरकारकडून मला कळविण्यांत आलें. माझी मालमत्ता एक लाख रुपयांहून अधिक किंमतीची होती पण ती दहा हजार रुपयांनाच विकून टाकण्यांत आल्याचें मला समजलें. अशा प्रकारें लिलांवानें विकण्यांत आलेल्या माझ्या मालमत्तेची यादी जेव्हां मीं पाहिली तेव्हां मी चकित झालों; कारण त्या यादींत माझ्या सुमारें अर्ध्या मालमत्तेचा उल्लेखही नव्हता. तसेंच काबूल येथें माझी जी उधारीची रक्कम वसूल व्हावयाची होती तिचाही उल्लेख ह्या यादींत नव्हता. आणि अफगाण सरकारनें लिलांव करून जी दहा हजार रुपयांची रक्कम मिळविली होती तीही मला अद्याप देण्यांत आलेली नाहीं.

१९४५ च्या मे महिन्यांत रावळपिंडीच्या तुरुंगांत असतांना बोसबाबूंच्या काबूलमधील वास्तव्यासंबंधींच्या माझ्या आठवणी मीं उर्दूमध्यें लिहून काढल्या होत्या. त्या आठवणींचा प्रास्ताविक भाग वरीलप्रमाणें आहे. ह्या आठवणी ज्या वेळीं मीं लिहिल्या

त्यावेळीं त्या प्रसिद्ध करण्याचा माझा हेतु नव्हता; पण तुरुंगांतून सुटका झाल्यावर ‘ हिंदुस्थान टाइम्स ’च्या पेशावर येथील बातमीदारानें त्या प्रसिद्ध करण्यास मला उत्तेजन दिलें आणि त्यामुळचें नवी दिल्ली येथील ‘हिंदुस्थान टाइम्स ’मध्यें त्या प्रकरणा प्रकरणांनीं प्रसिद्ध होऊं लागल्या नवी दिल्ली येथील ‘ हिंदुस्थान टाइम्स ’ व ‘ हिंदुस्थान, ’ अलाहाबाद येथील ‘ लीडर ’ आणि ‘ भारत ’ तसेंच पाटणा येथील ‘ सर्च लाइट ’ ह्या पत्रांमध्येंच हीं प्रकरणें प्रसिद्ध करण्याचा मूळचा हेतु होता. परंतु तीं आपापल्या पत्रांत पुनर्मुद्रित करण्याची अनेक वृत्तपत्रांकडून परवानगी मागण्यांत येऊं लागली आणि कांहीं वृत्तपत्रांनीं तर परवानगी न घेतांच तीं प्रकरणें प्रसिद्ध करण्यास सुरुवात केली. ह्यामुळें ठराविक रक्कम घेऊन हीं प्रकरणें प्रसिद्ध करण्याची परवानगी सर्व वृत्तपत्रांना द्यावी आणि त्या रकमेंतील अर्धी मला व बाकीची अर्धी रक्कम आझाद हिंद फौज सहाय्यकनिधीला द्यावी ही ‘ हिंदुस्थान टाइम्स ’च्या संपादकांची सूचना मीं मान्य केली. मात्र हीं प्रकरणें पुस्तकेरूपानें प्रसिद्ध करण्याचा हक्क संपूर्णपणें माझ्याकडे ठेवण्यांत आला होता. आतां हीं प्रकरणें पुस्तकरूपानें हिंदुस्थानांतील बहुतेक सर्व भाषांतून प्रसिद्ध करण्यांत येत आहेत.

## आभार प्रदर्शन

शेवटीं, ही लेखमाला वृत्तपत्रांत प्रसिद्ध करण्यास आणि नंतर पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यास मला प्रोत्साहन दिल्याबद्दल हिंदुस्तान टाइम्सचे मॅनेजिंग एडिटर श्री. देवदास गांधी ह्यांचे मला आभार मानले पाहिजेत. ह्या आठवणींचे लेख तयार करून त्यांच्यावरून

शेवटचा हात फिरविण्याच्या कामीं हिंदुस्तान टाइम्स व हिंदुस्तान ह्या वृत्तपत्रांच्या संपादक वर्गातील अनेकांनीं परिश्रमपूर्वक मला जी मदत केली त्याबद्दल त्यांचा मी ऋणी आहें.

ह्या कथानकाशीं संबंध असलेल्या इसमांची परवानगी घेणें शक्य नसल्यामुळें मीं त्यांचा टोपण नांवांनीं उल्लेख केला आहे. त्या सर्वांनीं जीं बहादुरीचीं कामें केलीं त्यांचें मूल्यमापन मी कसें करूं शकेन ? मला त्यांनीं क्षमा करावी.

एका गोष्टीचा खुलासा करणें भाग आहे. हें पुस्तक मीं अमूक एका व्यक्तीला किंवा पक्षाला दुखवावें म्हणून लिहिलेलें नाहीं. कित्येक प्रकारचे गैरसमज़ फैलावत होते ते बंद व्हावे हा हें पुस्तक लिहिण्यांतील हेतु आहे. एवढें स्पष्ट केल्यावरही जर कोणाचें अंतःकरण दुखावलें असेल तर त्यानें मला क्षमा करावी.

ह्यानंतर आणखी अनेक घटना घडल्या.

नेताजी बोसबाबू काबूलमधून गेल्यानंतर सुमारें पंधरा महिन्यांनीं मला अटक झाली. ह्या दरम्यानच्या काळांत कितीतरी गोष्टी घडल्या. राजकीय दृष्ट्याही त्या बऱ्याच महत्त्वाच्या आहेत. आपलें राष्ट्र आज एका नवीन युगांत प्रवेश करीत आहे. अशा वेळीं ह्या गोष्टींना फार महत्त्व आहे. संधी मिळाली तर ह्या बाकीच्या रोमांचकारी घटना जनताजनार्दनापुढें ठेवण्याचा माझा हेतु आहे.

तूर्ततरी, जय हिंद !

सिक्युरिटी कैदी
सेंट्रल जेल,
रावळपिंडी
७–५–४५

**उत्तमचंद मिलोतरा**

म. ग्रं. सं. ठाणें.

दा. क्र. १९२३६



# झियाउद्दीन पठाण
व
# त्याचा दोस्त रहमतखान

सन १९४१ च्या फेब्रुवारी महिन्यांतली गोष्ट. प्रातःकालचा समय होता. काबूल शहरांत थंडी कडाक्याची पडली होती. आकाशांतून हिम पडत होतें. जणुं पिंजलेल्या कापसाच्या तंतूंची बरसातच होत आहे. डोंगर, घराचीं छपरें, रस्ते सर्व कांहीं हिमानें आच्छादून टाकलें होतें. कुठेहीं नजर टाकली तरी पांढऱ्या शुभ्र बर्फाच्या चकाकीनें डोळे दिपून जात होते. थंडीच्या त्या कडाक्यांत घराबाहेर पडण्यास कोणी धजावत नव्हता. रहदारी जवळजवळ थांबल्यासारखीच दिसत होती. बाजारांत सर्वत्र अगदीं सामसूम होतें.

मी आपल्या दुकानांत बसून हिमतंतूंची गंमत पहात होतों इतक्यांत हिंदुस्तान ट्रेड एजन्सीच्या शिपायानें हिंदी वृत्तपत्रांचें एक पुडकें आणून दिलें. वर्तमानपत्रें पाहिलीं म्हणजे मला नेहमींच फार आनंद होतो. वर्तमानपत्रांचें मला जणुं व्यसनच आहे. त्यांतच सुभाषबाबू एकाएकीं बेपत्ता झाल्याचें रहस्यमय वृत्त आल्यापासून देशाकडच्या बातमीसाठीं माझें मन जास्तच अधीर झालें होतें. त्याच दिवशीं सकाळीं दिल्ली रेडियोवरून असें सांगण्यांत आलें कीं सुभाषबाबूंना साधूच्या वेषामध्यें हरिद्वारला पकडण्यांत आलें आहे; पण लगेच दुपारीं ती बातमी खोटी असल्याचें जाहीर करण्यांत आलें. पकडलेला साधू सुभाषबाबू नसून दुसराच कोणीतरी असल्याचें आढळून आलें होतें. वर्तमानपत्रांतील बातम्यांवर मीं एक धावती नजर टाकली; आणि एके ठिकाणीं सरदार शार्दूलसिंग कवीश्वर यांचें एक पत्रक पाहून मी थांबलों.

" सुभाषबाबू अदृश्य होण्याआधीं कांहीं दिवस त्यांची आणि माझी भेट झाली तेव्हां संन्यास घेण्याचे विचार त्यांच्या मनांत घोळत होते. मला वाटतें कीं साधू बनून ते दक्षिण हिंदुस्तानांत कोठें तरी गेले असावेत " असें शार्दूलसिंगानीं वार्ताहराला सांगितलें होतें.

माझा स्वताचा कयास मात्र निराळा होता. जपानी लोकांच्याबरोबर संधान बांधून ते जपानमध्यें पसार झाले असावेत अशी माझी कल्पना होती.

वर्तमानपत्रें चाळीत मी बसलों होतों. इतक्यांत एका अनोळखी गृहस्थानें दुकानांत प्रवेश करून " अस्सलाम्

अलेकुम् " म्हणून मला अभिवादन केलें आणि पुश्तु भाषेंत माझ्याशीं बोलण्यास सुरवात केली. त्या गृहस्थाचा पोषाख सरहद्दीवरील टोळीवाल्याचा होता. पेशावरी सलवार, खाकी शर्ट, त्यावर लोकर कायम असलेल्या कातड्याचें जर्सीवजा जाकीट आणि त्या दोहोंवर पठाणी पद्धतीचें कातड्याचें जाकीट घालून त्याचीं बटनें लावलेलीं होतीं. डोक्याला पठाणी पद्धतीचा साफा, पायांत लोकरीचे पायमोजे आणि पेशावरी वहाणा होत्या.

" माझ्याशीं तुझें काय काम आहे ? " मीं त्या अनोळखी पठाणाला विचारलें.

" तुमचें नांव उत्तमचंद ना ? " त्यानें विचकत प्रश्न केला.

मी आश्चर्यचकित झालों.

" होय. माझें नांव उत्तमचंदच आहे " मी उत्तर दिलें.

माझें उत्तर ऐकून पठाणाच्या चेहेऱ्यावर हास्यरेषा उमटलेल्या मीं पाहिल्या.

" मी तुला कोणत्याप्रकारें मदत करूं शकतों ? " मीं पुन्हा एक वेळ त्याला विचारलें. माझ्या प्रश्नाचें उत्तर देण्याऐवजीं त्यानें सभोंवार एक नजर टाकली. आमचें संभाषण कोणी ऐकत आहे कीं काय हें तो पहात असावासें दिसलें. माझ्या दुकानांत काम करणारा पंधरा वर्षांचा एक नोकर होता. त्याचें नांव अमरनाथ होतें. मी त्याला पाहुण्यासाठीं एक खुर्ची घेऊन येण्यास सांगितलें. पठाण खुर्चीवर बसला पण तो पुढें कांहींच बोलेना.

थोडा वेळ कोणीच काहीं बोललें नाहीं. ती शांतता तापदायक होती. शेवटीं मीच त्या पाहुण्याला म्हणालों, "तुला जें काय बोलायचें असेल तें निःसंकोचपणें बोल. तूं बोलत कां नाहींस ? कांहीं काम असल्याशिवाय निश्चितच तूं माझ्याकडे आलेला नाहींस ?"

पुनः एकवार त्यानें दुकानांत सर्व बाजूला पाहिलें आणि अखेरीस आपली दृष्टि अमरनाथवर स्थिर केली.

अमरनाथची त्याला अडचण वाटत असावी ही गोष्ट तात्काळ माझ्या लक्षांत आली. मीं त्याला पाहुण्यासाठीं चहा आणण्याकरतां दुकानाबाहेर रवाना केला.

अमरनाथ बाहेर गेल्याचें पाहून त्या गृहस्थाचा चेहेरा खुलला आणि तो म्हणाला, "मी हिंदी मनुष्य आहें. कांहीं राजकीय कामगिरीनिमित्त येथें आलों आहें. पण थोडी भानगड उपस्थित झाल्यामुळें तुमची मदत मागण्यासाठीं तुमच्याकडे आलों आहें."

"पण तुम्ही कोण आहां ? तुमचें नांव काय ? माझें नांव तुम्हांला कसें माहीत झालें ? तुमची कामगिरी कोणती आणि तुम्हीं कोणत्या संकटांत आहां तें कांहीं सांगाल कीं नाहीं ?" मी म्हणालों.

"मी मर्दान जिल्ह्यांतील घलादहर गांवचा रहिवासी आहें. माझें नांव भगतराम. पंजाब गव्हर्नराला गोळी घालण्याचा प्रयत्न एका तरुणानें केला होता ती घटना

तुम्हांला आठवते का ? तो तरुण माझा भाऊच " पाहुण्यानें आपला परिचय करून दिला.

त्याचें नांव गांव ऐकतांच मी उठून उभा राहिलों आणि त्याला आलिंगन दिलें. माझ्या चुलत्याची सासुरवाडी त्याच गांवांत होती. इतकेंच काय, पण माझी चुलती देखील दुसरी तिसरी कोणी नसून भगतरामाच्या शेजाऱ्याचीच मुलगी असल्याचें मागाहून माझ्या दृष्टोत्पत्तीस आलें. या तिऱ्हाइताला माझें नांव कसें ठाऊक ? या कोड्याचा आतां उलगडा झाला. नवजवान भारत सभेचा सर चिटणीस म्हणून १९३० सालीं मला अटक झाली होती तें त्याच्या लक्षांत होतें. कारण तोही मर्दान जिल्हा नवजवान भारत सभेचा एक महत्त्वाचा सभासद होताच. माझ्या काकांचें काबूल मुक्कामीं एक दुकान असून मी त्याच दुकानांत काम करतों हें आमच्या गांवच्या सर्व लोकांना ठाऊक होतें. भगतराम माझ्या काकांना ओळखीत होता; काबूलच्या प्रवासाला निघण्याआधीं घलादहर येथें त्यांना पाहिलें असल्याचें त्यानें मला सांगितलें.

"बरें तर आतां तुमची राजकीय कामगिरी कोणती आणि त्यामध्यें मी तुमच्या कसा उपयोगी पडूं तें सांगा" मी म्हणालों.

" माझें काम हें असें आहे : मी सुभाषचंद्र बोस यांना घेऊन येथें आलों आहें आणि त्यांना गुप्तपणें सरहद्दीपलीकडे काढून रशियांत पोचवायचें आहे. आतां...." असें म्हणून तो थांबला.

त्याच्या तोंडचे ते शब्द ऐकून माझी बोबडीच वळली. "सुभाषबाबू आणि इथें' असे उद्गार एकाएकीं माझ्या तोंडून बाहेर पडले. माझ्या हृदयाची धडधड मला चांगली ऐकूं येत होती. तेवढ्यांतच दुकानावर एक गिऱ्हाईक आलें. त्यानें कांहीं तरी जिन्नस मागितला. क्षणभर देखील विचार न करतां मीं त्याला नाहीं म्हणून सांगितलें आणि वाटेला लावला. शेवटीं कसें तरी मीं स्वताला सांवरलें आणि पाहुण्याला म्हणालों, "मग पुढें ?"

"सध्यां आम्ही एका सराईंत उतरलों आहों. पण एक काबुली इसम आमच्या मागावर आहे." भगतराम म्हणाला, "मला अशी शंका वाटते की तो अफगाण गुप्त पोलिसांपैकीं असावा. त्यानें आम्हांला नकोसें करून सोडलें आहे. या प्रसंगांतून मार्ग काढण्यास तुमची मदत मिळाली तर पहा म्हणून बोस बाबूंनीं मला तुमच्याकडे पाठविलें आहे."

एवढ्या अवकाशांत अमरनाथ चहा घेऊन आला. आम्ही पुश्तू ऐवजीं उर्दूमध्यें बोलण्यास सुरवात केली. अमरनाथला उर्दू समजत नव्हतें.

"बोसबाबूंनीं तुम्हांला माझ्याकडे पाठवलें असें म्हणतां पण ते तर मला ओळखीतही नाहींत. मी येथें आहे हें तुम्हांला कसें कळलें ?" मीं विचारलें.

"तुम्ही नवजवान भारत सभेचें काम करीत होतां तेव्हांपासून तुमचें नांव माझ्या परिचयाचें आहे. मी देखील त्यावेळीं मर्दान जिल्हा सभेचा सदस्य होतों. कामा-

निमित्त पेशावर सभेच्या कचेरींत दोन तीन वेळ आलों असतांना मीं तुम्हांला तेथें पाहिलें होतें. १९३० सालच्या चळवळींत तुम्हांला दोन वर्षें सक्त मजुरीची शिक्षा झाली होती तें माझ्या चांगलें लक्षांत आहे. तुम्ही सध्यां येथें आहांत ही गोष्ट मला तुमच्या चुलत्याकडून समजली. त्यांचें काबूल शहरांत एक दुकान असून तें तुम्ही चालवितां हें गांवांतल्या सर्व लोकांना ठाऊक आहे. तुम्हा दोघां भावांना मीं अनेक वेळ पाहिलेलें आहे. तुम्हा दोघांच्या चेहेऱ्यांमध्यें इतकें साम्य आहे कीं माझा तर पुष्कळ वेळां गोंधळ झाला आहे. तशी फसगत होऊं नये म्हणून खात्री करून घेण्यासाठीं मीं मुद्दाम तुमचें नांव विचारलें. कांहीं दिवसांपूर्वी तुमच्याबद्दल मी सुभाषबाबूंपाशीं बोललों होतों. "

" तुमच्या संभाषणांत माझ्या नांवाचा उल्लेख कसा काय आला ? " मीं कुतूहलानें विचारलें.

" खास तुमच्याचसंबंधीं असं कांहीं नव्हतें. पण येथें आल्यावर आम्ही अशा कांहीं बिकट परिस्थितींत सापडलों आहों कीं सर्व संभाव्य अडचणींचा विचार करून त्यांतून मार्ग काढणें आम्हांला भाग आहे. साहजिकच तुमची मला आठवण झाली. मीं सुभाषबाबूंना सांगितलें कीं मायदेशाबद्दल तळमळ बाळगणारा माझ्या माहितीचा एक गृहस्थ या शहरांत आहे. त्याचें येथें दुकान आहे. १९३० सालच्या चळवळींत त्याला कारावास भोगावा लागला होता. सुभाषबाबूंनीं त्याच दिवशीं तुमचा पत्ता काढण्यास मला सांगितलें. पण मी आलों नाहीं. आज मात्र

सरतेशेवटीं आमच्या दुर्भाग्यामुळें मला तुमच्याकडे धांव घेणें भागच पडलें. गेले पांच दिवस त्या गुप्त पोलिसाचा ससेमिरा आमच्या मागें लागलेला आहे. त्याला पाहिल्याबरोबर पहिल्याच दिवशीं सुभाषबाबूंना त्याच्याबद्दल जबरदस्त शंका आली; आणि मीं लगेच्या लगेच तुमची गांठ घ्यावी अशी त्यांची इच्छा होती.

"तुम्हांला येथें येऊन आतां बरेच दिवस झाले. तुमच्या कार्यांत तुम्हांला आतांपर्यंत कितपत यश मिळालें तें मला सांगण्यास तुमची कांहीं हरकत आहे काय?" मीं विचारलें.

"तुम्हांला सांगायला माझी मुळींच हरकत नाहीं." भगतराम म्हणाला, "आज फेब्रुवारी महिन्याची तीन तारीख आहे नाहीं का? आम्हांला येथें येऊन आज बरोबर तेरा दिवस झाले. लाहोरी दरवाजाजवळील एका सराईत आम्हीं एक खोली घेतली आहे. ही सराई म्हणजे एक भयंकर घाणेरडी जागा आहे. व्यापारासाठीं या शहरांत येणाऱ्या उंटहाक्यांचा आणि खेचरवाल्यांचा तो एक अड्डा आहे. येथें आल्यापासून रशियन वकिलाशीं संबंध जोडण्याचा आम्ही सारखा प्रयत्न करीत आहों. पण कोणाही अनोळखी माणसाला रशियन वकिलातींत प्रवेश मिळणें शक्य नसल्या-मुळें आतांपर्यंत आमचे सर्व प्रयत्न निष्फळ ठरले. एक दिवस रशियन निशाण लावलेली एक मोटार जातांना मीं पाहिली. परदेशी वकिलांनाच फक्त आपल्या मोटारीवर आपल्या देशाचें निशाण लावण्याची परवानगी असते असें मीं ऐकलें होतें. त्यावरून ती गाडी रशियन

वकिलाचीच असली पाहिजे असें मीं अनुमान केलें आणि तिला थांबवण्यासाठीं खूण केली. गाडी थांबली. गाडी हाकणाऱ्या शोफरखेरीज मागच्या सीटवर दुसरा एक मनुष्य बसलेला होता. माझ्या मोडक्या तोडक्या पर्शियन भाषेंत अडखळत अडखळत मीं सुभाषबाबूंबद्दल त्याला माहिती सांगितली. 'ते सुभाषबाबूच आहेत हें मीं कसें समजावें ?' त्यानें पर्शीयनमध्यें मला प्रश्न केला. पर्शीयन भाषा थोडी फार समजत असल्यामुळें मला त्याचा प्रश्न समजला. तो प्रश्न ऐकून आमच्या सर्व आशा धुळीस मिळाल्या. आम्हांला सुभाषबाबूंची ओळख पटवितां आली नाहीं. आम्ही गप्प उभे राहिलेले पाहून त्यानें मोटार पुढें काढली."

पर्शियन भाषा चांगल्या प्रकारें अवगत नसल्यामुळें व रशियन वकिलातीशीं संबंध जोडण्यास उपयोगी पडतील अशीं परिचयपत्रें बरोबर आणलेलीं नसल्यानें आपल्या कामाबद्दल रशियन वकिलाच्या मनांत त्यांना आस्था उत्पन्न करतां आली नाहीं असें मीं सुचविलें, तेव्हां भगतराम म्हणाला, "तसेंही असेल."

सुभाषबाबूंना काबूलला पाठविण्याची योजना करणारांनीं अशा मनुष्याला त्यांच्या बरोबर द्यावें याचें मला मोठें आश्चर्य वाटलें. या माणसाला तर त्या कामाचा ओनामा देखील माहीत नव्हता. पर्शियन आणि रशियन भाषेवर प्रभुत्व असणाऱ्या माणसाची या कामीं योजना व्हावयास पाहिजे होती. तें शक्यच नसेल तर निदान रशियन वकिलातीशीं

ज्याचा संबंध आहे असा एखादा मनुष्य त्यांच्या बरोबर द्यावयास पाहिजे होता.

" रशियन वकिलाशीं संधान बांधणें अशक्य आहे असें पाहून आम्ही इटालियन वकिलाशीं संबंध जोडण्याच्या प्रयत्नास लागलों." आपली हकिकत पुढें सुरू करीत भगतराम म्हणाला, " त्यामध्यें मात्र मला यश आलें. तें कसें जमलें ही एक मोठी हकिकत आहे. पुढें केव्हां तरी ती तुम्हांला समजेलच. तूर्त एवढेंच सांगतों कीं त्यामध्यें आम्हांला विशेष अडचणी आल्या नाहींत. इटालियन वकिलानें आमची काळजी दूर केली. 'शक्य होईल तितक्या लवकर आम्ही सुभाषबाबूंना बर्लिनला अगर रोमला पाठविण्याची व्यवस्था करूं' असें त्यानें आश्वासन दिलें."

" अच्छा. आतां माझ्याकडून तुम्हांला कोणती मदत पाहिजे तें सांगा पाहूं." मी म्हणालों.

"सुरक्षितपणें रहातां येईल अशी जागा प्रथम आम्हांला मिळवून द्या; आणि मग रशियन वकिलातींत तुमची ओळख असेल तर सुभाषबाबूंना मास्कोला पाठविण्याची व्यवस्था करतां आली तर पहा. कारण गट्टी राष्ट्रांबरोबर आम्हीं संबंध जोडले असले तरी बर्लिनला अगर रोमला जाण्याची कल्पना सुभाषबाबूंना रुचत नाहीं." पाहुणा म्हणाला.

"रहाण्याच्याबद्दल म्हणाल तर तुम्ही माझ्या घरीं येऊन राहूं शकतां." मी म्हणालों, "परंतु माझें घर पूर्णपणें सुरक्षित आहे असें मला वाटत नाहीं. कारण मी ज्या घरांत रहातों

तेथें आणखीही एका गृहस्थाचें बिऱ्हाड आहे. ते तळ मजल्यांवर राहतात आणि आम्ही माडीवर असतों."

माझा शेजारी पेशावरकडील होता. तो काबूलमध्यें कापडाचा व्यापार करीत असे. शिवाय माझें घर हिंदु गुझरीमध्यें होतें. आधींच घाणेरड्या त्या शहरामध्यें हिंदु लोक रहातात ती जागा सर्वांत अधिक घाणेरडी आहे. या कारणास्तवही सुभाषबाबूंनीं आपल्या घरीं रहावयास यावें ही कल्पना मला पसंत नाहीं असें मीं त्याला सांगितलें.

माझें बोलणें ऐकून भगतराम हसला. "असल्या संकटप्रसंगीं घाणीबिणीची कोण पर्वा करतो ? तुमच्या शेजाऱ्याबद्दल मात्र विचार करायला हवा" तो म्हणाला.

याखेरीज दुसरीही एक योजना माझ्या मनांत घोळत होती. आमच्या घराशेजारींच माझा एक मुसलमान मित्र रहात असे. त्याचें घर सोयिस्कर होतें. तोही आमच्याच प्रांतांतला होता. तरुणपणीं तो सैन्यांत शिरला पण वरच्या ब्रिटिश अधिकाऱ्यांशीं त्याचें भांडण होऊन वयाच्या एकोणिसाव्या वर्षींच त्यानें फौजेंतील नोकरी सोडून दिली. तेव्हांपासून त्यानें आपल्या आयुष्यांतील कित्येक वर्षें चीन, जपान, अमेरिका, जर्मनी इत्यादि परदेशांत घालवलीं होतीं. त्यानें लग्नही एका जर्मन बाईबरोबर केलें होतें. आतां त्याचें वय सत्तराच्या घरांत होतें. त्याचा ब्रिटिशद्वेष जाज्वल्य होता. मक्केची यात्रा करून आल्यामुळें आम्ही त्याला हाजीसाहेब म्हणत असूं. पायमोजे वगैरे विणून तो आपला

चरितार्थ चालवीत असे. त्यासाठीं लागणारें एक यंत्रही त्यानें आपल्या घरांतच आणून बसविलें होतें. सुभाषबाबू बेपत्ता झाल्याचें वृत्त आल्यापासून अनेक वेळ तो त्याबाबत माझ्याशीं बोलत असे. " सुभाषबाबू म्हणजे हिंदुस्तानचा सिंह आहे " असें मोठ्या अभिमानानें तो म्हणत असे.

या मित्राला सुभाषबाबूंना ठेवून घेतोस का म्हणून विचारायला काय हरकत आहे ? माझ्या मनांत विचार आला. मीं भगतरामाला त्याचा सल्ला विचारला.

दगाफटका होणार नाहीं अशी खात्री असेल तर विचारायला हरकत नाहीं असा त्याचा अभिप्राय पडला.

" पण त्यानें नाहीं म्हटलें तर पुढें काय ?" भगतरामानें विचारलें.

" तो नाहीं म्हणणार नाहीं याबद्दल माझी खात्री आहे. आणि यदाकदाचित् तसें झालेंच तर माझें घर आहेच. माझ्या घरीं तुम्हीं केव्हांही येऊन राहूं शकतां. सुभाषबाबूंना रहाण्यालायक माझें घर नाहीं म्हणून माझें मन कचरतें इतकेंच. "

" त्याची नको तुम्हांला काळजी " तो म्हणाला, " त्या गलिच्छ सराईत एक वेळ राहिल्यावर ते आतां कोठेंही राहूं शकतील. आतां फार उशीर झाला. मला परत जाऊन सुभाषबाबूंच्याकडे पाहिलें पाहिजे. बरें मग आतां काय ठरलें ? आज रात्रीं त्या सराईत रहाणें धोक्याचें आहे असें माझें मन मला सांगत आहे. "

अधिक विचार करण्यास सवड नसल्यामुळें चार वाजतां सुभाषबाबूंना घेऊन आमच्याचकडे यायला मीं त्याला सांगितलें. "तोंपर्यंत मी हाजीला विचारून ठेवतों. त्यानें कबूल केलें तर ठीकच. मग मी सुभाषबाबूंना त्यांच्याकडे घेऊन जाईन. नाहींतर माझें घर कोठें गेलें नाहीं" मी म्हणालों.

तो गृहस्थ जाण्यासाठीं उठला तेव्हां, पठाणी वेषाप्रमाणें त्यानें पठाणाचें नांवही घेतलें आहे कीं काय म्हणून मी कुतूहलानें विचारलें.

"अर्थातच !" तो म्हणाला, "नांवाशिवाय माझें कसें चालेल ? मी रहमतखान असून बोसबाबूंचें नांव झियाउद्दीन असें आहे. ठीक आहे तर. मी चार वाजतां त्यांना घेऊन येतों."

तो निघून गेल्यावर मात्र माझ्या मनांत एक प्रकारची भीति उत्पन्न झाली.

मी विचार करूं लागलों. ब्रिटिशांचे गुप्तहेर सुभाषबाबूंच्या मागावर असणार. त्याच्या शोधार्थ ब्रिटिश सरकार सर्व रान पालथें घालील. हिंदुस्तानच्या सरहद्दीवर असलेल्या देशांत तर त्यांचा कसून शोध होत असेल. हाजीसाहेब नाहीं म्हणाला तर ? मी त्यांना आपल्या घरांत आणून ठेवणार आहें. माझ्याच घरांत ते पकडले गेले तर काय परिणाम भोगावे लागतील ? माझ्याबरोबर माझ्या पत्नीलाही अटक झाली तर माझ्या मुलांचें या अडाणी मुलुखांत कसें होईल ? अफगाणिस्तानांत रहाणारे हिंदी लोक इतके दडपले गेले

आहेत कीं माझ्या मुलांना आश्रय देण्यास ते घाबरतील. पण मानसिक कमकुवतपणाची ही लाट लवकरच ओसरली. दुकानांतून उठून मी हाजीसाहेबांकडे गेलों. ते घरीं नव्हते पण परत येत असतांना ते रस्त्यांत मला भेटले. आमचें बोलणें ऐकूं जाईल एवढ्या अंतरावर कोणी मनुष्य नाहीं असें पाहून मीं विषय काढला. "हिंदुस्तानांतून कांहीं माणसें राजकीय कामगिरीनिमित्त येथें आलीं असून त्यांना तुमचा आश्रय पाहिजे आहे" मी म्हणालों.

हाजीसाहेब हसले आणि म्हणाले, "तुम्ही फारच साधेभोळे आहांत. तुमच्याजवळ छक्केपंजे कांहींच नाहींत. या गोष्टींचें महत्त्व तुम्हांला समजत नाहीं. युरोपांत असतांना मी कितीतरी हिंदी लोकांना त्यांच्या राजकीय कामांत मदत केली. त्यांतून निष्पन्न तर कांहींच झालें नाहीं उलट मलाच त्रास सोसावा लागला. आतां प्रत्यक्ष ईश्वर जरी माझ्या घरांत आश्रय मागायला आला तरी मी त्या गोष्टीला कबूल होणार नाहीं. हिंदी लोक विश्वासार्ह नसतात असा माझा अनुभव आहे. शिवाय माझें आतां वयही झालें आहे. आतां राजकीय कारस्थानांत स्वताला गोंवून घेण्याची माझी इच्छा नाहीं."

त्यांचें हें उत्तर ऐकून माझें मन दुखावल्यासारखें झालें. मीं म्हटलें, हा मनुष्य आतांपर्यंत स्वातंत्र्याच्या लांब लांब बाता मारीत होता पण आज प्रत्यक्ष कसोटीची वेळ आली तर पहिल्या सलामींतच चीत झाला.

माझ्या मित्रांबद्दल त्यांनीं अविश्वास दाखविला म्हणून मीं आपली नापसंती व्यक्त केली. तेव्हां माझी समजूत घालण्याच्या उद्देशानें ते म्हणाले, "असा नाराज होऊं नकोस. असले धंदे करतां करतां माझे काळ्याचे पांढरे झाले आहेत. कित्येकांनीं मला तोंडघशी पाडलें आहे. तरीपण तुझ्याकडे आलेला मनुष्य सच्चा देखील असेल कदाचित्. अच्छा, मला त्याचें नांव तर कळूं दे."

"तुम्ही मदत करणार नसाल तर त्याचें नांव विचारण्यांत काय अर्थ आहे?" मी म्हणालों.

"तसें नाहीं. तो जर खरोखरच हिंदुस्थानांतील एकादा विश्वासार्ह थोर पुढारी असेल तर मी त्याला आश्रय देईनही."

"ओळखा पाहूं कोण असेल तो" मी म्हणालों.

"सुभाषबाबूंना तर तूं निश्चितच येथें उभे करूं शकत नाहींस. कीं करशील?" त्यांनीं विचारलें.

"तर मग ते सुभाषबाबूच आहेत" मी विजयाविर्भावानें म्हणालों.

हाजीसाहेब स्तंभित झाले. "बोस? बोस?" ते साशंकतेनें ओरडले. त्यांना विश्वास पटत नव्हता.

"आतां काय म्हणणें आहे तुमचें?" मीं विचारलें.

"मी त्यांना ठेवून घ्यायला तयार आहें. माझ्या घरांतील कोणत्या खोलींत ठेवूं तें सांग. तूं माझें घर पाहिलें आहेसच.

मशीनरूमच्या शेजारची खोली मीं सुचविली.

हाजीसाहेबांच्या मनाची चलबिचल झाल्यासारखी दिसली.

" माझें घर म्हणजे एक कारखाना आहे हें तुला ठाऊक आहे ना ? तेथें आठ कामगार तर रोज कामावर येतातच पण शिवाय माझी जर्मन बायको पडदा ठेवीत नसल्यामुळें कित्येक ग्राहक देखील तडक माझ्या घरांत येत असतात. अशा परिस्थितींत मीं त्यांना आपल्या घरीं ठेवावें असें तुला वाटतें काय ? तुझें घरच त्यांच्यासाठीं सर्वांत अधिक सुरक्षित आहे " ते म्हणाले.

माझें घर अस्वच्छ असल्याचें त्यांच्या निदर्शनास आणून मी म्हणालों, " पण ज्या अर्थीं तुम्हीं नकार दिला आहे त्या अर्थीं त्यांना माझ्या घरांत आणण्याशिवाय मला दुसरा मार्गच नाहीं. " मीं त्याचा निरोप घेतला आणि आपल्या दुकानीं परत आलों.

# २

# काबूलच्या सराईंतील तेरा दिवस

रहमतखान परत आला तेव्हां चार वाजायला दहा मिनिटें कमी होतीं. तो एकटाच आला आहे असें पाहून, सुभाषबाबू कोठें आहेत म्हणून मीं विचारलें.

" ते नदीच्या पलीकडल्या तीरावर आहेत " असें तो म्हणाला. ( काबूल नदी माझ्या दुकानासमोरूनच वहात जाते. ) नदीच्या पैलतीरावर त्यानें बोट दाखविलें. पण मला सुभाषबाबू दिसले नाहींत.

" कुठें आहेत ते ? " निरखून पहात मीं विचारलें.

" ते काय तिथें. तुम्हांला दिसत नाहींत ? " पठाणाप्रमाणें दिसणाऱ्या एका मनुष्याकडे बोट दाखवीत तो

म्हणाला, " तुम्ही त्यांना ओळखूं शकणार नाहीं. त्यांचा पोषाख आणि चेहेरा फार बदलून टाकलेला आहे."

आज रात्रीं दोन पाहुणे आपल्या घरीं जेवायला येणार आहेत असा निरोप देऊन मीं अमरनाथला घरीं पाठवलें आणि दुकान बंद करून रहमतखानाबरोबर बाहेर पडलों. माझ्या दुकानापासून एक फर्लांगाच्या अंतरावर एक पूल होता. त्या ठिकाणीं बोसबाबूंनीं आम्हांला भेटायचें असें ठरलें होतें. ठरल्यावेळेपूर्वींच आम्ही पुलावर येऊन पोचलों; आणि सुभाषबाबू अद्याप आलेले नाहींत असें पाहून ते ज्या बाजूनं येणार होते त्या दिशेनें चालूं लागलों. काबूल शहरांतील ऑफिसें बंद होण्याची ती वेळ असल्यामुळें पुलावर खूप गर्दी होती. आम्ही थोडेंसें अंतर चालून गेलों नाहीं तोंच रहमतखान म्हणाला, " हं, आले बरं का ते."

सूभाषबाबू थेट एकाद्या पठाणासारखे दिसत होते. मळलेली एक सलवार आणि तितकाच घाणेरडा एक शर्ट त्यांनीं घातला होता. दोन दोन फुटांचा बर्फाचा थर असलेल्या रस्त्यावरून चालल्यामुळें त्यांचे पायमोजे भिजून चिंब झाले होते. डोळ्यांना नेहमींचा चष्मा नव्हता आणि दाढी तीन इंच वाढलेली होती. खांद्यावर एक उपवस्त्र असून साफ्याचा एक सोगा खांद्यावरून पुढें सोडलेला आणि दुसरा मागल्या बाजूला होता.

खरोखर हे सुभाषबाबूच का? म्हणून मी आश्चर्य करीत होतों इतक्यांत रहमतखानानें माझ्या खांद्यावर हात ठेवून

मला हालविलें आणि म्हणाला, "चला चला, विचार काय करीत बसलाय् ?"

थोडेंसें पुढें गेल्यावर मी रहमतखानाला म्हणालों, "तुमचे माझ्याबरोबर चालणें ठीक नाहीं. उगीच संशयाला जागा होईल. तुम्ही माझ्यामागून कांहीं पावलांच्या अंतरावर चाला आणि सुभाषबाबू तुमच्या मागें असूं द्यात."

पुलापासून माझें घर अदमासें एक मैलाच्या अंतरावर होतें. रस्त्यांत खांचा खळगे पुष्कळ होते. बर्फ पडल्यामुळें ते दिसत नव्हते. सुभाषबाबू तर कित्येक वेळीं अडखळून पडण्याच्या बेतांत होते.

बाजाररस्त्यांतून आम्ही सुरक्षितपणें सटकलों. आतां आमच्या वस्तींतला एक बोळ तेवढाच उरला होता. घरांतून सर्व बर्फ झाडून लोकांनीं बोळामध्यें त्याचे ढीग घातले होते. त्यामुळें रस्त्यांतून चालणें अवघड झालें होतें. आम्हां तिघां-खेरीज बोळांत दुसरें कोणीच नाहीं असें पाहून मी सुभाष-बाबूंच्या जवळून चालूं लागलों. रस्त्यांत खड्ड असल्यामुळें त्यांना संभाळून नेणें आवश्यक होतें तरी देखील एक वेळ त्यांचा पाय एका खड्डयांत पडलाच. ते पडलेच असते पण मीं कसेंबसें त्यांना सावरलें. नेमका त्याच वेळीं आमचा एक शेजारी जवळून गेला. बोसबाबूंना पाहून तो म्हणाला, "कोठून आला आहे बिचारा कांहीं समजत नाहीं." आणि मग सुभाषबाबूंकडे वळून त्यानें विचारलें, "काय भाईजी, कोणत्या धर्मशाळेंत जायचें आहे आपल्याला ?"

"करायचेंय् काय आपल्याला? त्याला जिथें जायचें असेल तिथें जाईल" मी मध्येंच तोंड घातलें, "कोणाला माहित कोण आहे तो?" असें म्हणून मी माझ्या काबुली शेजाऱ्याबरोबर पुढें सटकलों.

पुढच्या वळणावर बुटाचे बंद बांधण्याचें सोंग करून मी मागें राहिलों आणि त्या काबुली गृहस्थाला पुढें जाऊं दिलें. तेवढ्या वेळांत रहमतखान आणि बोसबाबूंनीं मागून येऊन मला गांठलें. सरतेशेवटीं आमचें घर एकदाचें आलें. आम्हांला घरांत शिरतांना कोणीं पाहिलें नाहीं. कडक थंडीमुळें दरवाजे लावून सर्व लोक घरांत शेगडीपाशीं शेकत बसले होते.

हिमवृष्टि जोराची होत होती म्हणून मीं एक शेगडी पेटवून त्यांच्यापाशीं ठेवली आणि चहा मागवला. स्नान वगैरे करणार काय म्हणून मीं विचारलें तेव्हां ते हसले आणि म्हणाले, "आज नको. पण उद्यां मात्र स्नानासाठीं मला गरम पाणी पाहिजे. अफगाणिस्तानच्या हद्दींत पाय ठेवल्यापासून मीं अद्याप स्नान केलेलें नाहीं."

त्यांनीं आपले ओले पायमोजे काढले. त्यांचे पाय थंडीनें बधिर झाले होते. त्यांची सलवारही भिजली होती. मीं त्यांच्यासाठीं एक सलवार आणि शर्ट आणवला. काबूलमध्यें आल्यावर आज प्रथम त्यांनीं आपला चष्मा घातला. आतां मात्र मीं त्यांना चांगल्या प्रकारें ओळखलें.

कपांत चहा ओतण्याआधीं माझ्याकडे ज्या गैरसोयी त्यांना भोगाव्या लागतील त्याबद्दल मीं त्यांची क्षमा मागितली.

"भलतेंच कांहीं तरी काय बोलतां ?" त्यांनीं मला मोडून काढलें. "माझ्या संकट काळांत तुम्हीं माझ्यासाठीं जें केलें आहे तें मी कधींही विसरणें शक्य नाहीं. येथें मला अगदीं घरच्यासारखें वाटतें आहे" ते म्हणाले.

चहाचा कार्यक्रम संपल्यावर सराईतील त्यांच्या सामानाबाबत मीं रहमतखानाला विचारलें.

"तसें फारसें नाहीं. तरीपण हमाल करावाच लागेल" तो म्हणाला.

"कूली घेऊन येथें येणें देखील धोक्याचेंच आहे. न जाणों माझ्या मागोमाग तो हरामखोर गुप्त पोलीस देखील यायचा."

"त्याची व्यवस्था करतां येईल" मीं म्हणालों, "तूं अमरनाथाला आपल्या बरोबर घे. गुप्त पोलिसानें अमरनाथला पाहिलें नाहीं म्हणजे झालें. तूं प्रथम सराईत जा आणि मागाहून हमालाबरोबर अमरनाथला येऊं दे. तूं आपल्या खोलीच्या दरवाजासमोर उभा रहा म्हणजे कोणत्या खोलींत यायचें तें त्याला समजेल. सामानसुमान त्याच्या स्वाधीन कर. तें घेऊन तो हमालाबरोबर बाहेर पडेल; आणि मग खाणावळवाल्याचें बिल चुकतें करून तूंही त्याच्या मागोमाग निघून ये."

"ही योजना ठीक आहे" सुभाषबाबू म्हणाले, "पण तुझ्या मागोमाग कोणी येत नाहीं याबद्दल खबरदारी घे.

कोणी येतेंय् असें वाटलें तर उगीच इकडे तिकडे भटकन्ती करून त्याला चुकव आणि मगच परत ये."

अमरनाथला बोलावून मीं त्याला सर्व गोष्टी समजावून सांगितल्या आणि रहमतखानाबरोबर पाठवून दिलें.

तो गेल्यावर जेवणाची काय व्यवस्था आहे तें पहाण्या-साठीं मीं स्वयंपाकघरांत आपल्या पत्नीकडे गेलों.

"हे कोण पाहुणे आणले आहेत ?" तिनें साशंकपणें विचारलें.

"ते लाघमानहून आले आहेत" मीं उत्तर दिलें. लाघमान हें जलालाबाद जिल्ह्यांतील एक खेडें आहे. माझे कांहीं नातेवाईक तेथें रहात असल्याचें माझ्या बायकोला ठाऊक होतें. म्हणून ही थाप खपून जाईल अशी माझी कल्पना होती.

"लाघमानची मंडळी माझ्या ओळखीची आहेत; आणि यांना पेशावरमध्यें कधीं पाहिल्याचें तर मला आठवत नाहीं." तिनें माझी उलटतपासणी सुरू केली.

"तूं त्यांना पेशावरमध्यें कोठून पहाशील ? एकदांच केव्हां तरी ते पेशावरला आले होते. त्यावेळीं देखील मीं त्यांना जेवायला बोलावलें होतें पण कांहीं कारणामुळें ते येऊं शकले नाहींत." मीं सारवासारव केली.

"मग आतां बरे आले ? तें कांहीं नाहीं, ते कोण आहेत

तें मला सांगा. तुम्ही माझ्यापासून कांहीं तरी लपवून ठेवीत आहां." तिनें आपला पट्टा चालू ठेवला.

"म्हणजे मी खोटं बोलतों आहें असें का म्हणायचेंय् तुला?" मीं विचारलें.

"चक्क मुसलमानाला तुम्ही हिंदु म्हणून घरांत आणतां आणि खोटं आहे का म्हणून विचारतां तेंव्हां आतां काय म्हणायचं?"

"वेड लागलेंय् तुला" मी म्हणालों.

"ठीक आहे तर! तुम्हांला हवें तसें करा. अमरनाथनें मला या पाहुण्यांबद्दल सांगितलें तेंव्हांच यांत कांहीं तरी काळें बेरें आहे अशी मला शंका आली."

अमरनाथकडून कांहीं तरी कळल्यामुळें तिला संशय आला आहे हें माझ्या लक्षांत आलें.

"अमरनाथनें तुला काय सांगितलें?" मीं विचारलें.

"मला सगळें कांहीं समजलें आहे. तो बिनदाढीचा मनुष्य प्रथम तुमच्याकडे आला. त्यानें मुसलमानी पद्धतीनें सलाम केला, तुम्ही त्याच्याशीं पुश्तूमध्यें बोललांत आणि अमरनाथला मुस्लिम चहा आणायला सांगितलेंत. मग तो हिंदुस्तानीमध्यें बोलूं लागला. खोटें आहे का हें सगळें?" तिनें मला आव्हानच दिलें.

मीं असा विचार केला होता, कीं सुभाषबाबू थोडेच

दिवस आपल्याकडे रहाणार तेव्हां उगाच त्यांच्या नांवाचा गौप्यस्फोट कशाला करा. अशा बाबतींत गुप्तता राखणेंच इष्ट. पण आतां माझ्या बायकोला विश्वासांत घेण्याशिवाय दुसरा इलाजच नव्हता.

अखेरीस हें प्रकरण काय आहे तें सांगण्याचें मीं तिला वचन दिलें आणि सुभाषबाबूंकडे आलों.

त्यावेळीं मी एकटाच सुभाषबाबूंच्या जवळ होतों. त्यांना सतावून सोडणाऱ्या त्या गुप्त पोलिसाला त्यांचा संशय कसा आला तें मीं विचारलें.

ते म्हणाले, " आज फेब्रुवारीची तिसरी तारीख आहे. आम्हांला येथें येऊन आतां तेरा दिवस झाले. कारण मी पेशावर जानेवारीच्या एकोणीस तारखेला सोडलें आणि येथं यायला तीन दिवस लागले. आम्ही येथें आलों तेव्हां सारखी हिमवृष्टि होत होती आणि कडाक्याची थंडी होती. मी तर या शहरांत अगदीं नवखाच होतों पण रहमतखानची स्थिति देखील माझ्याहून निराळी नव्हती. पोलिसांना चकविण्यासाठीं मोटारलॉरीवाले उतारूंना खालीं उतरायला सांगतात ती जागा तुम्हांला ठाऊक असेलच. तेथें एक जकात नाकें देखील असावेंसें दिसतें. कारण कोणींतरी एकानें येऊन लॉरींतील आमच्या सामानसुमानाची तपासणी केली आणि एका कागदावर सही करून दिली तें मीं पाहिलें. "

"तो लाहोरी दरवाजा असेल. दरवाजापुढें भलें मोठें मैदान आहे तीच जागा ना ?" मीं विचारलें.

"हां, बरोबर आहे तुमचा तर्क. लाहोरी दरवाजाच तो. बर्फ पडत असल्यामुळें त्यावेळीं तेथें मेणा अगर पालखी देखील नव्हती. आणि असती तरी आम्हांला काय तिचा उपयोग होता म्हणा! कारण जायचें कुठें तें देखील आम्हांला ठाऊक नव्हतें. आधींच आमचे हाल चालले होते आणि त्यांत बर्फ आणि चिखलाची भर पडली. अखेरीस कांहीं अंतरावरून माणसें जात असलेलीं आमच्या दृष्टीस पडलीं. आम्हीही त्याच दिशेनें त्यांच्या मागोमाग वाट चालूं लागलों. थोड्या वेळानें एक बाजार लागला. येथें रहाण्या-जेवण्याची कोठें व्यवस्था होऊं शकेल का म्हणून रहमत-खानानें एका माणसाजवळ चौकशी केली. एका खाणावळीकडे बोट दाखवून तो गृहस्थ म्हणाला, 'त्या सराईत' तुम्हीं जा. प्रवासी लोकांना रहाण्यासाठीं तेथें भाड्यानें खोल्या मिळतात. तुम्हांला एकादी खोली निश्चितच मिळूं शकेल.'

"आम्ही त्या सराईत गेलों. आंगणांत बरेचसे उंट आणि घोडे जमिनींत मारलेल्या मेखांना बांधलेले होते आणि व्हरांड्यांत कांहीं गाड्या सोडलेल्या होत्या. मनुष्यांना रहाण्याच्या लायकीची ती जागा नव्हती. त्या माणसानें आम्हांला बनवलें तर नाहीं ? अशी मला शंका आली.

आम्ही आंत गेलों आणि आजूबाजूला पाहिलें पण रिकामी खोली अशी आम्हांला आढळली नाहीं. इतक्यांत

एक मनुष्य सराईत येतांना दिसला. रहमतखानानें त्याच्या जवळ खाणावळीच्या मालकाबद्दल चौकशी केली. तो मनुष्य उद्धट होता. कांहीं उत्तर न देतांच तो निघून गेला. मागाहून आम्हांला कळलें कीं त्याला पुश्तू भाषा येत नव्हती. आमची अशी कल्पना होती कीं अफगाण लोकांची मातृभाषा पुश्तू आहे पण येथें आल्यावर माझ्या लक्षांत आलें कीं फारसी हीच त्यांची मातृभाषा आहे. येथें फारच थोड्या लोकांना पुश्तू येतें; आणि रहमतखानला तर पुश्तूखेरीज दुसरी कोणतीच भाषा अवगत नाहीं. अशा प्रकारें आमच्या मार्गांत भाषेची ही नवीनच एक अडचण उपस्थित झाली.

"कांहीं मिनिटांनंतर दुसऱ्या मजल्यावरील एका खोलींतून एक मनुष्य बाहेर आलेला आम्हीं पाहिला. त्याच्यापाशीं रहमतखानानें खाणावळवाल्याबद्दल चौकशी केली. सराईच्या मुख्य फाटकापाशीं असलेल्या एका लहानशा खोलीकडे बोट दाखवून तो म्हणाला, 'सराईचा रखवालदार त्या ठिकाणीं रहातो त्याच्याकडे जा.' आम्ही त्या खोलीवर गेलों तेव्हां तेथें एक मनुष्य गोधडी लपेटून पडलेला दिसला. त्याचा तोंडवळा एकाद्या गुरखा अगर चिनीमाणसासारखा मोंगोलियन पद्धतीचा होता."

सुभाषबाबूंनीं केलेल्या वर्णनावरून मीं ओळखलें कीं तो मनुष्य अफगाणिस्तानांतील हजारा जातीपैकीं असावा. ते लोक ज्या भागांत रहातात तेथें वर्षाचे बाराही महिने बर्फ पडत असतें. ते लोक अफगाणिस्तानांतील अत्यंत

निर्धन असून त्यांचे अवयव मोंगोलियन जातीप्रमाणें असतात.

सुभाषबाबू पुढें म्हणाले, " रखवालदारानें पुश्तू भाषेंत आम्हांला काय पाहिजे म्हणून विचारलें. आम्ही प्रवासी असून आम्हांला एक रात्र सराईत रहावयाचें आहे असें रहमतखानानें त्याला सांगितलें. 'तुमच्याकडे जागा असल्यास आम्हांला द्या. तुमचें जें कांहीं भाडें असेल तें द्यावयास आम्ही तयार आहों' रहमतखान म्हणाला.

"रखवालदाराला पुश्तू येत होतें ही ईश्वराची कृपाच म्हणायाची आमच्यावर. नाहीं तर दुभाषा कोठून आणायचा हा प्रश्न पडला असता. त्यानें आम्हांला माडीवर नेलें आणि एक खुराडेवजा खोली आम्हांला दाखविली. भाडें रोजीं एक अफगाण रुपया पडेल म्हणून त्यानें सांगितलें. तुरुंगांत फांशीची शिक्षा झालेल्या कैद्यांच्यासाठीं ज्या खोल्या असतात त्या देखील यापेक्षां कितीतरी चांगल्या असतात. दरवाजा लावून घेतला तर बाहेर दिवस आहे कीं रात्र तेंही ओळखतां येणार नाहीं.

"पण त्यावेळीं ती गलिच्छ खोली देखील आम्हांला पसंत करणें भाग होतें. आमच्या पायांत आतां बिलकूल त्राण उरलेला नव्हता. थंडी फार असल्यामुळें जमिनीवर पडणें अशक्य होतें. दोन बिस्तरे मिळतील का म्हणून विचार असें मीं रहमतखानला सांगितलें. रखवालदारानें दोन बिस्तरे आम्हांला

मिळवून दिले. तो बेहद्द खूष होता. कारण वास्तविक खोलीचें भाडें अर्धा रुपयाच होतें आणि आम्ही रुपया देण्याचें कबूल केलें.

“जरा वेळानें रहमतखानानें कांहीं लाकडें मिळविलीं. पण तीं ओलीं ढोण होतीं. कांहीं केल्या पेटेनात. खोलींत धूरच-धूर मात्र झाला. बाहेर सोसाट्याचा गार वारा वहात होता. दरवाजा उघडा ठेवणें शक्यच नव्हतें. पण बंद करूं म्हटलें तर धुरानें जीव गुदमरून जाई. अखेरीस थोडींशीं कोरडीं लाकडें मिळालीं आणि आमच्या गारठलेल्या शरीरांना थोडीशी ऊब देतां आली.

“सायंकाळीं रहमतखान बाहेर गेला आणि खाण्यासाठीं कोरडी रोटी व कांहीं कबाब आणि उजेडासाठीं मेणबत्या घेऊन आला. मला ती रोटी जात नाहीं असें पाहून त्यानें माझ्यासाठीं एक कप चहा आणला. चहांत रोटी बुडवून मीं ती कशीबशी खाल्ली. त्या रात्रीं आम्हांला झोप चांगली मिळाली. पण दुसऱ्या दिवशीं सकाळीं जाग आली तेव्हां अंग ठणकत असून शरीर आखडल्यासारखें झाल्याचें कळून आलें. सकाळचा नाश्ता करून रहमतखान बाजारांत गेला आणि दोन कातड्याचीं जाकिटें, एक किटली आणि दोन लहान सतरंज्या इतकें सामान घेऊन आला.”

## ३

## अफगाण

# गुप्त पोलिसांचा ससेमिरा

त्या अफगाण गुप्त पोलिसानें दिलेल्या त्रासाचें वर्णन करतांना सुभाषबाबू म्हणाले:—

" आज त्या गोष्टीला सहा दिवस झाले. रहमतखान आमच्या साठीं बाहेरून रोटी घेऊन आला व म्हणाला, 'रोटीवाल्याच्या दुकानांत सफेत कपडे घातलेला एक मनुष्य नेहमीं बसलेला असतो. आज तो माझ्याकडे फारच निरखून पहात होता. तो अफगाण सी. आय. डी. असावा अशी मला शंका येते.'

" मला यावर विचार करायला थोडासा देखील वेळ मिळाला नाहीं. आमचें जेवण पुरें होतें तोंच तो पोलीस आमच्या दरवाजांत येऊन उभा राहिला.

" तुम्ही कोण आहांत ? काय कामानिमित्त येथें आलां आहांत ?" पोलिसी रुबाबांत त्यानें पुश्तूमध्यें विचारलें.

" आम्ही सरहद्दीवरचे प्रवासी आहोंत" रहमतखानानें जबाब दिला, " हा ( माझ्याकडे बोट दाखवून ) माझा भाऊ असून बहिरा आणि मुका आहे. बिचारा नेहमीं आजारी असतो म्हणून साखीसाहेबाच्या यात्रेला घेऊन आलों आहें त्याला. साखीसाहेबाचा रस्ता बर्फ पडल्यामुळें बंद आहे म्हणून आम्हीं येथें मुक्काम केला आहे. रस्ता पुन्हा चालू झाला म्हणजे आम्ही येथून निघूं.

" मला नाहीं हें खरें वाटत." तो म्हणाला, " तुम्ही आपले माझ्याबरोबर कोतवालीवर चला आणि तेथें सांगा काय सांगायचें तें."

हें लक्षण कांहीं ठीक नव्हतें. मोठी आफतच होती ती.

" उगीच गरीब प्रवाशांना कशाला तकलीफ देतां ? माझ्या भावाला तर थंडीमुळें चालवतही नाहीं." रहमतखान अजिजीनें म्हणाला. पण तेवढ्यानें तो वळेलसें दिसेना. शेवटीं उसनें अवसान आणून रहमतखान म्हणाला, " बरें तर चल. मी तुझ्याबरोबर कोतवालीवर येतों माझा भाऊ मात्र येणार नाहीं. तो आजारी आहे."

रहमतखानाचा हा नवा पवित्रा पाहून तो किंचित नरमला आणि म्हणाला, " तुझा भाऊ आजारी नसता तर निश्चितच तुम्हा दोघांना मीं ठाण्यावर नेलें असतें. पण तो आजारी आहे आणि तुम्ही गरीब यात्रेकरू प्रवासी आहांत म्हणून मी तुमची गय करतों. मात्र येथून शक्य तितक्या लवकर तुम्हीं निघून गेलें पाहिजे. "

" रस्ता चालू होईल तर आज देखील जाण्याची आमची तयारी आहे." रहमतखानानें जबाब दिला.

" बरं तर खान, आतां तुम्ही विश्रांति घ्या. थंडी फार पडली आहे. मला चहापाण्याकरतां कांहीं पैसे द्या म्हणजे झालें " तो म्हणाला. रहमतखानानें दहा रुपयांची (अफगाण) एक नोट देऊन त्याची बोळवण केली.

तिसऱ्या दिवशीं पुनः आपला दत्त म्हणून तो आमच्या दरवाजांत उभा राहिला. खोलीवर मी एकटाच होतों. पुश्तूमध्यें तो कांहीं तरी म्हणाला मी त्याला बहिऱ्यामुक्या सारख्या कांहीं खुणा केल्या. तेव्हां तो गप्प झाला आणि रहमतखानाची वाट पहात राहिला. रहमतखान थोड्याच वेळांत आला. या खेपेस गुप्त पोलिसाची वागणूक गोडी गुलाबीची दिसली.

" काय खान, तुम्हांला साखीसाहेबाला जाणारी मोटार अजून मिळाली नाहीं वाटतें ? "

" मोटार मिळती तर आम्ही येथें थोडेच बसून राहिलों असतों ?" रहमतखानानें उत्तर दिलें, " आत्तां देखील मी मोटारस्टँडवरूनच येतोंय् हा. "

त्या दिवशीं आणखी पांच अफगाण रुपये त्या हरामखोराला दिले तेव्हां कुठें ब्याद गेली एकदांची.

तो बदमाश निघून गेल्यावर मी रहमतखानाला म्हणालों, " शक्य तितक्या लवकर या माणसाच्या तावडींतून

आपली सुटका करून घेतली पाहिजे. तो फार लोभी मनुष्य आहे. याला कोठपर्यंत पैसे देत बसणार ? "

" काय करावें बरें ? दुसऱ्या सराईंत रहायला जाणें एवढा एकच मार्ग दिसतोय् मला " रहमतखानानें सुचविलें.

" पण सी. आय्. डी.वाला याचा दुसरा काका तेथें आपल्या मागोमाग आला तर ?" मीं विचारलें. रहमतखाना-जवळ माझ्या प्रश्नाचें उत्तर नव्हतें आणि म्हणून मग रहमतखानाला मीं तुमची गांठ घेण्यास पाठवलें. तुमच्या-बद्दल रहमतखानानें मला अगोदर सांगितलें होतें: तुमचें सहाय्य मिळूं शकेल असें मला वाटलें तुमचें दुकान शोधून काढण्यांतच आमचे दोन दिवस गेले. आणि तरी देखील रहमतखान तुमच्याकडे यायला तितकासा तयार नव्हता. ' आगाऊ कोणतीच व्यवस्था न करतां राजकीय कामगिरी-वर परमुलखांत येणाऱ्या मला ते काय म्हणतील ? ' अशी त्याला भीति वाटत होती. शेवटीं मी रागावलों आणि म्हटलें, " आपल्याला पकडून का द्यायचें आहे तुझ्या मनांत ? निदान उत्तमचंद शहरांत आहेत कीं नाहींत याचा तरी तपास काढायला पाहिजे होतास तूं. "

दुसऱ्या दिवशीं नाश्त्याच्यावेळीं (न्याहारी) पुन: आपला तो हरामखोर येऊन आमच्या बोकांडीं बसला. आज तर सरळ तो खोलींत आला आणि बिस्तऱ्यावर आसन ठोकून बसला. " साखीसाहेबाला जाण्याचें लांबणीवर कां पडतंय् तुमचें ? " त्यानें विचारलें.

" तें ठिकाण कांहीं इतकें जवळ नाहीं कीं आम्ही चालत जाऊं शकूं; मोटारच मिळत नाहीं मग काय करणार ?" रहमतखानानें उत्तर दिलें.

" तुम्हांलाच तेवढी मोटार मिळत नाहीं वाटतें ?" तो ओरडला " काल तुमच्याकडून निघालों आणि मी अबदुल-रहमान सराईत गेलों तिथें तर मला असें सांगण्यांत आलें कीं काल संध्याकाळीं देखील एक मोटार साखीसाहेबाला गेली. त्याशिवाय पोस्टाची मोटार नियमितपणें आठवड्यांतून दोन वेळ जातेच."

" काल मी देखील मोटारची चौकशी करण्यासाठीं अबदुल रहमान सराईपाशीं गेलों होतों. पण मला तर कोणीं सांगितलें नाहीं मोटार जाणार आहे म्हणून." रहमतखानानें प्रत्युत्तर केलें, "पोस्टाच्या मोटारीबद्दल म्हणाल तर तें मला कसें ठाऊक असणार ? मी कांहीं इथला राहाणारा नाहीं. आज मी पुन्हा प्रयत्न करीन आणि पोस्टाची अगर दुसरी कोणतीही मोटार मिळाली तर आम्ही आजच्या आज निघूं."

"हें पहा खान, मला तुम्हा दोघांचा संशय येऊं लागलाय्" तो गुप्त पोलिस म्हणाला, " गेले सहा दिवस मी तुम्हांला पहातों आहें. तुम्ही मनमल टोळीपैकीं (अफगाणिस्तानांतील एक लुटारू टोळी) दिसतां आहांत. फौजदार साहेबांना मी आज तुमच्याबद्दल बोललों. त्यांनीं तुम्हांला आपल्याकडे घेऊन येण्यास मला सांगितलें आहे. तेव्हां तुम्ही आपला चहा लवकर आटपा आणि माझ्याबरोबर चला कसे."

आमच्याकडून पैसे उकळण्याची ही दुसरी युक्ति होती. आतांपर्यंत चहापाण्याला म्हणून त्यानें पैसे घेतले. आतां फौजदाराच्या नांवावर आम्हांला लुबाडण्याचा त्याचा विचार होता.

" आम्ही प्रवासी असून धर्मनिष्ठ मुसलमान आहों. आम्हांला सतावायचें तुम्हीं ठरवलेंच असेल तर चहा वगैरे आटोपून मी तुमच्याबरोबर येतों. पण माझा भाऊ मात्र येणारच नाहीं. "

" तें चालणार नाहीं." तो पशू दरडावून म्हणाला, "मी तुम्हा दोघांनाही घेऊन जाणार. तो बहिरामुका असला म्हणून काय झालें ? थोडेंसें चालला म्हणून कांहीं बिघडत नाहीं."

प्रकरण वाढत चाललें असें पाहून रहमतखानानें एक पांच रुपयांची नोट काढली आणि म्हणाला, " मी तुमच्याबरोबर यायला तयार असतांना ह्या बिचाऱ्याला उगीच कां त्रास देतां ? "

पांच रुपयांची नोट तर त्यानें खिशांत घातलीच. पण तेवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. " पांच रुपये देऊन तुम्हीं मला विकत घेऊं शकणार नाहीं. माझ्या वरिष्ठ अधिकाऱ्याचा हुकूम मी थोडाच मोडूं शकतों ? छे छे, तें जमणार नाहीं. " तो म्हणाला.

रहमतखानानें आणखी एक पांच रुपयांची नोट काढली. तरी सुद्धां तो बदमाष कबूल होईना. अखेरीस हो ना करतां

करतां सतरा रुपयांवर सौदा तुटला. ( अफगाणिस्तानांत पोलिस शिपायाचा पगार तीस अफगाण रुपये म्हणजे आपल्या सहा रुपयांइतका आहे. )

" ठीक आहे. आजच्या दिवस मी गय करतों. पण उद्यां मात्र येथून गेलेंच पाहिजे. उद्यां जर का तुम्ही येथें राहिलांत तर मी निश्चितच तुम्हांला फौजदाराकडे घेऊन जाईन."

त्याच्या कृपाळूपणाबद्दल रहमतखानानें त्याचे आभार मानले आणि म्हणाला, " मी मोटारची चौकशी करायला जातों आहें; मोटार मिळाली तर आम्ही निश्चितच जाऊं आज. "

इतकें झालें तरी तो हालेना. त्याची भूक अजून शमली नव्हती. माझें रिस्टवॉच रहमतखानाच्या हातावर होतें. त्या पोलिसाच्या नजरेंतून तें सुटलें नव्हतें.

" हें घड्याळ फार मूल्यवान दिसतें आहे. काय किंमत असेल त्याची ?" त्यानें विचारलें.

" तशी कांहीं फार किंमत नाहीं त्याची " रहमतखानानें उडवाउडवी केली. पण त्यामुळें प्रकरण अधिकच आंगलट आलें. कारण तो बदमाष लगेच म्हणाला, " मग मला देऊन टाका ना तें. तुम्ही फारच कमी पैसे दिलेत मला. "

घड्याळ देण्याशिवाय गत्यंतरच नव्हतें. रहमतखानानें त्याला तें देऊन टाकलें.

तो पोलिस निघून गेल्यावर मीं रहमतखानाच्या मागें तुमच्याकडे जाण्याबाबत लकडा लावला. दोन वेळ तो जाऊन आला. पण तुमचें दुकान बंद होतें. कालचा सबंध दिवस आमचा जीव टांगणीला लागला होता. आज सकाळीं रहमतखान तुमच्या शोधार्थ बाहेर पडण्याच्या बेतांत होता इतक्यांत ती बला पुन: आमच्याकडे आली.

"खान" तो म्हणाला, "तूं दिलेलें घड्याळ फौजदारानें जप्त केलें. 'कुठून आणलेंस तें?' म्हणून तो मला विचारूं लागला. मी म्हणालों कीं तें माझ्या भावाचें आहे. त्याला शंका आली. पण मी माझ्या विधानालाच चिकटून राहिलों. तुमच्याबद्दलही त्यानें पुन्हा चौकशी केली. तुम्ही सराईतून निघून गेलांत असें मीं त्याला सांगितलें. खान, तें घड्याळ फारच सुरेख होतें. काय किंमत होती त्याची!"

"किंमत मला आठवत नाहीं, पण तें घड्याळ चांगल्या-पैकीं होतें. तें फौजदाराला कशाला दिलेंस?"

पोलिसानें फौजदाराला शिव्यांची लाखोली वाहिली आणि म्हणाला, "आतांच्या आतां जाऊन मी तें हस्तगत करतों. पण आज माझ्यापाशीं एक पै देखील नाहीं. तुझ्या-जवळ पांच रुपये असतील तर मला उसने दे. मी उद्यां तुझे परत करीन."

परत करण्याचा प्रश्नच नव्हता. रहमतखान तें पक्कें जाणून होता. पण करतो काय? मुकाट्यानें एक नोट

काढून त्यानें त्याच्या हातावर ठेवली आणि आपली सुटका करून घेतली. थोडक्यावरच निभावलें म्हणायचें.

ती ब्याद निघून गेल्यावर रहमतखान सराईच्या रखवालदाराकडे गेला आणि त्याला म्हणाला, "हा मनुष्य आम्हांला सारखा सतावून राहला आहे. आम्ही आज दुसऱ्या सराईंत जागा घेणार आहों."

"हा शिपाई अगदीं हलकट आहे. मी शिंच्याला गेले पांच दिवस पहातों आहें. आज मीं त्याला चांगलेंच सुनावलें आहे. माझी खात्री आहे, कीं तो पुनः तुमच्याकडे येणार नाही" रखवालदार म्हणाला.

त्यानंतर रहमतखान तुमच्याकडे आला आणि पुढें काय घडलें तें तुम्हांला ठाऊक आहेच. सुभाषबाबूंनीं आपलें निवेदन पूर्ण केलें.

म. [illegible] णें.

४

# कलकत्त्यापासून तों काबूलपर्यंतच्या प्रवासाचें दिव्य

सुभाषबाबू आणि त्यांचा साथी रहमतखान ह्यांना काबूल मध्यें आल्यावर कोणत्या अडचणींतून जावें लागलें ह्याचें वर्णन मागल्या प्रकरणांत दिलें आहे. खुद्द सुभाषबाबूंच्या तोंडून मीं ऐकलें तसें तें दिलें आहे. त्याबाबत आमचें संभाषण चालू होतें तेवढ्या वेळांत अमरनाथ आणि रहमतखान सराईतून सामान घेऊन परत आले. जेवण आटोपून आम्हीं रेडिओ लावला आणि बातम्या ऐकल्या. त्यानंतर गेल्या पंधरा दिवसांत हिंदुस्तानांत आणि युद्धआघाडी-वर घडलेल्या घटनांचा गोषवारा सांगण्यास सुभाषबाबूंनीं

मला सांगितलें. आठवल्या तितक्या सर्व महत्त्वाच्या बातम्या मीं सांगितल्या आाण म्हणालों, " माझ्याकडे ब्रिटिश वकिलातींतून ' सिव्हिल आणि मिलिटरी गॅझेट ' येत असतें. उद्यां सकाळीं त्याचे जुने अंक मी आणून देईन." सुभाषबाबूंनीं संन्यासच घेतला असला पाहिजे हें सरदार शार्दूलसिंग कवीश्वर यांचें प्रतिपादन आणि दिल्ली रेडिओवरून सांगण्यांत आलेली हरद्वारच्या साधूची गोष्ट सुभाषबाबूंनीं माझ्या तोंडून ऐकली तेव्हां त्यांना फार गंमत वाटली.

त्या रात्रीं अधिक प्रश्न विचारून त्यांना त्रास देणें मला बरें वाटलें नाहीं. उशीरही पुष्कळ झाला आहे असें पाहून आम्ही सर्वजण झोपण्यासाठीं उठलों.

मी माझ्या खोलींत गेलों तेव्हां माझी बायको अद्याप जागतच बसलेली मीं पाहिली. " तूं अजून झोपली कां नाहींस ?" मीं विचारलें.

" मीं खूप प्रयत्न केला पण झोप येईल तर शपथ. " ती म्हणाली, " ह शंकास्पद पाहुणे घरांत असतांना माझ्या मनाला शांति लाभेल हें कसें शक्य आहे ?" त्यांच्याबद्दल सारखे प्रश्न विचारून तिनें मला बेजार केल.

" मी सर्व खरी हकिकत तुला अगोदरच सांगितली. आणखी काय सांगावें अशी तुझी अपेक्षा आहे ?" मीं जरा त्रासिकपणानें विचारलें.

" तुम्ही सांगितलेली हकिकत किती खरी आहे तें मी जाणतें. आतां पैसे चारून आणि आपले घड्याळ देऊन

ज्या पोलिसाच्या कचाट्यांतून त्यांना निसटावें लागलें त्याची माहिती सांगा. ”

“ म्हणजे, तूं चोरून ऐकत होतीस वाटतें आमचें बोलणें ? ती एक जुनी हकिकत होती.” मी म्हणालों.

“ मीं दरवाजाआडून ऐकलें असेल नाहींतर आणखी कुठून मला कळलें असेल, तुम्हांला त्याच्याशीं काय कर्तव्य आहे ? बाकी साळसूदपणाचा आव फार चांगला आणला आहे तुम्हीं !”

“ तुला जर अगोदरच सर्व कांहीं कळलें आहे तर मला कां उगीच त्रास देते आहेस ? ते लाघमानहून आले असल्याचें मीं तुला सांगितलें आहे. त्यांच्यापैकीं एक बिचारा आजारी आहे, त्याला घराबाहेर जातां येत नाहीं आणि त्या आजाऱ्याच्याकडे पहायला म्हणून दुसऱ्यालाही घरींच रहावें लागतें. ”

“आतां आलें लक्षांत तुमचें कारस्थान” ती जवळ जवळ ओरडलीच, “ ते विचित्र पाहुणे आहेत.” मी तिच्या तोंडावर हात ठेवीत म्हणालों, “ अशी मोठ्यानें ओरडूं नकोस. त्यांनीं ऐकलें तर काय म्हणतील ते आपल्याला ?”

तिनें माझा हात बाजूला सारला.

“ कां नाहीं बोलायचें मोठ्यानें ? ” ती पुन: ओरडली, “ दिवस रात्र घरांत लपून बसणारे हे कसले मुलखावेगळे पाहुणे ? कोण आहेत कुणाला ठाऊक ? तुम्हीं घरीं नसतांना

मी कोणालाही घरांत ठेवून घेणार नाहीं. मुसलमानाला माझ्या घरांत जागा मिळणार नाहीं; आणि माझ्या मर्जीविरुद्ध त्यांना ठेवून घेण्याचा तुमचा हक्कच असेल...."

आतापर्यंत मी समजत होतों कीं आपली थाप खपून जाईल. पण तिचा तो रुद्रावतार पाहून मला वाटलें कीं सर्व कांहीं सांगितलेलेंच बरें. त्याचा काय नेम ? कदाचित् पाहुण्यांना आपल्याकडे बरेच दिवसही रहावें लागेल. तिला खरी हकिकत ठाऊक असणेंच अधिक सोयीचें (उपकारक) होईल. म्हणून मीं तिला सर्व हकिकत सांगून टाकली.

भीतीनें तिच्या मनाची जबरदस्त पकड घेतली "ते इथें आहेत असें कुणाला समजलें तर आपल्यावर केवढी आपत्ति कोसळेल ! ते पकडले जातील आणि मग आपल्याला कोणत्या हालअपेष्टांना तोंड द्यावें लागेल याची मला कल्पना देखील करवत नाहीं." भयभीत होऊन ती म्हणाली.

"आपण जर योग्य काळजी घेतली तर ही गोष्ट तिऱ्हाइताला समजणें अशक्य आहे. यदाकदाचित् बोसबाबू आपल्या घरीं पकडले गेले तर ती गोष्ट आपल्याला लांछनास्पद आहे. त्यांच्या वास्तव्याचा कुणालाही यत्किंचित्‌ही सुगावा लागणार नाहीं ह्याबद्दल आपण दक्षता बाळगली पाहिजे. मग ते आपल्या घरीं कितीही दिवस राहोत." मी म्हणालों.

माझ्या पत्नीच्या मनोवृत्तींत आतां आमूलाग्र फरक पडला. " सुभाषबाबूंना शक्य ती मदत करणें हें आपलें नैतिक कर्तव्य आहे. प्राणार्पण करण्याची जरी वेळ आली तरी मी मागेंपुढें पहाणार नाहीं. " ती म्हणाली, " ईश्वराच्या कृपेनें स्वदेशसेवेची ही उत्कृष्ट संधि आपल्याला लाभली आहे. "

मला पुष्कळ धीर आला. तिचे माझ्यावर फार मोठे उपकार आहेत. तिची साधनक्षमता आणि धैर्य यामुळेंच आम्ही सुभाषबाबूंना इतके दिवस आमच्या घरीं आश्रय देऊं शकलों. बारीक सारीक गोष्टींतही ती इतकी दक्षता बाळगी, कीं ४८ दिवस आमच्या घरीं राहूनही आमच्या शेजाऱ्यांना देखील त्याची यत्किंचित दाद लागली नाहीं.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं माझा बराचसा वेळ त्यांच्या सुखसोयींकडे लक्ष पुरवण्यांत गेला. मी दुकानावर रोजच्या वेळीं जाऊं शकलों नाहीं. मी नेहमीं किती वाजतां दुकानांत जातों याची त्यांनीं चौकशी केली. दहा साडेदहाला म्हणून मीं सांगितलें आणि त्यावेळीं तर बारा वाजून गेले होते. सुभाषबाबू बरेच अस्वस्थ झाले आणि म्हणाले, " माझ्या जेवणासाठीं तुम्ही थांबूं नका. तुम्ही दुकानावर उशीरां जाऊं लागलांत तर त्यामुळें संशयाला जागा होईल. "

दुकानांत जाण्यापूर्वी सिव्हिल आणि मिलिटरी गॅझेटचे त्यांना हवे असलेले जुने अंक त्यांच्यापाशीं देऊन मीं खोलीला बाहेरून कुलूप घातलें आणि किल्ली माझ्या बायकोच्या

स्वाधीन केली. दिवसास आम्ही त्यांच्या खोलीला कुलूप घालीत असूं. हेतु इतकाच, कीं कोणी शेजारीपाजारी आलाच तर चुकून त्या खोलींत जाऊं नये.

त्या दिवशीं रात्रींच्या जेवणाआधीं आम्ही गप्पा मारीत बसलों होतों. "बोसबाबू, तुम्हांला त्रास होणार नसेल तर माझी एक विनंती आहे. हिंदुस्तानांतून तुम्ही कसे निसटलां ती हकिकत मला तुमच्या तोंडून ऐकण्याची इच्छा आहे." मी म्हणालों.

"मास्कोला जाण्याचें माझ्या मनांत फार दिवसांपासून आहे." त्यांनीं सुरवात केली, "पण कित्येक दिवसपर्यंत जाण्याची व्यवस्थाच होऊं शकली नाहीं. हिंदुस्तानांतील एका पक्षानें मला मास्कोला पोचवण्याचें कबूल केलें होतें परंतु दोन महिन्यांपूर्वींच मी हिंदुस्तानाबाहेर फरारी व्हावें अशी त्याची इच्छा होती. आणि मला तर इतक्या तांतडीनें हिंदुस्तान सोडणें शक्य नव्हतें. एक तर कलकत्ता कॉर्पोरेशन-मध्यें माझें एक महत्त्वाचें काम होतें आणि माझी दाढीही पुरेशी वाढलेली नव्हती. वेषांतरासाठीं त्याची फार आवश्यकता होती. या कारणास्तव मीं त्यावेळीं जाण्याचें नाकारलें. आतां मात्र मला असें वाटतें, कीं त्यावेळीं निघालों असतों तर मास्कोला जाणें कितीतरी सोपें गेलें असतें. माझ्या-बरोबर जो मनुष्य येणार होता त्याची येथील रशियन वकिलातींत चांगली वग होती. मीं जेव्हां येण्याचें नाकारलें तेव्हां तो एकटाच निघून गेला आणि आज तो मास्कोमध्यें सुखरूप आहे.

" कॉर्पोरेशनमधील माझें काम संपविल्यावर ( एका जमिनीच्या प्लॉटबद्दलचा कांहीं तंटा होता तो ) माझी प्रकृति ढासळली आहे या सबबीवर मीं घराबाहेर जाण्याचें बंद केलें. डॉक्टरनीं तशी सक्त ताकीद दिली असल्याचें मीं पसरविलें. कोणींही मला भेटण्याचा प्रयत्न करूं नये अशी सूचना मी देऊन ठेवली. फारच जरुरीचें काम असेल तर माझ्याशीं फोनवर बोलावें. घरांतून निसटण्यापूर्वीं कांहीं दिवस तर मीं माझ्या नातेवाइकांना देखील माझ्या खोलींत येण्याची बंदी केली आणि माझें जेवण घेऊन येणाऱ्या नोकराला दार बाहेरच्या टेबलावर ठेवून जात जा म्हणून सांगितलें.

" मध्यंतरींच्या काळांत मला हिंदुस्तानाबाहेर काढून देण्याची जे व्यवस्था करणार होते त्या माझ्या मित्रांना मीं निरोप पाठवला आणि कधीं अदृश्य व्हायचें तो दिवस ठरवून घेतला. चाळीस दिवसांची दाढी वाढली तेव्हां, म्हणजे जानेवारीच्या १९ तारखेस, माझ्या प्रयाणाचा व्यवस्था पूर्ण झाली. संध्याकाळीं आठ वाजतां मौलवीच्या वेषांत मी घराबाहेर पडलों आणि मोटारच्या सहाय्यानें कलकत्त्यापासून चाळीस मैलांवरचें एक रेल्वे स्टेशन गांठलें. (त्यांनी स्टेशनच्या नांवाचा उल्लेख केला पण मला आतां तें स्मरत नाहीं ) तेथें पेशावरचें दुसऱ्या वर्गाचें तिकीट काढून मी मेलगाडींत बसलों. रात्रीचा प्रवास सुखरूप पार पडला. दुसऱ्या दिवशीं सकाळीं एक शीख प्रवासी माझ्या डब्यांत चढला. आम्ही समोरासमोर बसलों होतों.

" संभाषणाच्या ओघांत त्यानें माझें गांव आणि प्रवासाचा

हेतु याबद्दल विचारलें. माझें नांव झियाउद्दिन; मी लखनौचा रहाणारा असून विमा कंपनीच्या कामानिमित्त रावळपिंडीस जात आहें असें सांगितलें. तो गृहस्थ संबंध दिवसभर माझ्या डब्यांत होता. स्टेशनवर गाडी थांबली म्हणजे वर्तमानपत्र वाचण्याचा बहाणा करून मी माझें तोंड लपवीत असें.

"चुडीदार पायजमा, शेरवानी आणि फेज (तुर्की टोपी) असा माझा पोषाख होता. त्या वेषांत आणि विशेषत: माझ्या दाढीमुळें मला ओळखणें कोणालाही अवघड गेलें असतें. मी अगदीं हुबेहुब एकाद्या मौलवीसारखा दिसत होतों. प्रवासांत विशेष कांहीं घडलें नाहीं. जानेवारीच्या सतरा तारखेस रात्रीं ९ वाजतां मी पेशावरास पोंचलों. माझ्याकरतां एक मोटारगाडी तयार ठेवलेली होती तिच्यांत बसून मी नियोजित स्थळीं गेलों.

"मला दोन दिवस पेशावरांत काढावे लागले." सुभाषबाबू पुढें म्हणाले, "माझ्या मित्रांना काबूलपर्यंतच्या माझ्या प्रवासाची व्यवस्था करावयाची होती. पेशावरच्या वास्तव्यांत माझ्या मित्रांनीं केलेल्या सर्वोत्कृष्ट योजनेबद्दल त्यांचें कौतुक केल्यावांचून मला रहावत नाहीं. चूक व्हायला कोठें अवसरच ठेवलेला नव्हता. तेथें माझा मुक्काम दोन दिवस होता पण कुणाला यत्किंचितही सुगावा लागला नाहीं, इतका कडेकोट बंदोबस्त त्यांनीं केला होता. एकोणीस तारखेला पठाणाचे कपडे मला देण्यांत आले. अफगाणिस्तानांत यू. पी. मौलवीपेक्षां पठाणाच्या वेषांत वावरणें अधिक सुरक्षित होतें. दुसरा एक मित्र रहमतखान आणि मी एका मोटारींत बसून

पेशावर शहराच्या बाहेर पडलों आणि जमरूदच्या रस्त्याला लागलों. जमरूद किल्ल्यापासून थोड्या अंतरावर एक कच्चा रस्ता फुटतो. मुख्य रस्ता सोडून आम्ही त्या रस्त्याला लागलों. अखेरीस आम्ही गढी नावाच्या लहानशा खेड्यांत येऊन पोचलों. मोटार–रस्ता तेथें संपत असल्यानें आम्हांला गाडीला रजा देणें भाग पडलें. आम्हीं रात्र त्याच खेड्यांत काढली. दुसरे दिवशीं मी, रहमतखान आणि आमचे संरक्षक दुसरे दोन हत्यारबंद बंदूकवाले पठाण असे आम्ही चौघेजण पायीं काबूलला जाण्यास निघालों. पेशावरपासून आमच्या-बरोबर आलेला मित्र गाडी घेऊन परत गेला. अतोत्तर मीं बहिऱ्या मुक्याचें सोंग करायचें असें ठरलें.

"दुसऱ्या दिवशीं संध्याकाळीं आम्ही हिंदुस्तानची सरहद्द ओलांडली आणि सरहद्दीवरील टोळीवाल्यांच्या एका खेड्यास येऊन पोचलों. त्या गांवांत अड्डा शरीफ या नांवाचा सुप्रसिद्ध दर्गा आहे. तेथें एक पीर रहातो. त्यानें आमच्या रहाण्याची सर्व व्यवस्था केली होती. दिवसभर त्या खडकाळ रस्त्यांत सारखी रखडपट्टी झाल्यानें आम्हांला कमालीचा थकवा आला होता. ती रात्र आम्ही पीराच्या मशिदींतच झोपून काढली."

" गढीहून संरक्षणार्थ आलेले ते दोघे हत्यारबंद पठाण आतां आमच्यांतून बाद झाले आणि दुसऱ्या तिघांची त्या कामीं योजना झाली. त्यांच्यापाशीं देखील बंदुका होत्या. दुसऱ्या दिवसाचा रस्ता फारच अवघड होता. आम्हांला अनेक वेळीं विश्रांतीसाठीं थांबावें लागे. अखेरीस रात्रीं नऊच्या

सुमारास आम्ही लालपुऱ्यांत येऊन दाखल झालों. आदल्या दिवसाप्रमाणें येथेंही आगाऊच सर्व व्यवस्था करून ठेवलेली होती. त्यामुळें रात्र आरामांत जाऊन आम्हांला चांगली विश्रांति मिळाली. त्या ठिकाणचा एक वडा खान आमचा यजमान होता; तो त्या ठिकाणचा जणूं बादशहाच होता. अफगाणिस्तानच्या दरबारी मंडळींत त्याचें चांगलें वजन होतें.

"आतां मात्र माझ्या अंगांत मुळींच त्राण उरलें नव्हतें. पण मला असा धीर देण्यांत आला, कीं काबूलनदी गांठायला आतां थोडेसेंच मैल चालून जावयाचें आहे. एकदां काबूल-नदी ओलांडली म्हणजे पुनः मोटार-रस्ता लागेल आणि काबूल शहराला जाणाऱ्या मोटारी तेथें मिळूं शकतील.

"रस्त्यांत कोणीं हटकलें अगर संशय घेतला तर अडचण पडूं नये म्हणून लालपुऱ्याहून निघतांना आमच्या यजमानानें–खानानें–आम्हांला एक परिचय पत्र दिलें. तें पत्र दाखविल्यावर अफगाणिस्तानांत आम्हांला कोणीही त्रास देणार नाहीं याबद्दल त्यानें आम्हांला खात्री दिली.

"लालपुऱ्याच्या खानाचें परिचयपत्र मीं वाचून पाहिलें. तें फारसी भाषेंत लिहिलेलें होतें. 'रहमतखान आणि झियाउद्दिन हे सरहद्दीवरील टोळीवाल्या मुलखांतले रहिवासी असून साखीसाहेबाच्या यात्रेस जात आहेत. त्यांच्या प्रवासा-बद्दलची सर्व जबाबदारी व्यक्तिशः माझ्यावर असल्यानें त्यांना कोणीं त्रास देऊं नये म्हणून हें पत्र देत आहें' असें त्यानें लिहिलें होतें."

" तुम्हांला त्रास देणाऱ्या त्या गुप्त पोलिसाला तुम्हीं तें पत्र कां दाखविलें नाहीं ?" मीं मध्येंच सुभाषबाबूंना प्रश्न केला.

" दाखवलें की ! " ते म्हणाले, " म्हणून तर त्याच्या कचाट्यांतून आम्ही सुटूं शकलों. ज्या दिवशीं आम्हांला त्या घड्याळाला मुकावें लागलें त्याच दिवशीं आम्हीं त्याला तें पत्र दाखवलें. तें पत्र दाखवण्यापूर्वी तो आम्हांला दम भरीत होता पण मग जरा नरमला. पण त्याला सद्वर्तणुकीचें प्रमाणपत्र नको होतें; पैसे पाहिजे होते.

" आम्ही लालपुऱ्याहून निघालों तेव्हां दोन सशस्त्र इसम संरक्षणार्थ आमच्या बरोबर होते." आपली हकिकत पुढें चालू करीत सुभाषबाबू म्हणाले, " काहीं मैल चालून गेल्यावर आम्ही काबूल नदीपाशीं येऊन पोचलों. नदी-पलीकडे जाण्यासाठीं तेथें नाव अगर होडीची व्यवस्था नव्हती. कातड्याच्या पुष्कळशा पखाली एकत्र बांधून तेथील लोक एक प्रकारची बोट तयार करतात. पखालींच्या त्या बोटीवर बसून नदीपलीकडे जाण्याची प्रथम मला भीतीच वाटली. पण दुसरीं माणसें खुशाल निर्भयपणें त्या बोटीच्या साह्यानें पलीकडे जात असलेलीं पाहून मीही तयार झालों. पखालींच्या बोटीवर बसण्यासाठीं कोळ्याचीं जाळीं पसरलीं होतीं त्यावर बसून आम्हीं काबूल नदी ओलांडली. आम्ही आतां अफगाणिस्तानच्या हद्दींत प्रवेश केला होता. तेथें हत्यारें घेऊन फिरण्यास मनाई आहे. सबब आमच्या हत्यार-बंद संरक्षकांना आम्ही काबूल नदीच्या अलीकडल्या

( टोळीवाल्या ) तीरावरच सोडून दिलें. अशा प्रकारें आम्हीं डाका गांव चुकवून अफगाण मुल्खांत प्रवेश केला. ( डाका हें एक खेडें असून पेशावरपासून पन्नास मैलांवर आहे. पेशावर ते काबूलच्या दरम्यान प्रवास करणाऱ्या लोकांना या ठिकाणीं पासपोर्ट दाखवावा लागतो आणि कस्टमच्या अधिकाऱ्यांना आपल्या सामानाची झडतीही द्यावी लागते. ) आम्हीं असें ऐकलें होतें, कीं पेशावरपासून डाक्यापर्यंतच तीन ठिकाणीं पासपोर्ट तपासण्यांत येतो. ह्या सर्व जागा चुकविण्यासाठीं म्हणून तीन दिवसांचा हा अवघड आडमार्ग आम्हांला स्वीकारावा लागला.

"आतां आम्ही काबूलच्या रस्त्यावर मोटारीची मार्गप्रतीक्षा करीत बसलों. रस्त्याच्या कडेला 'थंडी' म्हणून राईसारखी एक निवाऱ्याची जागा होती. झाडाची सावली आणि एक विहीर असली म्हणजे त्याला 'थंडी' म्हणतात असें दिसतें. मी झाडाखालीं विश्रांति घेत पडलों आणि रहमतखान काबूलकडे जाणाऱ्या मोटारीची वाट पहात बसला. तिकडे जाणारी मोटार दिसली म्हणजें तिला थांबविण्यासाठीं तो हात दाखवी. पण मोटारबसवाले त्याच्याकडे दुर्लक्ष करून निघून जात. मी अतिशय थकून गेलों होतों त्यामुळें त्या ठिकाणीं पडल्या पडल्या माझा डोळा लागला. रहमतखानानें मला उठविलें तेव्हां संध्याकाळ झालेली होती. माझ्या शेजारींच रस्त्यावर एक लॉरी उभी होती. अखेरीस रहमतखानानें एका मोटारवाल्याला गांठलाच. लॉरीवाल्यानें मला मोटारींत बसायला सांगितलें. मीं चढण्याच्या उद्देशानें

लॉरीकडे पाहिलें तेव्हां माझी मति गुंगच झाली. लॉरीमध्यें एकावर एक सारख्या पेट्या रचलेल्या होत्या. पाय टेवायला देखील जागा दिसत नव्हती. आम्ही विचारांत पडलेले पाहून मोटारचा 'किलनर' ओरडला, 'पेटाऱ्यावर चढून बसा कीं वर चटकन्.' त्याच्या सूचनेप्रमाणें त्या डोलाऱ्यावर चढून बसणें भागच होतें. मी कसातरी वर जाऊन बसलों एकदाचा. रात्रीची वेळ असून चारीबाजूला मैदानच मैदान पसरलें होतें; बर्फ पडत होतें, आणि त्यावरून वहाणारा गार वारा अंगाला कसा झोंबत होता. थंडी तर मी म्हणत होती आणि आमच्याजवळ गरम कपडेही नव्हते. नुसते डोळे उघडणें देखील मुष्किलीचें झालें होतें. आम्ही पेटाऱ्यांवर उंच जागीं बसलों होतों. रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या झाडांच्या फांद्या मध्यें मध्यें येत होत्या. एकाद्या फांदीचा फटका लागून आम्ही फेकले जातों कीं काय अशी सारखी भीति वाटत होती. झाड येतेंयसें पाहिलें, कीं पटकन खालीं वाकायचें, असा तो प्रवास होता. एकंदरीनें पहातां तें एक भयंकर दिव्यच होतें. 'याहून चांगली मोटार नसती का मिळाली आपल्याला ?' मीं रहमतखानाला विचारलें. 'कमीत कमी पंधरा मोटारींना मीं थांबविण्याचा प्रयत्न केला पण एक थांबेल तर शपथ. अखेरीस याला मी कसा तरी तयार केला. ही लॉरी गेली असती तर मग रात्रीं त्या 'थंडींत' कुडकुडत बसावें लागलें असतें आपल्याला.' त्यानें सांगितलें.

"सबंध रात्र आम्हांला त्या मोटारींत बसून काढावी लागली" सुभाषबाबू पुढें म्हणाले, "अंगांत ऊब आणण्यासाठीं

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १८२३५

अनेक वेळ आम्हीं चहा घोसला. तसें केलें नसतें तर थंडींत गारठून मरायचीच वेळ होती. आम्ही कांहीं जिवंत राहिलों नसतों सकाळपर्यंत.

"दुसऱ्या दिवशीं आम्ही बुतखाक या ठिकाणीं येऊन पोचलों. या जागीं पासपोर्टाची तपासणी करण्यांत येते. अधिकाऱ्यांचा खिसा गरम करणें हाही एक पासपोर्टच असतो. आम्हांला आमच्या प्रवासाचें कारण विचारण्यांत आलें. रहमतखानानें ठराविक जबाब दिला. माझ्याकडे बोट दाखवून तो म्हणाला, 'हा माझा भाऊ असून बिचारा बहिरामुका आहे. मी त्याला साखीसाहेबाच्या यात्रेला घेऊन जात आहें. सरहद्दीवरील स्वतंत्र जमातींच्या मुलखांतील आम्ही रहिवासी आहों.' याखेरीज लालपुऱ्याच्या खानाचें प्रमाणपत्र त्यानें अधिकाऱ्याला दाखविलें तेव्हां तो गप्प बसला.

"त्या जागीं आम्हीं चहा घेतला आणि पुन्हा लॉरींत बसलों. संध्याकाळीं पांच वाजण्याच्या सुमारास आम्ही काबूलला येऊन पोचलों. लगेच लॉरीवाल्याचें भाडें चुकतें केलें. पेशावराहून येतांना अफगाण रुपये बरोबर आणण्याची आम्ही आधींच खबरदारी घेतली होती, त्यामुळें त्याबाबत आमची अडचण झाली नाहीं. यापुढची हकिकत मीं काल तुम्हांला सांगितलीच आहे."

सुभाषबाबूंनीं आपली हकिकत संपविली एवढ्यांत माझी धाकटी मुलगी आमच्यासाठीं जेवणाचीं ताटें घेऊन आली. मी रेडिओ सुरू केला आणि आम्ही जेवायला बसलों.

## ५

# इटालियन वकिलाकडून मदतीचें आश्वासन

बातम्यांचा कार्यक्रम संपला तेव्हां रेडिओ बंद करून मी सुभाषबाबूंना म्हणालों,

" रहमतखानानें मला सांगितलें, कीं तुम्ही इटालियनांशीं संधान बांधलें आहे. म्हणजे मास्कोला जाण्याचा बेत तुम्हीं रद्द केला काय? आणि तसें नसेल तर इटालियन वकिलातीशीं संबंध जोडण्याचें काय कारण ?"

" मास्कोला जाण्याची कल्पना मीं अद्याप सोडून दिलेली नाहीं." सुभाषबाबू तात्काळ उत्तरले, " दुसरें गत्यंतरच नव्हतें म्हणून केवळ नाइलाजानें आम्ही इटालियनांशीं संबंध जोडले. काबूलपर्यंतच्या प्रवासाची योजना माझ्या मित्रांनीं चांगल्या प्रकारें केली. खुद्द काबूलमध्यें मात्र त्यांना

चांगलीशी व्यवस्था करतां आली नाहीं. येथें रहमतखानही माझ्या इतकाच गैरमाहितगार आहे. त्याच्या पुश्तू भाषेचा देखील येथें फारसा उपयोग नाहीं. ज्यांनीं त्याला माझ्या बरोबर दिला त्यांची अशी कल्पना होती, कीं येथें आल्यावर रशियनांशीं संबंध जोडणें फारसें अवघड जाणार नाहीं. पण येथें तर रशियन वकिलातींत प्रवेश मिळणें देखील मुष्किलीचें होऊन बसलें आहे. वकिलातीचा दरवाजा नेहमींच बंद असतो आणि दरवाजावर अफगाण संत्र्याचा रात्रंदिवस खडा पहारा असतो. माझ्या मित्राचा असा भ्रम होता, कीं रशियन वकिलाला माझें नुसतें नांव कळविण्याची खोटी, कीं पुढील सर्व व्यवस्था तो करील आणि विमानमार्गें मला मास्कोला रवाना करील.

“ रशियन वकिलातीशीं संबंध जोडण्यासाठीं आम्हीं किती प्रयत्न केले त्याची माहिती तुम्हांला समजली तर इटालियनांकडे जाणें आम्हांला कसें भाग पडलें तें तुमच्या लक्षांत येईल. ” सुभाषबाबू म्हणाले.

ते पुढें म्हणाले, “ काबूलमध्यें आल्यावर दुसऱ्या दिवशीं नाश्ता करून लगेच आम्ही रशियन वकिलातीच्या शोधार्थ बाहेर पडलों. अर्थात कोणाजवळ विचारपूस करणें शक्यच नव्हतें. नसती भानगड उपस्थित व्हायची एखादे वेळीं ! आम्ही शहरांत भटक भटक भटकलों. ग्रीक, इटालियन, इराणी, इजिप्शियन वकिलाती आम्हांला दिसल्या. या वकिलातींच्या दरवाजांवर अफगाण संत्र्यांचा पहारा असलेला

पाहून मला आश्चर्य वाटलें. युरोपांत कुठेंही ही पद्धत आढळून येत नाहीं. वकिलातीवर पहारा नसतो. कोणाही माणसाला आंत जाण्यास मोकळीक असते. येथें तर वकिलातींत प्रवेश करण्यापूर्वी प्रत्येक मनुष्याला आपली ओळख पटवावी लागते.

" एकसारखी भटकन्ती करूनही रशियन वकिलातीचा पत्ता लागेना तेव्हां आम्ही अगदीं थकून गेलों. अधिक चालणें शक्यच नव्हतें. त्यांतच पेशावरी वहाणांमुळें बर्फावरून चालणें अवघड जात होतें. अखेरीस कंटाळून आम्ही आपल्या सराईंत परत आलों. त्या रात्रीं आम्ही मेल्यागत झोपून गेलों.

" दुसऱ्या दिवशीं मी जागा झालों तेव्हां चांगलें उजाडलें होतें. आम्ही न्याहारी केली आणि पुन्हा रशियन वकिलातीचा शोध करण्यास निघालों. ज्या भागांत इतर देशांच्या वकिलाती आहेत त्या भागांत पुन्हा दोन तासपर्यंत भटकलों पण रशियन वकिलातीचा मागमूसही लागला नाहीं. मग शहराच्या दुसऱ्या भागांत आम्हीं शोध सुरू केला. अचानकपणें एका इमारतीवर रशियन निशाण फडकत असलेलें माझ्या दृष्टीस पडलें.

" ती रशियन वकिलातच असली पाहिजे याबद्दल आम्हांला शंका उरली नाहीं. पण नुसती वकिलात सापडून काय उपयोग ? आंत प्रवेश कसा मिळणार ? दरवाजा बंद

होता आणि ते अटळ अफगाण संत्री पहारा करीत होते. आतां काय युक्ति करावी ? असा विचार करीत वकिलातीं-पासून थोड्याशा अंतरावर आम्ही बसून राहिलों. ओळख पटविल्याशिवाय वकिलातींत प्रवेश मिळणें अर्थातच शक्य नव्हतें. शिवाय आमच्या त्या पठाणी वेशांत आम्हांला आंत कोण जाऊं देणार होता ? आम्हीं खूप वेळ डोकें खाजवलें पण व्यर्थ. मी मनांतल्या मनांत स्वतावरच चिडलों, माझ्या मित्रांचा मला राग आला, मीं त्यांना शिव्या शापही दिले. अशा परिस्थितींत मला येथें पाठवणें म्हणजे मूर्खपणाचा कहर आहे असें मला वाटलें. ज्याची पूर्वीची ओळख वगैरे आहे अगर रशियन वशिलातींशीं संबंध कसे जोडावे याची माहिती आहे अशाच माणसाला त्यांनीं माझ्याबरोबर द्यायला हवें होतें. आम्ही पुन्हा एकवार निराश अंतःकरणानें सराईंत परत आलों. मानासिक अस्वस्थतेमुळें माझी भूक देखील पार उडून गेली.

"त्या रात्रीं आम्ही खूप वेळ जागत बसलों. या अडचणीं-तून कसा मार्ग काढावा याबद्दल आपसांत दीर्घकालपर्यंत खल केला. सरतेशेवटीं आम्हांला एक तोडगा सुचला. दुसऱ्या दिवशीं सकाळपासून वकिलातीच्या फाटकापाशीं धरणें धरून बसायचें. एकादवेळ तरी रशियन वकिलाची गाडी निश्चितच फाटकाबाहेर पडेल. गाडी दिसली रे दिसली कीं ती थांबवायची आणि वकिलाशीं बोलणें करायचें असें आम्हीं ठरवलें. वकिलाची गांठ घेण्याला दुसरा मार्गच नव्हता.

दुसऱ्या दिवशीं सकाळीं उठून ठरल्याप्रमाणें आम्हीं

रशियन वकिलातीपाशीं जाऊन ठिय्या दिला. आम्हीं किती वेळ तरी रशियन वकिलाच्या गाडीची वाट पाहिली असेल. तेवढ्या वेळांत अनेक गाड्या आल्या आणि गेल्या. गाडींत बसलेले लोक रशियन आहेत कीं दुसरे कोणी आहेत हें आम्हांला ओळखतां आलें नाहीं. साडे चार वाजेपर्यंत आम्ही तसेच ताटकळत बसलों आणि शेवटी निराश होऊन परतण्याच्या बेतांत होतों. इतक्यांत छोटेंसें रशियन निशाण फडकावीत एक गाडी फाटकाबाहेर पडतांना दिसली. गाडींत बसलेला मनुष्य रशियनच असला पाहिजे असें आम्हीं ताडलें. कारण गेल्या दोन तीन दिवसांच्या अनुभवावरून आम्हांला ही गोष्ट कळून आली होती कीं फक्त परराष्ट्रीय वकिलांनाच आपापल्या देशाचें निशाण मोटारींवर लावण्याची परवानगी असते. गाडी आमच्या जवळून जाऊं लागली तेव्हां रहमतखानानें हात दाखवून तिला थांबण्याचा इशारा केला. सुदैवानें गाडी थांबली आणि गाडींतील मागल्या सीटवर बसलेल्या माणसापाशीं जाऊन रहमतखानानें आपल्या मोडक्या तोडक्या पर्शियन भाषेमध्यें माझ्याबद्दल माहिती सांगितली. मी गाडीपासून जरा अंतरावरच उभा होतों. पण रहमतखानानें माझ्याकडे बोट दाखवून गाडींतील माणसाला कांहीं तरी सांगितलेलें मीं पाहिलें. त्या माणसाबरोबर त्याचें काय बोलणें झालें तें रहमतखानानें मागाहून मला निवेदन केलें.

“ आपण सुभाषबाबूंना काबूलला आणलें असून त्यांना मास्कोला जायचें आहे असें त्यानें वकिलाला सांगितलें

आणि रशियन वकिलातीकडून मास्कोला जाण्यासाठीं त्यांना मदत मिळूं शकेल काय म्हणून विचारलें."

"ते कोठें आहेत ?" वकिलानें चौकशी केली.

रहमतखानानें माझ्याकडे बोट दाखविलें.

"तो मनुष्य सुभाषचंद्र बोसच आहे याबद्दल खात्री काय ? त्यांची ओळख पटविल्याशिवाय आम्हांला मदत कशी करतां येईल ?" वकिलानें परत विचारलें.

"रहमतखानाकडून आपल्या प्रश्नाचें कांहीं समाधानकारक उत्तर मिळतें किंवा काय त्याची वाट पहात तो थोडा वेळ थांबला देखील. पण रहमतखानाला उत्तर देतां आलें नाहीं आणि मोटार निघून गेली.

"हा वृत्तान्त ऐकून मला अतिशय वाईट वाटलें. आम्हीं एक उत्कृष्ट संधि गमावून बसलों होतों. केवळ भाषेच्या अडचणीमुळेंच रहमतखानाला चटकन उत्तर देतां आलें नाहीं. पण सर्व दोष त्याचाच होता असें नाहीं. आमची तयारीसुद्धां कच्चीच होती.

"असहाय मनस्थितींत आम्ही सराईंत परत आलों. पेशावरला निरोप पाठवावा असें रहमतखानाचें म्हणणें पडलें." "आपली अडचण त्यांना कळली तर ते दुसरा एखादा रशियनांशीं वग असलेला मनुष्य पाठवतीलही' तो म्हणाला.

"पण आपला निरोप घेऊन जाण्यासाठीं खात्रीचा मनुष्य मिळाला पाहिजे ना ?" मी म्हणालों, "आणि समजा,

आपला निरोप त्यांना मिळाला तरी ते काय करूं शकतात ? त्यांना कांहीं करतां येण्यासारखें असतें तर त्यांनीं अगोदरच केलें नसतें का ? मग आपणाला आपल्याच नशिबावर आणि कर्तबगारीवर त्यांनीं निश्चितच सोडून दिलें नसतें !"

"तरीही एकाद्या लॉरीवाल्याबरोबर पेशावरच्या एका मित्राला निरोप पाठविण्याचें आम्हीं ठरवलेंच.

"दुसऱ्या दिवशीं रहमतखान निरोप घेऊन एकादा खात्रीचा लॉरीड्रायव्हर मिळतो का तें पहायला गेला. थोड्या वेळानें तो परत आला आणि काम व्यवस्थित झाल्याचें त्यानें मला सांगितलें. पेशावरच्या आमच्या मित्राला निरोप रवाना झाला होता. पण आतां एक दुसरीच चिंता उत्पन्न झाली. त्याच दिवशीं संध्याकाळीं त्या गुप्तपोलिसाचा त्रास सुरू झाला. ती सर्व हकिकत तुम्हीं ऐकली आहेच. त्यामुळें आमच्या संकटांची अगदीं परमावधि झाली.

"पेशावरहून मदत येईल या भरंवशावर वाट पहात स्वस्थ बसणें इष्ट नव्हतें. तोंपर्यंत आपल्यालाच कांहीं हिकमत लढवतां आली तर पहावी असा मीं विचार केला आणि रहमतखानाला म्हणालों, 'पेशावरला आपला निरोप गेला आहे हें खरें पण त्याचें उत्तर कधीं येतेंय् कोणाला ठाऊक ? रशियनांनीं तर सहाय्य करण्याचें नाकारल्यासारखेंच आहे. मला मदत करायची त्यांची इच्छाच नाहीं, कीं खरोखरच माझी ओळख पटण्याची अडचण आहे तें सांगणें कठीण आहे. अशा परिस्थितींत मला वाटतें, कीं आपण

अक्षराष्ट्रांच्या वकिलाकडे शब्द टाकून पहावा हें बरें. दरम्यानच्या काळांत पेशावरच्या मित्रांनीं मास्कोला जाण्याची कांहीं व्यवस्था केली तर ठीकच, नाहींच तर अंतिम उपाय म्हणून अक्षराष्ट्रांची मदत तयार असूं दे. मला वाटतें, कीं ते लोक आपल्याला आनंदानें सहाय्य करतील आणि या देशांतून लवकरांत लवकर मला सटकतां येईल. जर्मन वकिलातीची जागा आपण अजून पाहिलेली नाहीं, पण त्याची आतां आवश्यकताही नाहीं. कारण इटालियन वकिलात कोठें आहे तें आपणाला ठाऊक आहे आणि इटालियन व जर्मन यांमध्यें फरक करण्याचें आपल्याला कारण नाहीं. म्हणून आतां तूं असें कर, इटालियन वकिलाकडे जाऊन मी आल्याची त्यांना खबर दे.' मी म्हणालों, 'मी येथें आलों आहे हें ऐकून त्यांना फार आनंद होईल आणि निश्चितच ते माझ्या प्रयाणाची व्यवस्था करतील. युरोपला जाण्याचा एकच मार्ग आहे. मास्कोवरूनच मला जावें लागेल; जमल्यास मी तेथें उतरेन नाहींतर रोम अगर बर्लिन मधील रशियन वकिलातीमार्फत मास्कोला येईन.'

"त्या रात्रीं पुन्हा आम्ही या नव्या योजनेवर विचार करीत पुष्कळ वेळ जागत बसलों" सुभाषबाबू पुढें म्हणाले, "मी या देशांतून शक्य तितक्या लवकर बाहेर पडावें हें माझें म्हणणें रहमतखानाला पटलें. दुसऱ्या दिवशीं तो माझ्या सूचनेप्रमाणें इटालियन वकिलाकडे गेला. दरवानानें त्याला अडविलें पण आपण जपानी वकिलातींतलि रखवालदार आहोंत अशी थाप ठोकून त्यानें आंत प्रवेश मिळविला.

येथील इटालियन वकील सिनोर कॅरोनी यांची गांठ घेऊन त्यानें माझ्याबाबत सर्व माहिती सांगितली. अपेक्षेप्रमाणें या बातमीनें त्याला फार आनंद झाला आणि तो रहमतखानाला म्हणाला, 'आजच्या आज ही खबर रोमला कळवितों आणि कांहीं दिवसांत पासपोर्टाचीही व्यवस्था करतों. आम्ही त्यांना शक्य तितक्या लवकर या देशांतून बाहेर नेण्याची योजना करूं."

"वकिलातींत प्रवेश मिळण्यास कशी अडचण पडते तें रहमतखानानें त्याच्या नजरेस आणलें आणि निरोप वगैरे पोंचविण्याच्या दृष्टींनें वाटेल तेव्हां जातां येतां येईल असें एकादें सोयिस्कर ठिकाण सुचविण्याबद्दल विनंति केली. तेव्हां सि. कॅरोनी यानें काबुलांत रहाणाऱ्या थॉमस नांवाच्या एका जर्मन व्यापाराचा पत्ता दिला.

'येत्या दोन दिवसांत बर्लिन किंवा रोमहून मला कांहीं-तरी निरोप येईल. तुम्ही परवांचे दिवशीं हेर थॉमसला भेटा. त्या ठिकाणीं मी एक सलिबंद पाकीट तुमच्यासाठीं ठेवीन' सि. कॅरोनी ह्यांनीं जातेवेळीं रहमतखानास सांगितलें.

"हेर थॉमस हा एक जर्मन नागरिक होता. जर्मनींतील अनेक व्यापारी कंपन्यांचा प्रतिनिधी म्हणून तो अफगाणि-स्तानांत आला होता. त्याच्या पेढीवर सर्व प्रकारचा व्यापार असल्यामुळें कोणासही सहज तेथें जातां येत असे. व्यापा-राच्या निमित्तानें त्याच्या भेटी गांठी घेतल्यानें कोणालाही संशय येण्यास जागा नव्हती. त्या वेळीं अफगाणिस्तानांत

जेवढे जर्मन नागरिक होते ते सर्व जर्मन सरकारच्या हेरगिरीचेंच काम करीत असत. धंदा किंवा व्यापार हा त्यांच्या राजकीय कार्याचा बहाणा असे.

" इटालियन वकिलानें दिलेल्या आश्वासनामुळें मला आनंद झाला. " बोसबाबू म्हणाले, " तथापि, बर्लिन किंवा रोमला जाण्यांत मला फारसा उत्साह वाटत नाहीं. परंतु आतां निवड करण्यास वावच नाहीं. जें कांहीं आम्हीं केलें आहे तें केवळ निरुपाय म्हणून, दुसरा मार्ग सापडतच नाहीं म्हणून केलें आहे. "

बोसबाबू नंतर मला म्हणाले, " तुम्ही इतके दिवसां‐पासून येथें राहतां. रशियन वाकिलातींत तुमची कोठें तरी ओळख असल्यास माझी व रशियन वकिलाची भेट घडवून आणाल काय ? "

मी म्हणालों, " मी पुष्कळ दिवसांपासून येथें रहात असलों तरी सोव्हिएट वाकिलातींत माझी कोणाशींही ओळख नाहीं. येथें कोणत्याही प्रकारचें राजकीय कार्य करण्याचा माझा हेतु नव्हता. म्हणून त्या दृष्टीनें माझा कोणाशींही फारसा संपर्क आला नाहीं. तथापि, मी प्रयत्न करीन. साधलेंच तर पाहूं या. "

" अवश्य करा " सुभाषबाबू म्हणाले, " इटालियन वकिलाबरोबर सर्व गोष्टी नक्की झाल्या तरीही रशियनांनीं मला रशियांत घेण्याचें ठरविलें तर मी रशियास अवश्य

जाईन. निश्चित झालेल्या पूर्वींच्या सर्व योजना बदलून टाकीन."

ठरलेल्या दिवशीं रहमतखान हेर थॉमसच्या दुकानीं गेला. त्या ठिकाणीं एक सीलबंद पाकीट त्यास देण्यांत आलें. पाकिटांत पुढील आशयाचा मजकूर होता:—

"आपलें पत्र मिळालें त्याच दिवशीं मीं रोम व बर्लिनकडे आपल्या आगमनाची वार्ता कळविली. ही वार्ता ऐकून उभय राजधानींतील जबाबदार अधिकाऱ्यांनीं आनंद व्यक्त केला असून आपण अत्यंत चातुर्यानें शत्रूच्या हातावर तुरी दिल्याबद्दल ते आपलें अभिनंदन करीत आहेत. आपणांस सर्वतोपरी सहाय्य करण्याबद्दल मला फर्माविण्यांत आलें आहे. थोड्याच दिवसांत आपल्या प्रयाणाची तयारी पूर्ण होईल.

आपला
कॅरोनी"

दुसरे दिवशीं हेर थॉमस मार्फत सुभाषबाबूंनीं पुढील पत्र पाठविलें:—

"आपला संदेश पोचला. आनंद झाला. परवाना मिळविण्यासाठीं आपण जे प्रयत्न करीत आहांत त्याबद्दल आभारी आहें. परंतु शक्य तितक्या लवकर परवाना मिळविण्याची खटपट करावी. कारण, सध्यां मी ज्या ठिकाणीं राहतों त्या ठिकाणीं राहणें फार धोक्याचें आहे. माझें अभिनंदन करणाऱ्या रोम व बर्लिनच्या जबाबदार व्यक्तींना माझा प्रणाम कळवा."

६

## शेजारी घाबरला !

फेब्रुवारीची पांचवी तारीख उजाडली. एकाच जागीं रात्रंदिवस बसून रहमतखान कंटाळला. 'मी तुमच्या बरोबर बाजारांत फेरफटका करतों, हेर थॉमसच्या दुकानींही कांहीं निरोप आला कीं नाहीं तें पाहतों' असें तो मला म्हणाला, परंतु बोसबाबूंनीं त्यास तसें करण्यास संमति दिली नाहीं. मीही रहमतखानाला बाहेर न पडण्याविषयीं बजावलें. समजा, गुप्तपोलिसखात्याच्या त्या लोभी माणसानें तुम्हांला पाहीलें तर–? हेर थॉमसच्या दुकानांत मी जाईन, कांहीं निरोप असेल तर तो घेऊन येईन, असें आश्वासन मीं त्याला दिलें.

मी स्वत: रेडिओचा व्यापारी असल्यामुळें काबूलला रेडिओचा व्यापार करणारी एक जर्मन कंपनी आहे हें मला

माहीत होतें. परंतु तें हेर थॉमसचेंच दुकान आहे हें मात्र मला माहीत नव्हतें. हेर थॉमसचा पत्ता शोधून काढल्यानंतर बोसबाबूंना मीं असें सुचविलें, कीं हेर थॉमसच्या दुकानीं नेहमीं नेहमीं जाऊन संशयित वातावरण निर्माण करण्यापेक्षां माझ्याच दुकानांतून निरोप नेण्याची व ठेवण्याची व्यवस्था करण्यांत आली तर तें अधिक बरें होईल. मी रेडिओचा व्यापारी आहें हें जगजाहीर असल्यामुळें माझ्या दुकानीं कोणीही आलें तरी माझ्याविषयीं कोणासही संशय येणार नाहीं.

बोसबाबूंनीं दुसरे दिवशीं सि. कॅरोनीस एक पत्र लिहिलें.

"सराईंत कांहीं धोका वाटल्यावरून आम्ही एका स्नेह्याच्या घरीं राहाण्यासाठीं गेलों आहोंत. ह्या स्नेह्याचें नदी किनाऱ्यावरच्या नव्या इमारतींत रेडिओचें दुकान आहे. रहमतखान हेर थॉमसच्या दुकानीं दुसऱ्यांदा गेला, पण आपलेकडून अद्याप कांहींच निरोप आला नाहीं. माझ्या परवान्याबाबत आपण सर्व तयारी केली असेल अशी आशा आहे. आपल्याकडून लवकर निरोप येईल अशी अपेक्षा करतों. माझ्यासाठीं कांहीं निरोप असेल तर माझ्या स्नेह्याच्या दुकानीं ठेवावा. हेर थॉमसच्या दुकानावर दररोज माणूस पाठविणें इष्ट नाहीं."

बोसबाबूंचें हें पत्र मीं घेतलें, त्यांच्या खोलीस कुलूप घातलें, चावी पत्नीच्या स्वाधीन केली व माझ्या दुकानावर गेलों. दुपारीं बारा वाजतां हेर थॉमसच्या पेढीवर गेलों. पेढीचें

काम संपवून तो नुकताच कचेरीबाहेर आला होता. तो जेवणास जाण्याच्या तयारींत असतांनाच मी त्याला भेटलों. ‘कांहीं जरुरीच्या कामासाठीं मला हेर थॉमसची गांठ घ्यावयाची आहे’ असें मीं त्याला सांगितलें. त्यानें मला आपल्या कचेरीच्या खोलींत नेलें. ‘मीच हेर थॉमस आहें; बोला.’ असें तो म्हणाला. बोसबाबूंचें पत्र मीं त्याचे हातीं दिलें. ‘त्यांचेसाठीं कांहीं निरोप आहे काय?’ असा प्रश्न करतां त्याचें नकारात्मक उत्तर मिळालें.

त्याच दिवशीं तिसरे प्रहरीं हाजीसाहेब माझे दुकानीं आले. बोसबाबूंविषयीं त्यांनीं चौकशी केली. “एकदां तरी मला त्यांची भेट घेऊं द्या” असें अत्यंत अजीजीच्या स्वरांत त्यांनीं मला विनविलें. त्यांनीं बोसबाबूंची भेट घ्यावी असें मला मुळींच वाटत नव्हतें. परंतु माझ्या घरीं ते राहातात हें त्यांना ठाऊक असल्यामुळें त्यांना नाराज करणेंही श्रेयस्कर नव्हतें. म्हणून मी म्हणालों, “ह्या बाबतींत मी बोसबाबूंना विचारीन. त्यांनीं जर संमति दिली तर उद्यां मी तुम्हांला त्यांचेकडे घेऊन जाईन.”

रात्रीं आम्ही पुन्हा राजकारणावर चर्चा केली. थोडा वेळ रेडिओही ऐकला. रेडिओ लावीत असतांना सहजच कलकत्ता केंद्र लागलें. बंगाली गाणीं चालू होतीं. थोडा वेळ बोसबाबूंनीं तीं गाणीं ऐकलीं. पण लगेच मला दुसरें स्टेशन लावण्यास त्यांनीं सांगितलें. चालू असलेलें संगीत फारच भावमधुर असल्यामुळें स्टेशन बदलण्याबद्दल मीं थोडी फार नापसंती दर्शविली. बोसबाबू म्हणाले, “माझ्याशिवाय

तुमच्यापैकीं कोणासही बंगाली येत नाहीं. अशा परिस्थितींत बंगाली गाणीं सुरू झालीं तर तुमच्या शेजाऱ्यांना सहज संशय येईल. ”

हेर थॉमस आणि हाजीसाहेब ह्यांच्याशीं झालेलें बोलणें मीं बोसबाबूंना निवेदन केलें. कोणाचीही भेट घेण्याचें त्यांच्या मनांत नव्हतें. परंतु त्यांच्या वास्तव्याचा सुगावा हाजीसाहेबांस आहे हें मीं त्यांना सांगितल्यानंतर दुसरे दिवशीं हाजीसाहेबांची भेट घेण्यास बोसबाबू तयार झाले.

ता. ६ रोजीं एक चमत्कारिक घटना घडली. त्या घटनेनें आम्हां सर्वांस अस्वस्थ केलें. आम्ही सकाळचा चहा घेत बसलों होतों. तळमजल्यावर राहाणारे आमचे एक शेजारी त्याच वेळीं जिन्यावरून उतरत होते. माझ्या छोट्या मुलीच्या चुकीमुळें आम्ही ज्या खोलींत बसलों होतों त्या खोलीचें दार उघडें राहिलें होतें. आमच्या शेजाऱ्यानें जातांना आम्हांला पाहिलें. त्यांनीं आम्हांला पाहिल्याचें फार उशिरां आमच्या लक्षांत आलें. पण, त्यावेळीं लक्षांत येऊन उपयोग नव्हता !

त्या शेजाऱ्यास आम्ही श्री. ‘ आर ’ असें म्हणत असूं. बोसबाबूंना पाहिल्याबरोबर त्याचें धाबें दणाणलें. त्याची मुद्रा विवर्ण झाली. तो स्तंभितच झाला. कांहीं क्षण त्याला जागचें हालतांही आलें नाहीं. बोसबाबूंना त्यानें ओळखलें ह्याविषयीं माझी खात्री झाली. बोसबाबूंनाही धक्का बसला. “दार उघडें ठेवण्यांत फारच घोडचूक झाली ” असें ते म्हणाले.

श्री. 'आर' ह्यांचा व माझा दाट स्नेह होता. बोसबाबूंना त्यांनीं ओळखलें असलें तरी त्यापासून कांहीं अपाय होईल असें मला मुळींच वाटलें नाहीं. बोसबाबूंच्या अंतर्धानाबाबत आम्ही पुष्कळ वेळा. बोललों होतों. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्याच्या प्रश्नाबाबत आमची अनेक वेळां चर्चाही झाली होती.

सुभाषबाबूंनीं वेष पालटलेला होता. लांब दाढीचें जाळें पसरल्यामुळें त्यांचा चेहेराही बदललेला दिसत होता. त्या वेषांत त्यांना ओळखणें कठिण होतें. त्यांच्या मुद्रेशीं कायमची संलग्न झालेली चाळिशी डोळ्यांवर असेल तर त्यांना ओळखतां येत असे; आणि नेमक्या त्याच वेळीं बोसबाबूंनीं चष्मा लावलेला होता.

त्या दिवशीं दुकानावर जात असतांना डोक्यांत विचारांचें सारखें काहूर माजलें होतें. श्री. 'आर' ह्यांनीं बोसबाबूंना पाहिलें. बोसबाबू माझ्या घरीं राहातात हें त्यांना समजलें. पण, त्यांना नुसतें समजण्यावरच ही गोष्ट थांबली नाहीं. ते घाबरले आहेत, पुढें काय करावें ह्यासंबंधीं कोणा तरी स्नेह्याचा सल्ला घेण्यासाठीं ते गेले आहेत असें मला वाटलें. आतां पुढें काय करावें ? त्या दिवशीं मी दिवसभर भटकलों. श्री. 'आर' ह्यांच्या कांहीं मित्रांना कारण नसतांनाही भेटलों. वाटलें, त्या निमित्तानें तरी त्यांच्या हालचालींचा, त्यांच्या मनःस्थितीचा पत्ता लागेल. पण, ह्या भटकंतीचा कांहीं उपयोग झाला नाहीं.

सायंकाळीं मी हाजीसाहेबांना घेऊन आलों. बोसबाबूंची व त्यांची मुलाखत ठरलेली होती. घरीं येतांच मला समजलें, कीं श्री. 'आर' हे आजारी आहेत. त्यांना अतिसार झाला असून ते कांहीं काळ बेशुद्धही झाले होते.

फेब्रुवारीची सात तारीख उजाडली. श्री. 'आर' सकाळींच माझ्याकडे आले. ते खूपच भेदरून गेलेले दिसत होते. "ह्या पुढें मला ह्या घरांत राहातां येणार नाहीं" ते म्हणाले, "मला भीति वाटते. म्हणूनच मी आजारी पडलों."

"ह्या घरांत भिण्यासारखें कांहीं आहे असें मला वाटत नाहीं" मीं त्यांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. पण त्यांना तें पटेना. ते म्हणाले, "ह्या घरांत एखादें भूत असावें असें मला वाटतें. मीं कदाचित त्याला प्रक्षुब्ध केलें असावें अशीही शंका मला येऊं लागली आहे."

"व्यक्तिशः माझा ह्या गोष्टींवर विश्वास नाहीं." त्यांच्या अंतःकरणाचा ठाव घेण्याच्या उद्देशानें मी म्हणालों, "घर सोडून जाण्याच्या मुळाशीं कांहीं तरी निराळेंच कारण असावें."

"तुमचा विश्वास असो किंवा नसो, माझा मात्र विश्वास आहे" श्री. आर. उत्तरले.

"पण, तुम्ही खरें कां बोलत नाहीं?" निग्रही स्वरांत मीं विचारलें.

"खरें सांगायचें म्हणजे हें घर सोडावें असा माझ्या पत्नीचा आग्रह आहे" श्री. 'आर.' ह्यांनीं कबुलीजबाब

दिला, "ती म्हणते, तीन चार दिवसांपासून दोन अनोळखी माणसें तुमच्या घरीं राहूं लागलीं आहेत. अशा घरांत राहाण्याची तिची इच्छा नाहीं."

"माझ्या घरीं दोन पाहुणे राहात आहेत हें खरें आहे" मीही स्पष्ट स्पष्ट सांगण्याच्या इराद्यानें उत्तरलों, "हे पाहुणे लाघमनचे राहाणारे असून माझ्या आप्तांतले आहेत. त्यांपैकीं एक येथें औषधोपचार करण्यासाठीं आले असून त्यांना हिंडण्याफिरण्याची डॉक्टरांनीं बंदी केली आहे. थोड्या दिवसांतच ते जातील. माझ्या घरांत पाहुणे आहेत म्हणून ह्या घरांत राहाण्यास तुमच्या पत्नींना संकोच वाटत असेल तर मला एवढेंच सांगावयाचें आहे, कीं तुमची पत्नी एकटीच ह्या घरांत राहात नाहीं. मलाही बायको–मुलें आहेतच."

"रागावूं नका" माझा चढलेला पारा लक्षांत येतांच 'आर' म्हणाले, "म्हणूनच मी सत्य सांगण्यास कचरत होतों. माझी सध्यांची प्रकृति लक्षांत घेतां मी ह्या घरांत आणखी कांहीं दिवस राहिलों तर तुम्हांला माझ्या जगण्याची आशा सोडवी लागेल. घरभाड्याची आपण चिंता करूं नका. घर सोडून गेल्यावरही पूर्वीप्रमाणेंच मी माझ्या वाट्याचें घरभाडें भरीत राहीन."

त्यानंतर लवकरच श्री. 'आर' ह्यांनीं घर सोडलें. ते घर सोडून गेल्याबद्दल मला थोडें समाधान वाटलें. पण, पुन्हा पुन्हा वाटे, हा आपल्याला धोक्यांत तर आणणार

नाहीं नाहीं तो घरीं असतांना जर कांहीं अनिष्ट घडलें असतें तर त्यांत तोही गोवला गेला असता. तो घर सोडून गेला तरीही धोका कमी झाला असें मात्र वाटेना. श्री. 'आर' घर सोडून गेल्यानंतर बोसबाबू व रहमतखान ह्यांनीं कांहीं दिवस सराईंत जाऊन रहावें असें आम्हीं ठरविलें. दोन तीन दिवसांत कांहीं अनिष्ट प्रकार घडला नाहीं तर त्यांनीं पुन्हा परत यावें असें आम्हीं योजिलें. श्री. 'आर' ह्यांनीं दगा दिला तरी बोसबाबूंच्या सुरक्षिततेंत बाधा येऊं नये एवढाच ह्या योजनेच्या मुळाशीं माझा हेतु होता.

मीं अमरनाथबरोबर रहमतखानाला शहरांत पाठविलें. एखाद्या सराईंत चांगली खोली ठरविण्याविषयीं मीं त्यांना सांगितलें. दोन तीन धर्मशाळा धुंडल्यानंतर एका धर्मशाळेंत त्यांनीं एक खोली ठरविली. जरूरी सामान बरोबर घेऊन बोसबाबू व रहमतखान ह्यांनीं धर्मशाळेंत बिऱ्हाड थाटलें.

श्री. 'आर' घर सोडून गेल्यानंतर दुसरे दिवशीं त्यांचे एक मित्र मला भेटले. त्यांनीं माझ्यावर प्रश्नांचा भडिमार केला. 'आर' ह्यांनीं घर कां सोडलें ? तुमचें व त्यांचें भांडण झालें काय ? तुमच्या व त्यांच्या पत्नींचा खटका उडाला काय ? अशा प्रकारच्या अनेक प्रश्नांची सरबत्ती त्यांनीं माझ्यावर केली. "मला कांहींच माहिती नाहीं. आपण हेच प्रश्न श्री. 'आर' ह्यांना केल्यास आपणास त्याचें उत्तर मिळेल" मीं शांतपणें त्यांना सांगितलें.

त्या दिवशीं रहमतखान तीन वेळां दुकानावर आला. इटालियन वकिलातीकडून कांहीं निरोप आला किंवा नाहीं ह्याची त्यानें चौकशी केली. निरोप आलाच नव्हता. निरोप येतांच मी अमरनाथबरोबर तुमच्याकडे पोचता करीन असें मीं त्यास सांगितलें.

सायंकाळीं मी घरीं आलों. सौ. 'आर' घरीं आल्या होत्या असें मला समजलें. सहज बोलतां बोलतां त्यांनीं आमच्या घरच्या पाहुण्यांची माहिती विचारली. "तुमच्या पतीच्या वागणुकीमुळें त्यांना स्वतःचा अपमान झाल्यासारखा वाटला व त्याच दिवशीं ते आपल्या गांवीं निघून गेले." माझ्या पत्नीनें सौ. 'आर' ह्यांना अगदीं सहज टोमणा दिला. 'तुमच्या पतीनें असें वागावयास नको होतें.' ह्या उत्तरानें सौ. 'आर' चकितच झाल्या. "माझ्या पतीनें तुम्हांला राग आणण्यासारखें असें केलें तरी काय?" त्यांनीं प्रश्न केला.

"आणखी काय करायला पाहिजे होतें?" माझी पत्नी जरा चढत्या आवाजांत उत्तरली, "त्यांनीं आम्हांला लाजेनें मान खालीं घालावयास लावली. आमच्या घरांत जे पाहुणे आहेत ते दिवसासुद्धां बाहेर जात नाहींत म्हणून माझी पत्नि ह्या घरांत राहूं इच्छित नाहीं असें त्यांनीं स्पष्टपणें आम्हांला बजावलें."

"बहेन, शपथपूर्वक सांगतें, मला ह्यांतलें कांहींच माहीत नाहीं" सौ. आर म्हणाल्या, "त्यांनीं जें काय सांगितलें असेल तें त्यांनीं स्वतःच्या पुरतेंच सांगितलें.

दिवसाही बाहेर न जाणारे दोन पाहुणे तुमच्या घरीं आहेत ह्याची मला गंधवार्ताही नव्हती."

पूर्वीचाच स्वर कायम ठेवून माझी पत्नी म्हणाली, "तुमच्या पतीनीं असें करावयास नको होतें. मीं जें सांगितलें तें खरें आहे किंवा नाहीं हें तुम्ही हवें तर विचारा."

"अवश्य विचारीन" सौ. आर म्हणाल्या, "तथापि ते असें कांहीं म्हणाले असतील तर मी क्षमा मागतें."

थोडा वेळ थांबून त्या म्हणाल्या, "कलकत्त्याची एक महान् व्यक्ति एकाएकीं फरारी झाली आहे हें तुम्हांला माहीत असेलच!"

"होय, रेडिओवर अशा कांहीं तरी बातम्या सांगतात खऱ्या. पण, त्याचें आतां काय?" माझ्या पत्नीनें विचारलें.

"कांहीं नाहीं. सहजच! मीं असेंही ऐकलें आहे, कीं सरकार त्यांचा शोध लावण्याचा कसून प्रयत्न करीत आहे" सौ. आर सहज बोलल्यागत बोलून गेल्या.

"सरकार शोध करीत असेल. पण मला काय त्याचें?" माझ्या पत्नीनें पुन्हा सवाल केला व बोलत बोलत सर्व घरांतून सौ. आर ह्यांना फिरविलें. आमच्या घरांतील पाहुणे खरोखरच घर सोडून गेले आहेत हें 'आर' बाईंना पटवून देण्याचा तिचा उद्देश होता.

नऊ तारखेला इटालियन वकिलाची बायको माझ्या घरीं आली. तिनें माझें नांव विचारलें. मीं माझें नांव सांगितल्यानंतर

तिनें एक मोहरबंद लखोटा माझ्या हातीं दिला. " मी इटालियन वकिलाची बायको आहे. हें पत्र तुम्ही तुमच्या मित्रास द्या. ते तुमच्याबरोबर रहात आहेत ह्याबद्दल मला फार आनंद वाटतो. ह्यापूर्वीचें त्यांचें पत्र तुम्हींच हेर थॉमसकडे दिलें होतें नाहीं का ? त्यांचे सर्व निरोप तुमच्या मार्फत पाठवावेत असें त्यांनीं त्या पत्रांत सुचविलें होतें. मी परवांचे दिवशीं ह्या पत्राचें उत्तर घेऊन जाण्यासाठीं येईन." श्रीमती क्रॅरोनी ह्यांनीं वरील शब्दांत निरोप घेतला. त्यांनीं आणलेल्या पत्रांत पुढील मजकूर होता.

> " आपलें पत्र पोचलें. आपण सराईतून आपल्या मित्राच्या घरीं गेलां हें वाचून समाधान वाटलें. आपल्या सूचनेप्रमाणें आपले सर्व निरोप आपल्या मित्राच्या दुकानावर पोचते करण्यांत येतील. त्याचप्रमाणें आपल्या कडील निरोपही तेथूनच घेऊन जाण्याची व्यवस्था होईल. आपला आभारप्रदर्शक संदेश मी रोम व बर्लिनला कळविला आहे. परवाना मिळविण्यासाठीं आम्ही आटोकाट प्रयत्न करीत आहोंत. मास्को येथील आमच्या वकिलातीस ह्या बाबत आम्हीं कळविलें आहे. त्यांचेकडून व्यवस्था होतांच मी आपणास कळवीन. "

मी रहमतखान ह्यास बोलाविलें व आलेलें पत्र त्याला दिलें. सौ. 'आर' व माझी पत्नी ह्यांच्यांत जें संभाषण झालें तेंही मीं त्यास सांगितलें. त्या दिवशीं श्री. 'आर' ह्यांचें कांहींच वर्तमान समजलें नाहीं.

आपल्या सर्व मित्रांना घर सोडण्याचें खरें कारण त्यांनीं सांगितलेंच नाहीं. एखाद्यानें फारच चौकशी केली तर ठराविक साच्याचें उत्तर ते देत असत. "मी एकाएकीं आजारी पडलों म्हणून घर सोडलें!" माझी पत्नी व सौ. 'आर' ह्यांचें जें बोलणें झालें त्यामुळें मी बराच अस्वस्थ झालों होतों. श्री. 'आर' ह्यांनीं आपल्या पत्नीस सर्व हकिकत सांगितली होती हें उघड होतें.

ह्या अस्वस्थतेंच फेब्रुवारीची दहा तारीख उजाडली. सकाळीं भाजी घेण्यासाठीं मी बाजारांत गेलों. वाटेंत श्री. 'आर' आपल्या धाकट्या मुलासह जातांना दिसले. "तुम्ही एकदम हवेंतच विलीन झालांत कीं काय? तुम्हांला मीं किती शोधलें पण तुमचा पत्ताच लागला नाहीं. राहातां तरी कुठें? तुमचें नवें घर कुठें आहे?" मीं त्यांना सवाल केला.

"नव्या घरीं गेल्यापासून मी आजारीच आहें" श्री. 'आर' उत्तरले, "काल उशिरानें मी दुकानावर गेलों; तरीही प्रकृति बरी नव्हती म्हणून पुन्हा घरीं परत आलों. माझें नवें घर....ठिकाणीं आहे. सध्यांच दुसरी चांगली जागा मिळत नसल्यामुळें मीं तें तात्पुरतें भाड्यानें घेतलें आहे."

"तुम्हीं घर कां सोडलें हें माहीत आहे मला" मी म्हणालों, "तुम्ही तें कबूल करणार नाहीं. परंतु तुमच्या पत्नीनें माझ्या पत्नीस जें कांहीं सांगितलें त्यावरून मला सर्व गोष्टी समजल्या आहेत. भीतीनें तुम्हांला पछाडलें आहे. बोसबाबूंना पाहिल्याबरोबर तुमचा चेहेरा फिक्का पडला त्याचवेळीं तुम्हीं त्यांना ओळखलें हें मी समजून चुकलों!"

"ते खरें असलें तरी मी सत्य तुम्हांला कसें सांगू ?" श्री. 'आर' उत्तरले, "त्या दिवशीं तुम्ही सर्व चहा घेत होतां. मी अचानक जिन्यावरून खालीं उतरत होतों. खोलीचें दार उघडें होतें. मीं बोसबाबूंना तात्काळ ओळखलें. मी घाबरलों. सरकार डोळ्यांत तेल घालून त्यांचा शोध करीत असेल. विशेषतः अफगाणिस्तान हा सरहद्दीवरचा प्रदेश. ह्याच देशांतून हिंदुस्थानांतील अनेक क्रांतिकारक हिंदुस्थानांतून फरारी होऊन मास्कोला गेले हें मला माहीत होतें. त्यामुळें ह्या देशांतही बोसबाबूंचा अजून शोध चालला असेल असें मला वाटलें. अशा परिस्थितींत ते जर तुमच्या घरांत सापडले तर त्याचे परिणाम काय होतील त्याची मला कल्पना होती. मी कुटुंबवत्सल माणूस आहें. मला लहान लहान मुलें आहेत. बोसबाबू येथें सापडले असते तर त्याचे भयंकर परिणाम भोगण्याची माझी तयारी नव्हती. तुमच्या आणि तुमच्या पत्नीच्या धैर्याविषयीं मला फारच आदर वाटला."

"पण, तुमच्या ह्या अविचारी कृत्यानें फारच हानी झाली." मी म्हणालों, "बोसबाबूंची ओळख पटतांच तुमची गाळण उडाली व तुम्ही घर सोडून गेलां हें बोसबाबूंना समजतांच ते अत्यंत अस्वस्थ झाले व त्याच दिवशीं ते आमचें घर सोडून गेले. ह्यावेळीं ते कोठें आहेत त्याचा अद्याप पत्ता लागला नाहीं. आसरा मिळविण्यासाठीं त्यांना कोठें कोठें फिरावें लागत आहे कोणास ठाऊक ?"

श्री. 'आर' बरेच वरमले. त्यांना आपल्या चुकीची जाणीव झाली. ते म्हणाले, "चूक तर झाली. पण आतां पुढें काय करावें ?"

"आतां आपण काय करणार ?" मी म्हणालों, "बोसबाबू आले; माझ्या घरीं त्यांना कांहीं दिवस आश्रय मिळाला; ते निघून गेले. कदाचित् अद्यापही ते ह्या शहरांत असतील. पण एक गोष्ट मात्र मी निश्चितपणें सांगतों, त्यांना जर येथें अटक झाली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी, त्याचें पातक तुमच्याच माथीं येईल हें लक्षांत ठेवा."

---

## ७

# "रशियाच सहाय्य करूं शकेल"

दुपारीं बारा वाजतां मी दुकानावर गेलों. त्याचवेळीं रहमतखान आला. त्याचा चेहेरा खूपच उतरलेला दिसत होता. मला काळजी वाटूं लागली. मी लगेच रहमतखानला बोसबाबूंच्या प्रकृतीविषयीं विचारलें. बोसबाबू आजारी असल्याचें त्यानें सांगितलें. बाजारी अन्न, सुकी रोटी व कबाब ह्याशिवाय बाजारांत दुसरें कांहींच मिळत नव्हतें. त्या अन्नानें त्यांची प्रकृति बिघडली. त्यांना अतिसार झाला. अशा परिस्थितींत चांगलें अन्न देणें व औषधोपचार करणें ह्या दोन्हीही गोष्टी अशक्यप्रायच होत्या. म्हणून त्याबाबतींत काय करावें ह्याबाबत माझा सल्ला विचारण्यासाठीं रहमतखान दुकानावर आला होता.

मलाही कांहीं सुचेना. "मी काय सांगूं?" रहमतखानला

मी म्हणालों, “श्री. ‘आर’ संबंधींची सर्व हकिकत मीं सांगितली आहे. त्याचेकडून मला अद्यापही धोका वाटतो. पण अशा परिस्थितींत बोसबाबूंनीं धर्मशाळेंत रहावें हेंही मला अनिष्ट वाटतें. त्यांची प्रकृति बिघडलेली आहे. वाईट अन्नानें ती आणखी ढासळेल. तूं त्यांना पुन्हा आमच्या घरीं घेऊन ये. आपण औषधोपचार करूं. ते लवकरच बरे होतील असें मला वाटतें.”

रहमतखानलाही तें पटलें. सायंकाळीं सात वाजतां बोसबाबूंना घरीं घेऊन येण्याचें त्यानें कबूल केलें.

सायंकाळीं साडे सात वाजतां ते दोघेही माझ्या घरीं आले. आमच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांपैकीं कोणासही तें समजलें नाहीं. अतिसाराचा त्यांच्या शरीरावर चांगलाच परिणाम झाला होता. ते खूपच फिक्कट दिसत होते. एक दोन दिवस औषधोपचार केला तेव्हां त्यांची प्रकृति पुन्हा पहिल्यासारखी झाली.

माझ्या घरीं परत आल्यापासून बोसबाबू आणि रहमतखान खूपच निष्काळजीपणानें जीवन कंठीत होते. पूर्वी-प्रमाणेंच दुकानावर जाते वेळीं मी बोसबाबूंच्या खोलीस कुलूप लावीत असें. कुलपाची चावी पत्नीच्या हवालीं करून दुकानावर जात असें. त्यांच्या वास्तव्याबद्दल कोणासही थोडासुद्धां संशय येणार नाहीं ह्याची खबरदारी माझी पत्नी घेत असे. बोसबाबू खोकूं लागले, कीं त्याच वेळीं ती कांहीं तरी मोठा आवाज करीत असे. त्या

आवाजांत त्यांचें खोकणें विरून जाई. काबुलांत त्या वेळीं खूप थंडी होती. दुपारच्या प्रहरीं आसपासच्या बायका गच्चीवर उन्हांत बसत असत. त्यांच्या कानीं बोसबाबूंचें खोकणें जाऊन संशय निर्माण होणें सहज शक्य होतें. परंतु माझ्या पत्नीच्या खबरदारीमुळें तसें कांहींच घडलें नाहीं.

एक आठवडा गेला. इटालियन वकिलातीकडून कांहींच निरोप आला नाहीं. कॅरोनीची पत्नी एकदोन वेळां माझ्या दुकानावर आली. पण तिनें कोणताच निरोप आणला नाहीं. परवान्याबाबत मीं तिला अनेकदां विचारलें. ती म्हणे, "आम्ही रोमला वरचेवर याद देत आहोंत. परंतु उशीर कां लागत आहे हेंच समजत नाहीं. ह्या उशिराचें समाधानकारक उत्तरही मिळत नाहीं."

बोसबाबूंची प्रकृति सुधारली. रहमतखान पुन्हा बाजारांत हिंडू फिरूं लागला. आणखी एक आठवडा असाच गेला. बोसबाबू अधीर झाले. त्यांनीं हेर थॉमस मार्फत कॅरोनीस पाठविण्यासाठीं एक पत्र मला दिलें.

"सुमारें तीन आठवड्यांपासून तुमचा माझा संपर्क आला आहे. गेल्या दोन आठवड्यांत आपल्याकडून एकही पत्र आलें नाहीं. मास्को येथील इटालियन व जर्मन वकिलातींना माझ्या परवान्याची व्यवस्था करण्यासाठीं सांगण्यांत आलें आहे असें आपण मला सांगितलें. परंतु त्या गोष्टीसही आतां बरेच दिवस झाले. अशा परिस्थितींत बेमुदत काळ कंठणें अशक्य आहे. तरी आपण शक्य तितक्या लवकर

मला परवाना मिळवून देण्याची खटपट करावी." असें त्या पत्रांत नमूद करण्यांत आलें होतें.

दुसरे दिवशीं सिनोरा कॅरोनी माझ्या दुकानीं आली. मीं तिला बोसबाबूंचें पत्र दिलें. त्यानंतर लगेच दुसरे दिवशीं ती पुन्हा आली. तिनें बोसबाबूंसाठीं एक मोहरबंद. लखोटा माझ्या स्वाधीन केला. " तुमच्या परवान्यासाठीं खटपट चालू आहे. आपल्या पत्राची एक प्रत रोमला पाठविण्यांत आली आहे. मास्कोंत परवान्याबाबत कांहीं तरी बांधा निर्माण झाला आहे असें मला वाटतें. मास्कोहून अधिक माहिती कळतांच मी आपणास कळवीन." असें आश्वासन इटालियन वकिलानें ह्या पत्रांत दिलें होतें.

"रशियन वकिलातीशीं संधान बांधण्याचा तुम्ही प्रयत्न केला काय ?" इटालियन वकिलाचें पत्र वाचतांच बोस-बाबूनीं मला विचारलें. " मीं पुष्कळ प्रयत्न केला परंतु मला यशाच आलें नाहीं." मी म्हणालों, " एक रशियन नागरिक माझ्या दुकानीं रेडिओ-सेट घेण्यासाठीं आला होता. त्याच्याशीं थोडें फार संधान बांधण्याचा मीं प्रयत्न केला. परंतु राजकारणावर बोलण्यास त्यानें स्पष्ट नकार दिला. मीं माझ्या इतर दुकानदार मित्रांनाही ह्या बाबत चौकशी करण्यास सांगितलें आहे. परंतु त्यांना ह्या कामांत यश येईल असें मला वाटत नाहीं."

"तर मग असें करा," बोसबाबू म्हणले, "तुमची आणि रशियनांची चांगली ओळख असेल तर मी रशियन वकिलाच्या नांवानें एक पत्र देतों. तें पत्र निदान रशियन वकिलास

पोचतें करण्याविषयीं तरी त्यांना सांगा. मात्र रशियन वकिलास प्रत्यक्ष हें पत्र देण्याचें आश्वासन देणाऱ्या इसमाच्याच हातीं तें द्या."

मीं तसें करण्याचें आश्वासन दिल्यानंतर त्यांनीं रशियन वकिलास एक विस्तृत पत्र लिहिलें. त्या पत्रांत हिंदुस्थानांतून फरारी झाल्यापासून तों काबूलपर्यंतच्या प्रवासची हकिकत बोसबाबूंनीं नमूद केली. रशियन वकिलाची मोटार रस्त्यांत थांबविण्याचा त्यांनीं केलेल्या प्रयत्नाचाही उल्लेख ह्या पत्रांत करण्यांत आला होता. शेवटीं एकादां भेट देण्याची विनंती करून पत्राचें उत्तर माझ्या दुकानावर पोचतें करण्याची सूचना त्यांनीं केली होती.

मीं तें पत्र घेतलें. माझ्या व माझ्या मित्रांच्या ओळखीच्या रशियन नागरिकांची गांठ घेतली. पण एकानेंही तें पत्र घेण्याचें कबूल केलें नाहीं.

रशिया-जर्मनीचें सख्य कायम होतें. दररोज एक एक राष्ट्र जर्मनी काबीज करीत होता. दर आठवड्यास जर्मन व इटालियन वकिलातींवर विजयोत्सव साजरे करण्यांत येत. मेजवान्याही झडत असत. रशियन व जपानी वकील आणि नागरिक ह्या मेजवान्यांस हजर रहात असत. मधून मधून रशियन वकीलही एखादी मेजवानी देत असे.

त्या दिवसांत काबुलांत एक जर्मन नागरिक होता. त्याचें नांव × × होतें. जर्मनीच्या कांहीं रंग व औषधी कारखान्यांचा प्रतिनिधी म्हणून तो काम करीत असे.

काबुलांतील एक रंगाचा व्यापारी माझा मित्र होता. त्याच्या मार्फत मीं त्या जर्मन गृहस्थाची ओळख करून घेतली. रशियन वकिलातीवर झालेल्या एका मेजवानीस तो नुकताच जाऊन आला होता. आणखीही एका मेजवानीस जाण्याचा त्याचा विचार होता. मीं त्याला माझें काम सांगितलें. रशियन वकिलास प्रत्यक्ष एक लखोटा नेऊन देण्याची मीं त्याला विनंती केली. ती त्यानें मान्य केली. परंतु लगेच दुसरे दिवशीं त्यानें नकार दिला. "रशियन वकिलाशीं प्रत्यक्ष कोणतेही व्यवहार करण्यास आमच्या वकिलानें बंदी केली आहे" असें त्यानें मला सांगितलें. रशियन वकिलाशीं कोणाचेंही काम असेल तर त्यानें जर्मन वकिलामार्फत व्यवहार करावा असें जर्मन नागरिकांना फर्मांविण्यांत आलें होतें. "तुमची अनुमति असेल तर मी प्रथम जर्मन वकिलास विचारीन. त्यानें परवानगी दिलीच तर मी तुमचें पत्र रशियन वकिलास देईन." असें त्यानें मला सांगितलें.

पण, त्याची ही अट मान्य करणें शक्य नव्हतें. आपण रशियन वकिलातीशीं संधान बांधीत आहों हें गट्टी राष्ट्रांना कळूं नये अशी बोसबाबूंची इच्छा होती.

दोन दिवसांनंतर सिनोरा कॅरोनीनें एक पत्र दिलें. ह्या पत्रांत बोसबाबूंच्या परवान्यास लागणाऱ्या उशिराबाबत खुलासा करण्यांत आला होता. रशियन प्रदेशांतून बर्लिन किंवा रोमला जाण्यासाठीं बोसबाबूंना परवाना देण्यांत यावा अशी मास्को येथील जर्मन व इटालियन वकिलातीनें

मागणी केली होती. रशियानें बऱ्याच कटकटीनंतर ती मान्य केली आहे असें सदर पत्रद्वारें कळविण्यांत आलें होतें. "रोमहून आपल्यासाठीं 'कोरियर्स' रवाना झाले असून ते लवकरच येथें येतील" असा आणखी एक वायदा इटालियन वकिलानें केला होता.

"ही 'कोरियर्स'ची भानगड काय आहे?" पत्र वाचून होतांच मीं बोसबाबूंना विचारलें.

"कोरियर्स म्हणजे दूत. माझ्यासाठीं परवाना मिळविण्यांत त्यांना यश आलें नसावें. म्हणून इटालीहून कांहीं 'दूत' रवाना झाले असतील आणि रोम व बर्लिनला जातांना मला त्यांच्याच नांवावर प्रवास करावा लागेल असा एकूण रंग दिसतो!" बोसबाबूंनीं स्पष्टीकरण केलें.

आणखी एक आठवडा गेला. इटालियन वकिलातीकडून कांहींच निरोप आला नाहीं. सिनोरा कॅरोनी एकदोन वेळां माझ्या दुकानावर आली. ती फक्त बोसबाबूंच्या प्रकृतीचीच चौकशी करीत असे. दुकानांत दुसरें कोणी ग्राहक असलें तर एखादी वस्तु विकत घेत असे किंवा एखाद्या वस्तूचा भाव विचारून दुसरे दिवशीं ती विकत घेण्याची बोली करून निघून जात असे.

रात्रंदिवस एकाच जागीं बसून राहाण्याचा बोसबाबूंना कंटाळा आला. कोठें तरी बाजारांत फेरफटका मारावा असें त्यांना वाटूं लागलें. त्यांचा वेष पठाणाचा होता. त्या वेषांत बाहेर पडणें इष्ट नव्हतें. चार लोकांसारखा वेष असेल तर

लोकांचं फारसें लक्ष जात नाहीं. म्हणून मीं त्यांना माझा एक उंची सूट दिला. तो त्यांना बेताचा झाला. त्यांच्या पठाणी वहाणा त्या सुटाला शोभून दिसणार नाहींत म्हणून मीं माझा बूटही त्यांना दिला. परंतु तो त्यांच्या पायास बरोबर येत नसे. म्हणून बाहेर पडल्याबरोबर प्रथम बूट घ्यावयाचा असें ठरवून बोसबाबू व रहमतखान घराबाहेर पडले. डोक्याला त्यांनीं माझी अफगाण टोपी घातली होती. त्या वेषांत ते पक्के अफगाणी नागरिक दिसत होते.

रहमतखान आणि बोसबाबू त्या दिवशीं बाजारांत खूप फिरले. एका दुकानांत त्यांनीं बूट विकत घेतला. सायंकाळीं ते माझ्या दुकानीं आले. नंतर आम्ही सर्व मिळून घरीं आलों.

रात्रीं जेवणानंतर बोसबाबू म्हणाले, "ज्या दुकानीं मीं बूट घेतला तें एका हिंदी इसमाचें आहे. आमचे बोलणें त्याच्या कानांवर गेलें. आम्ही हिंदी आहोंत हें त्यानें लगेच ओळखलें. 'तुम्ही हिंदी आहांत का?' असा त्यानें मला सवाल केला. त्याला होकारार्थी उत्तर देऊन मी म्हणालों, 'माझें नांव झियाउद्दीन. मी येथील हबीबिया कॉलेजमध्यें प्रोफेसर आहें.' माझें उत्तर ऐकून तो चकितच झाला. 'हबीबिया कॉलेजमधील सर्व हिंदी प्रोफेसरांना मी ओळखतों. तुमची माझी एकदांही भेट कशी झाली नाहीं?' त्यानें पृच्छा केली. 'मी नुकताच येथें आलों आहें. ह्या भागांतल भाषा अवगत नसल्यामुळें मी फारसा फिरत नसतों' मीं स्पष्टीकरण केलें.

" दुकानदार माझ्याशीं बोलण्यांत इतका गुंग झाला होता, कीं तो मीं मागितलेला बूट देण्यासही विसरला. अशा परिस्थितींत अधिक संभाषण लांबविणें धोक्याचें होतें. म्हणून मी घाईत असल्याचें सांगून ताबडतोब एक जोडा देण्याविषयीं त्यास सांगितलें. आम्ही निघण्याच्या तयारींत असतांना त्यानें आम्हांला चहा घेण्याचा आग्रह केला. पण मी म्हणालों, " मी आतां घाईत आहे. तुम्ही एखादे दिवशीं आमच्या हबीबिया कॉलेजांत या. तेथें प्रोफेसर झियाउद्दीनचा शोध करा. मी तुम्हांला भेटेन."

बोसबाबूंनीं हें सांगितल्यानंतर मात्र आम्ही सारे मनमुराद हसलों.

"मास्कोला जाण्यांत आपला मुख्य हेतु काय आहे?" एके दिवशीं सहज बोलतां बोलतां मीं बोसबाबूंना प्रश्न केला. ते म्हणाले, "रशिया आणि जर्मनीनें नुकताच अनाक्रमणाचा करार केला आहे. जर्मनीनें ब्रिटनविरुद्ध युद्ध पुकारलें आहे. रशियाही ब्रिटनचा शत्रु आहे. मास्कोस जाऊन हिंदी स्वातंत्र्याबद्दल प्रचार करण्याची हीच खरी वेळ आहे."

"सध्यां रशिया व जर्मनीचा सलोखा असला तरी अंतिम ध्येयाच्या दृष्टीनें ह्या उभय राष्ट्रांत फारच थोडें साम्य आहे." मीं शंका उपस्थित केली, "मैत्रीच्या बुरख्याखालीं उभय राष्ट्रें युद्धाची तयारी करीत नाहींत हें तरी कोणीं सांगावें? अशा परिस्थितींत रशिया तुम्हांला ब्रिटनविरोधी प्रचार करूं देईल काय?"

"रशिया-जर्मनीचें सख्य फार काल न टिकतां त्यांच्यांत युद्ध होणें शक्य आहे." बोसबाबूंनीं उत्तर दिलें, "परंतु आजकाल राजकीय परिस्थिति इतकी झपाट्यानें बदलत आहे, कीं येत्या २४ तासांत काय होईल हें सांगतां येत नाहीं. रशिया-जर्मनीचा मैत्रीचा करार हें कोणींही स्वप्नांत-सुद्धां कल्पिलें नव्हतें. तथापि तें घडलें. सध्यां देखील रशिया-जर्मनीचें छुपें वैर असलें तरी ब्रिटन कांहीं रशियाचा दोस्त नाहीं. म्हणूनच रशियांत ब्रिटिश-विरोधी प्रचार करण्यास मला कोणीही अटकाव करील असें वाटत नाहीं."

"पण, केवळ प्रचारानें हिंदुस्थानला स्वराज्य मिळेल असें तुम्हांला वाटतें काय ?" मीं सवाल केला.

"सशस्त्र क्रांति करून ब्रिटिशांना हिंदुस्थानांतून हाकून दिल्याशिवाय ते हिंदुस्थान सोडून जाणार नाहींत ह्याबद्दल माझी खात्री आहे." बोसबाबू म्हणाले, "आतांपर्यंत शांततेनें त्यांनीं एकाही राष्ट्राला स्वातंत्र्य दिलें नाहीं. आयर्लंडचेंच उदाहरण घ्या. आयरिश लोक त्यांच्याच हाडामांसाचे व रक्ताचे आहेत. त्यांनीं स्वातंत्र्यासाठीं सातशें वर्षें लढा केला. अनंत यातना व हाल अपेष्टा सहन केल्या. शेवटीं त्यांना स्वातंत्र्य मिळालें तरीही आयर्लंडमध्यें ब्रिटिशांनीं आपलें एक 'पाकिस्तान' ठेवलेंच. हातचें राखून ठेवण्याचे कामीं इतकी धूर्त असलेली ही जात हिंदुस्थान सहजासहजीं व आपखुषीनें हातचा कसा जाऊं देईल ? राष्ट्राबाहेर ब्रिटिश-विरोधी प्रचार केल्यानें हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळणार नाहीं हें खरें आहे. तथापि सध्यां ब्रिटन जीवनमरणाच्या लढ्यांत गुंतलेलें

आहे. अशा वेळीं माझ्या प्रचारानें त्यांची मोठी हानी होईल ह्यांत शंका नाहीं.

म. ग्र. सं. ठाणे.

" आयर्लंडांत झाली तशी क्रांति हिंदुस्थानांत होणार नाहीं असें तुम्हांला वाटतें काय ? " मीं विचारलें.

ब्रिटिशांनीं हिंदुस्थानांत जी परिस्थिति निर्माण केली आहे तीमुळें तशी क्रांति होणें अशक्य आहे. ब्रिटिशांचें उच्चाटन करण्यासारखी परिस्थिति हिंदुस्थानांत निर्माण करणें फारच कठिण आहे. परराष्ट्राच्या मदतीशिवाय अशा प्रकारची क्रांति घडवून आणणेंही अशक्य आहे. रशियन राज्यक्रांतीसही जर्मनीचें सहाय्य झालेंच होतें; त्याचप्रमाणें फ्रान्सच्या मदतीनेंच अमेरिकेला स्वातंत्र्ययुद्धांत यश मिळवितां आलें, हेंही आपण लक्षांत ठेविलें पाहिजे. "

" हिंदुस्थानला बंधमुक्त करण्यासाठीं रशियाचें सहाय्य मिळविण्याकरितां तुम्ही रशियास जाऊं इच्छितां असाच ह्याचा अर्थ घ्यावा काय ? " मीं प्रश्न केला.

" होय, माझा खरा हेतु तोच आहे, " बोसबाबूंनीं कबुली दिली, " मी रशियाची मदत मागणार आहें. त्यासाठीं मी चिकाटीचा प्रयत्न करीन. त्यांत मला यश आलें नाहीं तर मी सतत ब्रिटिशविरोधी प्रचार करीत राहीन. मी हिंदुस्थानांत राहिलों असतों तर सरकारनें युद्ध संपेपर्यंत मला तुरुंगांत ठेवलें असतें. हिंदुस्थानांतील इतर पुढाऱ्यांनाही सरकार तुरुंगांत डांबून ठेवील अशी माझी खात्री आहे. म्हणूनच मी फरारी झालों. तुरुंगांत सडत पडण्यापेक्षां देशाच्या

स्वातंत्र्यासाठीं शक्य ते प्रयत्न करणेंच अधिक श्रेयस्कर आहे असें मला वाटलें."

"तुम्हांला येथून सरळ मास्कोला न जाऊं दिलें तर तुम्ही काय करणार?" मीं माझी शंका त्यांच्यापुढें मांडली.

बोसबाबू म्हणाले, "मी प्रथम जातांनाच मास्कोला उतरून तेथें राहाण्याचा प्रयत्न करीन. तें जमलेंच नाहीं तर रोम किंवा बर्लिन येथील रशियन वकिलातीमार्फत मी खटपट करीन. ह्या खटपटींत मी यशस्वी होईन असें मला वाटतें. कारण त्या ठिकाणीं रशियन वकिलातींत उघडपणें जातां येईल, रशियन वकिलाची प्रत्यक्ष गांठही घेतां येईल. कोणत्याही प्रकारें कां होईना मी लवकरच मास्कोला जाऊन पोंचेन असें मला वाटतें."

मी म्हणालों, "मला मात्र तसें वाटत नाहीं. अशा युद्धाच्या प्रसंगीं गट्टी राष्ट्रांना तुमच्यासारखा हिंदी पुढारी मिळाल्यानंतर ते तुम्हांला रशियांत जाऊं देण्याऐवजीं स्वतःच्याच कार्यासाठीं तुमचा जास्तींत जास्त उपयोग करून घेतील."

"ह्याची मला कल्पना आहे" बोसबाबू उत्तरले. "मला ते सहजासहजीं रशियाला जाऊं देणार नाहींत हें मी जाणून आहें. तरीही मी मास्कोला जाण्याचा प्रयत्न करणार आहें. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्ययुद्धांत मदत करूं शकणारें सध्यां जगांत रशिया हें एकच राष्ट्र आहे. इतर कोणतेंही राष्ट्र आम्हांला मदत करणार नाहीं. म्हणूनच

रशियाखेरीज इतरत्र कोठेंही जाऊं नये अशी माझी इच्छा आहे. ह्या युद्धकाळांत हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवितां आलें नाहीं तर पुढील ५० वर्षांत हिंदुस्थान स्वतंत्र होणार नाहीं. मध्यंतरींच्या काळांत सशस्त्र राज्यक्रांति झालीच तर मात्र सांगता येत नाहीं. ”

हिंदुस्थानांतील धार्मिक भेदांचा मीं उल्लेख केला असतां ते म्हणाले, “ जोंपर्यंत हिंदुस्थानांत ब्रिटिशांची सत्ता आहे तोंपर्यंत हे भेद नष्ट होणार नाहींत. ते सारखे वाढतच राहातील. एखाद्या खंबीर हुकूमशहानें वीस वर्षें हिंदुस्थानवर हुकमत गाजविली तर हे धर्मभेद आपोआप निर्मूल होतील. ब्रिटिश राजवटीचा निष्पात झाल्यानंतर कांहीं वर्षें तरी हिंदुस्थानांत हुकूमशाही राजवट राहिली पाहिजे. दुसऱ्या कोणत्याही प्रकारच्या राजवटीनें हिंदुस्थानचा उत्कर्ष होणार नाहीं. म्हणून हिंदुस्थानच्या कल्याणाच्या दृष्टीनें सुद्धां तेथें प्रारंभीं हुकूमशहाची हुकमत असणें आवश्यक आहे. कारण हिंदवासीयांतील आपापसांतील भेदांचें निर्मूलन हुकूमशहालाच करतां येईल. हिंदी राष्ट्रपुरुषाच्या शरीराला पोखरून काढणारा हा एकच रोग नव्हे. इतरही अनेक व्याधींनीं ह्या राष्ट्रपुरुषाचा देह जर्जर झाला आहे. त्यांचें निर्मूलन करण्यास एकटा हुकूमशहाच समर्थ आहे. भारताला आज कमालपाशा-सारख्या व्यक्तीची आवश्यकता आहे. ”

“ रशियन वकिलानें आपणास मदत करण्याचें नाकारलें. हा निर्णय त्यानें आपल्या वैयक्तिक जबाबदारीवर घेतला,

कीं रशियन सरकारच्या धोरणास अनुसरून घेतला ?" मीं सवाल केला.

"तें मला कसें सांगतां येईल ?" बोसबाबू म्हणाले, 'माझी त्याची एकदां जरी भेट झाली असती तरी त्याच्या सरकारचें धोरण काय आहे हें मला समजलें असतें. कदाचित् रशियन वकील आपल्याच लहरीप्रमाणें वागत असेल. पण, ह्या सर्व गोष्टीला मला येथपर्यंत आणून सोडणारे लोक जबाबदार आहेत. रशियन वकिलाशीं पूर्वपरिचय असलेल्या एखाद्या इसमाबरोबर जर त्यांनीं मला पाठविलें असतें तर रशियन वकिलानें इतकी उपेक्षाबुद्धि खासच दाखविली नसती. तथापि मला रशियांतून जाऊं देण्याविषयीं रशियन सरकार बरेच आढेवेढे घेत असल्याची जी बातमी आपणांस मिळाली आहे तीमुळें मला अधिकच संशय येत आहे. रशियन सरकार मला रशियांतून कां जाऊं देत नाहीं ह्याचेंच मला आश्चर्य वाटतें. मला थारा द्यावयाचा नाहीं असें कदाचित् रशियानें ठरविलें असेल आणि त्याच धोरणास अनुसरून रशियन वकिलानेंही आम्हांला वाटाण्याच्या अक्षता दिल्या असतील."

"तथापि ह्या प्रश्नाला आणखीही एक बाजू आहे. प्रथम रहमतखानची व रशियन वकिलाची भेट झाली त्यावेळीं ह्या बाबतींत रशियन सरकारकडून त्याला कांहींच सूचना नसल्यामुळें त्यानें मदत करण्याचें नाकारलें असेल. त्यानंतर त्यानें माझ्या येथील वास्तव्याबाबत मास्कोला वर्दी दिली असेल. मला मदत करण्याची सूचना रशियन सरकारनें नंतर

पाठविलीही असेल. परंतु माझा येथील ठावठिकाणा त्याला माहिती नसल्यामुळें सोव्हिएट सरकारचा हुकूम मला कळवितां आला नसेल आणि त्याच वेळीं गट्टी राष्ट्रांनीं माझ्या जाण्यासाठीं परवाना मागितला असेल. मी गट्टी राष्ट्रांच्या हातीं लागूं नये, रशियाच्याच उपयोगी पडावा म्हणून त्यांनीं परवाना देण्याचें नाकारलें असेल, हेंच मला जास्त संभवनीय वाटतें. अर्थात् आपणास वस्तुस्थिति माहिती नसल्यामुळें तर्क लढवीत बसणें एवढेंच आपल्या हातीं आहे."

पंचेचाळीस दिवस बोसबाबू माझ्या घरीं होते. त्या पंचेचाळीस दिवसांत गट्टी राष्ट्रांविषयीं चांगला शब्द त्यांनीं कधींही काढला नाहीं. ब्रिटिशांइतकाच ते गट्टी राष्ट्रांचा तिरस्कार करीत असत. बर्लिनला पोंचल्यावर रशियास जाण्याचा रशियन वकिलाती मार्फत त्यानीं प्रयत्न केला असेल अशी माझी खात्री आहे. पण, पुढें लवकरच रूसो-जर्मन युद्ध सुरू झाल्यामुळें रशियाला जाण्याची त्यांची आकांक्षा पूर्ण झाली नसावी. कारण, २८ मार्च १९४१ रोजीं ते बर्लिनला पोंचले व २२ जून १९४१ रोजीं रूसो-जर्मन युद्ध पुकारण्यांत आलें!

## ८

# रशियन सरहद्द ओलांडण्याचा प्रयत्न

आणखी एक आठवडा असाच गेला. इटालियन वकिलातीनें कोणताही संदेश पाठविला नाहीं. सिनोरा कॅरोनी दोन वेळ माझ्या दुकानीं आली. रोमहून अद्याप 'दूत' आले नाहींत एवढेंच उत्तर तिनें दिलें.

जसजसा उशीर लागत होता तसतशी बोसबाबूंना अधिकच चिंता वाटत होती. ते बरेच निराश झाले. बाजारांत फेरफटका करून येण्याविषयीं मीं त्यांना अनेक वेळां सुचविलें. परंतु घराच्या बाहेर पडण्यास त्यांनीं साफ नकार दिला.

एक दिवस हाजीसाहेब आमचेकडे आले. त्यांनीं बोसबाबूंना चहाचें निमंत्रण दिलें. बोसबाबूंनीं तें स्वीकारलें व त्यानंतर मधून मधून ते हाजीसाहेबांच्या घरीं जाऊं लागले.

एक दिवस ते म्हणाले, "हें इटालियन सरकार माझ्या येथून जाण्याची कधीं व्यवस्था करणार आहे हेंच समजत नाहीं! अद्याप दूत रोमहून निघाले नाहींत. ह्या जीवनाचा मला आतां कंटाळा आला आहे. येथें येण्यांत आपण चूक तर केली नाहींना असेंही कधीं कधीं वाटूं लागतें. कांहींही झालें तरी ह्या अंधारांतून बाहेर पडलेंच पाहिजे. रशियन सरहद्दीवर मला नेऊन पोचवूं शकणाऱ्या एखाद्या इसमाची तुम्हांला माहिती असेल तर मला सांगा. येथें बसून निष्क्रिय जीवन घालविण्यापेक्षां रशियन तुरुंगांत खितपत पडणें लाख पटीनें बरें असें वाटूं लागलें आहे. कारण, त्या परिस्थितींत तुरुंगा-तुरुंगांतून कां होईना मास्कोला पोचण्याची थोडी फार आशा तरी करतां येईल. अशी कांहीं तरी व्यवस्था तुम्हांला करतां आली तर पहा. पैशाची मुळींच तमा बाळगूं नका."

मी म्हणालों, "रशियन सरहद्दीपर्यंत तुमच्याबरोबर येऊं शकणारा एक माणूस सापडणें कांहीं कठिण नाहीं. रशियन सरहद्दींत जाऊन परत आलेले पुष्कळ लोक माझ्या माहितीचे आहेत. तथापि, तो प्रवास मात्र अत्यंत दगदगी . व त्रासाचा आहे."

"सध्यांच्या परिस्थितीपेक्षां अधिक कष्ट कोणत्याही परिस्थितींत होणें अशक्य आहे" बोसबाबू लगेच उद्गारले, "जास्तींत जास्त रशियन लोक मला तुरुंगांत ठेवतील. परंतु मी रशियन तुरुंगांत आहें हें रशियन सरकारला समजतांच तें मला सोडील."

"असेंच जर असेल तर रशियन सरहद्दींत तुम्हांला पोंचविण्याची व्यवस्था मीं फार पूर्वींच केली असती." मीं उत्तर दिलें.

"आतांही कांहीं उशीर झाला नाहीं." बोसबाबू म्हणाले, "तुम्ही आम्हांला एक वाटाड्या मिळवून देण्याची व्यवस्था करा. मीं रहमतखानाला अफगाणिस्तानचा एका नकाशा विकत आणण्यास सांगितलें आहे. त्यावरून रशियन सरहद्दीला जास्तींत जास्त जवळचा रस्ता आपण शोधून काढूं."

माझ्या माहितीचा एक इसम आहे. त्याचें नांव 'एम्'. रशिया व अफगाणिस्तानला विभागणाऱ्या हँगो नदीच्या अलीकडच्या तीरापर्यंत तो अनेक वेळां जाऊन आला होता. नदी ओलांडून रशियन हद्दींत कधींही तो गेला नसला तरी नदी ओलांडून जाणें अत्यंत सोपें आहे असें त्यानें मला अनेक वेळां सांगितलें होतें.

'एम्.' मूळचा सरहद्दप्रांताचा रहिवाशी. त्यानें तेथें खून केला व अफगाणिस्तानांत पळून आला. सध्यां फरारी म्हणून तो अफगाणिस्तानांत आयुष्य कंठीत होता. तो स्वत:ला 'महकीर' असें म्हणवी. सुमारें २० वर्षांपासून तो अफगाणिस्तानांतच रहात होता. त्यानें तेथें आल्यानंतरच लग्न केलें. आतां तो अफगाण नागरिक म्हणून राजरोसपणें वावरत आहे. एके काळीं तो लॉरी-ड्रायव्हर म्हणून काम करीत असे. हँगो नदीच्या अफगाणकिनाऱ्यावर असलेल्या

पटकेसार ह्या गांवापर्यंत तो जाऊन आला होता. माणूस विश्वासू. पण बराच काळ बेकारींत काढावा लागल्यामुळें त्याला फारच हलाखींत दिवस काढावे लागत होते. अफगाण स्वातंत्र्यदिनाचे उत्सवप्रसंगीं तो एक दोन ठिकाणीं लहानसे जुगाराच अड्डे टाकीत असे किंवा इतर कांहीं उद्योग करून पैसे मिळवित असे. ह्याच पैशांवर सारें वर्ष तो काढीत असे. राजकारणाचें ज्ञान असलेल्या माणसापेक्षां असाच माणूस जास्त उपयोगी पडेल असें मला वाटलें. कारण राजकीय दृष्ट्या थोडें फार ज्ञान असलेल्या माणसाकडून काम करून घेणें फारच कठिण असतें.

'एम्.' माझ्याकडे मधून मधून येत असे. माणूस नेहमीं आनंदी. जगाचा अनुभव पुष्कळ. आयुष्यांत बरे वाईट प्रसंगही पुष्कळ आलेले. त्यामुळें स्वतःच्या अनुभवांचें, बाजारगप्पांचें एक मोठेंच भांडार त्याच्या जवळ सांठलेलें होतें आणि हे अनुभव तो अत्यंत रसभरित शब्दांत मला सांगत असे. काबूलच्या बाजारांतील "ताज्या घडामोडीही" तो मला सांगत असे. बोसबाबूंनीं रशियन सरहद्द ओलांडण्याची इच्छा प्रदर्शित केल्यानंतर थोड्याच दिवसांत तो मला बाजारांत भेटला. मीं त्याला दुकानावर येण्यास सांगितलें आणि बोलतां बोलतां मूळ विषयाला प्रारंभ केला.

"काय 'एम्' साहेब, अफगाणिस्तानांतील कोणकोणतीं ठिकाणें तुम्हीं पाहिलीं आहेत?" मीं सवाल केला.

"जवळ जवळ सारा अफगाणिस्तान मीं पालथा घातला आहे." एम्. म्हणाला, "कित्येक दिवस लॉरीड्रायव्हर होतों

त्यामुळें अफगाणिस्तानच्या सर्व भागांतून फिरून आलों." फातूर, गझनी, खानाबाद, मोझर शरीफ, अंखोई, जलालाबाद ....आणखी कितीतरी नांवें त्यानें भराभर सांगितलीं.

"पण, तुम्हीं बदकशानला कधीं गेला होतां काय ?" मीं विचारलें.

"अर्थात्" एम्. म्हणाला, "मी हँगो नदीसुद्धां पाहिली आहे. ह्याच नदीच्या पलीकडच्या तीरापासून रशियन सरहद्दीस प्रारंभ होतो."

"ही हँगो नदी अँखोईच्या रोखानें वाहाते नाहीं का ?" मीं प्रश्न केला.

"होय तीच ती नदी." एम्. नें उत्तर दिलें.

"त्या नदीनजीक राहाणारे लोक चोरून छपून रशियन हद्दींत जात असतील नाहीं का ?" मीं मूळ विषयाला प्रारंभ करण्याच्या उद्देशानें प्रश्न केला. "होय, पुष्कळ लोक जातात आणि येतांना सोनें बरोबर घेऊन येतात. करकलीच्या बोकडाचीं कातडीं निर्यात करण्यास अफगाण सरकारनें बंदी केली आहे तरी पण, चोरून लपून ह्या कातड्यांची निर्यात होतच असते; आणि हा चोरीचा व्यापार फार मोठ्या प्रमाणांत चालत असतो." एम्. नें अधिक माहिती सांगितली. तो पुढें म्हणाला, "नदीच्या अलीकडच्या तीरावर उभा राहून मीं रशियन प्रदेश पाहिला आहे. त्या भागांत माझा एक मित्रही आहे. बेकायदेशीररीत्या आयात–निर्यात

होणाऱ्या मालाचा व्यापार तो करीत असतो. तो अनेक वेळां रशियास जाऊन आला आहे."

"जर एखाद्याला बेकायदेशीर रीत्या रशियांत प्रवेश करण्याची इच्छा झाली तर त्याच्या जाण्याची सहज व्यवस्था करतां येईल, नाहीं काय?" मीं माझ्या हेतूचें अधिक स्पष्टीकरण केलें.

"अगदीं सहज जातां येईल. तुम्हांला रशियांत जावयाचें असेल तर तुमच्या जाण्याची सर्व व्यवस्था करण्याची हमी मी घेतों." एम्. नें मला जवळ जवळ आव्हानच दिलें.

"नाहीं बुवा, माझें तिथें काय काम असणार?" मी त्याला थोडा थंडा करण्याच्या उद्देशानें बोललों, "मला उगीच त्या भागांतली माहिती करून घेण्याची उत्सुकता होती एवढेंच; पण रशियन सरहद्दीपर्यंत जाऊन पोचण्याचे मार्ग तुम्ही सांगूं शकाल का?"

"खानाबादपासून पीरसाहेबांच्या दर्ग्याहून एक रस्ता जातो. हा हँगो नदीला अगदीं जवळ आहे. दुसरा रस्ता बुखोहून जातो. रशियन सरहद्द ह्या भागापासून १० ते १२ मैलांवर आहे." एम्. नें माहिती सांगितली.

"ह्या नदीवर एखादा पूल आहे काय? तेथें नावा मिळण्याची व्यवस्था होण्यासारखी आहे काय? लोक नदीच्या पैलतीरावर कोणत्या मार्गानें जातात?" मीं एम्. ला भराभर प्रश्न विचारले.

" नदीवर पूल आहे. परंतु परवान्याशिवाय त्या पुलावरून जातां येणें अशक्य आहे." तो उत्तरला, " रशियन हद्दींत चोरून लपून जाणारे लोक बहुधा मोठमोठे मशाक ( चामडी पिशव्या ) बरोबर घेऊन जातात. ह्या पिशव्यांत हवा भरण्यांत येते. त्यावर कोळ्याचें जाळें पसरल्यानंतर पाण्याच्या पृष्ठभागापासून तें फारसें अलग दिसत नाहीं."

" अशा पद्धतीनें जाणें धोक्याचें तर नाहीं ना ?" मीं शंका विचारली. " आतांपर्यंत पुष्कळ लोक अशा प्रकारें गेले, पुष्कळसा मालही गेला आणि दररोज ही वाहतुक नियमितपणें चालूही असते; परंतु आतांपर्यंत माझ्या माहितीप्रमाणें एकाही माणसास पकडण्यांत आलें नाहीं." एम्. नें माझ्या शंकेचें निरसन केलें.

इतके प्रश्न विचारून मनाची खात्री झाल्यानंतर शेवटीं एम्. ला मीं माझा हेतु सांगितला. " मी इतकी माहिती कां विचारतों हें माहित आहे काय ?" मी म्हणालों, "लवकरच माझा एक मित्र येथें गुप्तपणें येणार आहे. त्याच्याजवळ पासपोर्ट नाहीं. रशियांत जाण्याची त्याची इच्छा आहे. तूं त्याला गुप्तपणें रशियन सरहद्दींत नेऊन पोचते करणार काय ? तूं माझा मित्र आहेस म्हणून मीं तुला विश्वासांत घेतलें. मला ह्या गोष्टींची कांहींच माहिती नाहीं. ह्या बाबतींत तुझा सल्ला काय आहे ?"

" ह्या बाबतींत तुम्ही अगदीं निर्धास्त असा. तुम्ही तुमच्या मित्राला येथें येण्याविषयीं खुशाल निरोप पाठवा. ह्या

बाबतींत तुम्हांला माझ्याशिवाय अधिक खात्रीलायक इसम दुसरा कोण सापडणार ? " 'एम्.'नें लगेच आश्वासन दिलें.

मी म्हणालों, " तूं खंबीर आहेस. सर्व प्रसंगांना तोंड देऊन त्यांतून निभाऊन जाण्याची कुवत तुझ्यांत आहे हें मी जाणतों. पण, तूं समजतोस इतकें हें काम सोपें आहे असें मला वाटत नाहीं. प्रत्येक गोष्ट अत्यंत गुप्ततेनें केली पाहिजे. कोणालाही ह्या गोष्टीचा थोडासुद्धां सुगावा लागतां उपयोगी नाहीं. माझा मित्र रशियन सरहद्दींत जाऊन पोचण्यापूर्वीं कोणत्याही प्रकारच्या भानगडी उपस्थित होणार नाहींत ह्या विषयीं आपण खबरदारी घेतली पाहिजे. अगदीं बारीक सारीक चुकीमुळें हें गुपित बाहेर पडलें तर माझ्या मित्राचें सारें आयुष्य बरबाद होईल. त्याच्याबरोबर तुलाही अटक झाली तर तुलाही उभें आयुष्य तुरुंगांत घालवावें लागेल. ह्या सर्व अडचणींतून पार पडण्याची शक्यता असेल तरच पुढचें धाडस करावें असें मला वाटतें."

" तुम्ही कोणत्याही गोष्टीची फिकीर करूं नका." 'एम्.' निर्धारानें सांगूं लागला, " आपण परमेश्वरावर भरंवसा ठेवूं या. भगवंताची कृपा असेल तर तुमच्या मित्रावर कोणतेंही संकट येणार नाहीं. हें काम कांहीं फारसें कठिण नाहीं."

" ठीक आहे." मी उद्‌गारलों, " असेंच जर असेल तर मी माझ्या मित्राला निरोप पाठवितों. पण, तुम्ही त्याला नदीपार कसे नेणार हें सांगाल काय ? "

" तुमच्या मित्राला फारसी किंवा पुश्तु भाषा बोलतां येते काय ?" 'एम्.'नें विचारलें.

"त्याला ह्या देशाची कोणतीही भाषा बोलतां येत नाहीं असें मला वाटतें." मीं उत्तर दिलें, "पण, फारसी किंवा पुश्तु बोलणारा एखादा माणूस त्याला आपल्याबरोबर आणतां येईल."

"तसें झालें तरी हरकत नाहीं." 'एम्.' म्हणाला, "फारसी किंवा पुश्तु बोलणाऱ्या इसमाला आपण हाजी बनवूं आणि आम्ही उझबेक जमातींच्या लोकांचा वेष घेऊन नाझरशरीफचे यात्रेकरू म्हणून प्रवासास प्रारंभ करूं. नाझरशरीफला रात्रभर राहूं आणि दुसरे दिवशीं बुखोला जाऊं. तेथून जवळच माझा एक मित्र आहे. तो रशियनांशीं व्यापार करीत असतो. आम्ही त्याचेकडे जाऊं. पुढची सर्व व्यवस्था तो करील."

"योजना चांगली आहे." मी म्हणालों, "मींसुद्धां अशाच प्रकारची योजना आंखण्याचा विचार करीत होतों. परंतु, त्याला उझबेक जमातींच्या लोकांचा वेष शोभून दिसणार नाहीं. पठाणाचा पेहराव मात्र त्यास बेमालुम करतां येतो. शिवाय, त्याच्या साथीदाराला फक्त पुश्तु भाषाच बोलतां येते. उझबेक बोली त्याला येत असती तर तो वेषही साजला असता. ह्या प्रवासांत किती खर्च येईल असें तुला वाटतें ?"

"खर्च फार येणार नाहीं." 'एम्.' म्हणाला, "लॉरीचें भाडें आणि वाटखर्च जवळ असला म्हणजे झालें. अंखोईला सुद्धां आम्ही एका मित्राकडेच राहूं. एक चप्पल आणि एक लुंगी त्याला नजर केली म्हणजे झालें. ह्याशिवाय मला चाल

१०२३५

तें. मी ह्या दिवसांत अगदीं कफल्लक झालों आहें. त्या दृष्टीनें योग्य तेंच मला द्याल अशी आशा आहे. "

" ठीक आहे. पण, तुला किती पैसे हवे आहेत ?" मीं विचारलें.

" तुम्हांला योग्य वाटेल तें द्या. पण ६०० किंवा ७०० अफगाण रुपयांपेक्षां कमी पैसे मला मिळूं नयेत असें मला वाटतें." 'एम्.' नें आपल्या मुशाहिऱ्याबाबत स्पष्टीकरण केलें.

" ठीक आहे. मी तुम्हांला सातशें अफगाण रुपये देईन. त्यापैकीं तीनशें अगोदर देईन. रशियन सरहद्दींत पोंचल्याची माझ्या मित्राची चिठ्ठी मला मिळतांच राहिलेले तीनशें मी चुकते करीन." मीं एकदांचा सौदा पटविला.

"आरंभीं तुम्हीं मला दोनशें दिले तरी हरकत नाहीं. राहिलेले पांचशें तुमच्या मित्राची चिठ्ठी आणल्यानंतर द्या" 'एम्.'नें उत्तर दिलें. त्याच्या ह्या उत्तरानें मला बरीच निश्चिती वाटली. मी म्हणालों, " तुझी इच्छा असेल तसें कर. पण उद्यांपासून मात्र मला दररोज भेटत जा. कारण, अनेक बाबतींत मला तुझा सल्ला घ्यावा लागेल."

'एम्.' माझा निरोप घेऊन निघून गेला. त्याच दिवशीं सायंकाळीं मीं बोसबाबूंना त्याचें व माझें जें बोलणें झालें तें सांगितलें. त्यांनीं 'एम्.' संबंधींची सविस्तर माहिती मला विचारली. मला जें कांहीं माहीत होतें तें मीं त्यांना सांगितलें.

त्यानंतर बोसबाबू म्हणाले, " अशा प्रकारचा माणूस आम्हांला निश्चितपणें रशियन सरहद्दींत पोचवील. मध्येंच कोठें तरी दगा देणार नाहीं." रहमतखाननें अफगाणिस्तानचे नकाशे बाजारांतून आणले होते. आम्ही नकाशांचें निरीक्षण केलें. 'एम्.'नें सांगितलेला मार्गच जास्त जवळचा होता. दोन तीन दिवसांत काबूल सोडून रशियाच्या वाटेस लागण्याचा बोसबाबूंनीं निश्चय केला.

रहमतखाननें 'एम्.'ची गांठ घेण्याचें ठरविलें. माणूस कसा काय आहे ह्याची स्वतः पाहून परीक्षा करण्याचा त्याचा उद्देश होता. मीं त्यांची भेट करून देण्याचें आश्वासन दिलें. सर्व प्रकारची खबरदारी घेण्यासाठीं मीही जपत असें. मला वाटे, कांहीं करतां कांहीं झालें, बोसबाबू पुन्हा ब्रिटिशांच्या हातीं लागले तर उमरभर आपल्याला तोंड वर काढतां येणार नाहीं.

९

# इटालियन दूत निघाले !

दुसरे दिवशीं सकाळीं ११ वाजतां मीं रहमतखानला माझ्या दुकानीं बोलावलें. सकाळीं १० च्या सुमारास 'एम्' दुकानावर येणार होता. त्या दोघांची गांठ घालून देण्याच्या उद्देशानेंच मीं रहमतखानला बोलावलें. "रशियन सरहद्दींत जाऊं इच्छिणाऱ्या माझ्या दोन मित्रांपैकीं एक येथें आला आहे." मी 'एम्.' ला सांगितलें, "मीं त्यास तुमची सर्व हकिकत सांगितली. तुमची भेट घ्यावी अशी त्याची इच्छा आहे. तो थोड्या वेळांत येथें येईल. नंतर तुम्ही दोघे मिळून तुमच्या जाण्याची योजना आंखा. पैशांची मात्र चिंता करूं नका. लागेल तेवढ्या पैशांची सोय करण्याचा मी प्रयत्न करीन."

आम्ही बोलत असतांनाच दुकानाबाहेर एक मोटार थांबली. सिनोरा कॅरोनी मोटारींतून उतरली. ती थेट माझ्या दुकानांत आली. मला थोडें आश्चर्य वाटलें. कारण, ती तिच्या नेहमींच्या पिवळ्या गाडींतून न येतां आज एका लहानशा मोटारींतून आली आणि सर्वांत नवलाची गोष्ट म्हणजे ती स्वतः मोटार हाकीत होती.

तिनें बोसबाबूंची चौकशी केली. "बोसबाबूंना नुसती प्रतीक्षा करीत बसण्याचा मनस्वी कंटाळा आहे. त्यांच्या प्रयाणाची व्यवस्था होईल किंवा नाहीं ह्याचीही त्यांना अलीकडे जबरदस्त शंका येऊं लागली आहे." मीं उत्तर दिलें. माझें उत्तर ऐकतांच तीही थोडी चपापली. पण लगेच स्वतःच सावरून घेत म्हणाली, "तें खरें नाहीं. आम्ही आटोकाट प्रयत्न करीत आहोंत. रोमला आम्हीं कितीतरी तारा धाडल्या. तिकडून लवकरच दूत यावेत अशी आमची अपेक्षा आहे. इतका विलंब कां लागला हें समजत नाहीं. इटालियन वकीलही खूपच बेचैन झाले आहेत. तथापि आपण निर्धास्त असा. लवकरच सर्व व्यवस्था होईल."

मीं तिला बोसबाबूंनीं दिलेलें पत्र दिलें. तिनें तें घेतलें आणि निघून गेली.

सव्वा अकरा वाजतां रहमतखान दुकानावर आला. 'एम्.' ची व त्याची मीं ओळख करून दिली. दुकानांत अशा गोष्टी बोलणें इष्ट नव्हतें म्हणून ते दोघेही बाहेर पडले.

सायंकाळीं मी घरीं गेलों. "आम्हीं 'एम्.'च्या घरीं गेलों. तेथें पुढच्या प्रवासाच्या सर्व योजना आम्हीं आंखल्या." घरीं येतांच रहमतखाननें मला माहिती सांगितली. "माझा दुसरा मित्र २।३ दिवसांतच येथें येईल व तो आल्यानंतर दुसरे दिवशीं आपण वाटेस लागूं असेंही मीं 'एम्.' ला सांगितलें आहे" रहमतखान म्हणाला.

दुसरे दिवशीं सकाळींच 'एम्.' माझ्या दुकानावर आला. रहमतखानशीं चर्चा करून ठरविण्यांत आलेली प्रवासाची योजना त्यानें मला सांगितली. मीं त्याला थोडे पैसे दिले व त्यांतून अंखोईच्या मित्राला देण्यासाठीं लुंगी व चप्पल घेण्यास सांगितलें.

त्याच दिवशीं संध्याकाळीं एक नवीनच भानगड निर्माण झाली. पेशावरचा माझा एक मित्र मला दुकानांत भेटण्यासाठीं आला. त्याचें नांव जीवनलाल. पेशावरला तो सुक्या मेव्याचा व्यापार करीत असे. हंगामाच्या दिवसांत काबूलला येऊन तो ठोक खरेदी करीत असे. त्याचप्रमाणें तो ह्या खेपेसही खरेदीसाठीं आला होता.

थोडा वेळ इकडच्यीं तिकडच्यीं प्रश्नोत्तरें झाल्यावर मीं विचारलें, "सुभाषबाबूंच्या अंतर्धानाबावत हिंदुस्थानच्या लोकांना काय वाटतें?" जीवनलाल निरक्षर होता. राजकारणाची त्याला मुळींच आवड नव्हती. तथापि बोसबाबूंच्या अंतर्धानाचा विषय हिंदुस्थानच्या कानाकोपऱ्यांत देखील चर्चिला जात होता. हिंदुस्थानांतील प्रत्येक

नागरिक तें रहस्य जाणून घेण्यास उत्सुक होता. त्याचप्रमाणें आपापल्या समजुतींनुसार तो त्याबाबत तर्कवितर्कही लढवीत असे.

"मला व्यक्तिशः असें वाटतें, कीं ब्रिटिशांनीं त्यांना कोठें तरी तुरुंगांत डांबून ठेवलें असावें," जीवनलाल स्वतःचें मन बोलूं लागला, "आणि ते फरारी झाले आहेत असा खोटाच प्रचार त्यांनीं सुरू केला आहे. ह्या सतत प्रचारा-मुळें ते खरोखरच नाहींसे झाले असावेत असा लोकांचा समज करून देण्याचा ब्रिटिश सरकारचा उद्देश आहे. कारण, लोकांची एकदां तशी समजून झाली म्हणजे बोसबाबूंची वाटेल तशी विल्हेवाट सरकारला लावतां येईल."

आमच्या गप्पा बराच वेळ चालल्या. दुकान बंद करण्याची वेळ झाली. जीवनलाल जाण्याची मी वाट पहात होतों. पण तो कांहीं जाईना. शेवटीं मीं दुकान बंद केलें. जीवनलालही माझ्याबरोबरच चालूं लागला. तो कधींही आला तरी मीं त्याला जेवणासाठीं बोलावीत असें. ह्या खेपेसही मी त्याला जेवणास बोलावीन अशी त्याची अपेक्षा असावी. पण, तें शक्य नव्हतें म्हणूनच त्याला टाळण्यासाठीं, घरीं पत्नी आजारी असून आजकाल खाणावळीच्या जेवणावर भागवावें लागत आहे असें मीं त्यास सांगितलें. ह्या वाक्यांतील सूचितार्थ त्याच्या ध्यानीं आला. घर आल्यानंतर मीं त्यास आंत येण्यास सांगितलें. पण, "पत्नी आजारी असतांना माझी आणखी एक अडचण नको" असें सांगून तो निघून गेला.

पुढच्या प्रवासाच्या तयारीच्या दृष्टीनें आणखी बोलणीं करण्यासाठीं रहमतखान व 'एम्.' ह्यांची भेट दुसरे दिवशीं ठरलेली होती. मी दुकान उघडल्याबरोबर एम्. आला. त्यानें रहमतखानची चौकशी केली. रहमतखान येईपर्यंत मीं त्याला बसायला सांगितलें. इतक्यांत जीवनलालही आला. त्याची व 'एम्' ची पूर्वीची जानपछान होती. त्यांच्या गप्पा सुरू झाल्या. सुमारें तासभर दोघेही बोलत बसले होते. इतक्यांत रहमतखान आला. जीवनलालला दुकानांत पाहातांच रहमनखाननें पवित्रा बदलला. ह्यांची माझी पूर्वीची ओळखदेख नाहीं असा बहाणा करून त्यानें अगदीं तिऱ्हाइताप्रमाणें मला 'सलाम अलेकूम्' केला व 'एम्.' बरोबर तो निघून गेला.

'एम्.' हा धंदेवाईक जुव्वेबाज आहे हें जीवनलालला माहीत होतें. पण, रहमतखानला मात्र त्यानें पूर्वी कधींही पाहिलें नव्हतें. त्यानें मला रहमतखानविषयीं सवाल केला. "माणूस माझ्या माहितीचा नाहीं. कदाचित् 'एम्.'चा मित्र असेल" मीं उत्तर दिलें. "पहा बुवा, त्या 'एम्.' पासून सावध रहा. तो धंदेवाईक जुगारी आहे आणि दुसरा माणूसही अट्टल जुगारीच दिसतो. ते तुम्हांला धोका देतील, कदाचित् लुबाडतीलही." जीवनलालनें मला बजावलें. "त्याची काळजी नको. तुम्ही निश्चिंत असा." मीं उत्तर दिलें.

दुपारीं जीवनलाल जेवणासाठीं गेल्यानंतर रहमतखान आला. 'एम्.' च्या अंखोईच्या मित्रासाठीं त्यांनीं चप्पल व लुंगी खरेदी केल्याचें सांगितलें. त्याचप्रमाणें नाझरशरीफला

जाणाऱ्या मोटारींची त्यांनीं चौकशी केली. एक मोटार आजच गेली असून दुसरी मोटार तीन दिवसांनीं जाणार आहे असें मोटारवाल्यांनीं त्यांना सांगितलें.

मी 'एम्.' ला शंभर रुपयांची नोट देत होतों त्याच वेळीं जीवनलाल आला. मी 'एम्.' ला पैसे देत असतांना पाहून तो थक्कच झाला! त्यांच्या समोरच त्यानें माझ्यावर ताशेरा झाडण्यास प्रारंभ केला. "ह्या जुव्वेबाजांच्या आहारीं जाऊं नका म्हणून मीं तुम्हांला पूर्वीच बजावलें होतें. पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. शेवटीं तुम्ही त्यांच्या पंजांत सापडलातच. मित्र ह्या नात्यानें तुम्हांला सावध करणें एवढेंच माझें कर्तव्य होतें. ह्यापुढें तुमच्या इच्छेला येईल तसे वागा." जीवनलालनें आपला सात्त्विक राग माझ्यावर पाखडला.

जीवनलालची सरबत्ती ऐकून 'एम्.' आणि रहमतखान दोघेही वरमले आणि लगेच दुकानांतून निघूनही गेले! तरीही जीवनलालचा तोफखाना चालूच होता. रहमतखान हा पक्का डाकू आहे अशीच त्यानें स्वत:ची ठाम समजूत करून घेतली. मी पेंचांत पडलों. एकदां वाटे रहमतखान कोण आहे तें सांगून टाकावें त्याला. पण, पुन्हा मनांत विचार येई, त्यानें हें रहस्य फोडलें तर....? पण, खरें न सांगण्यांतही पुष्कळ धोका आहे असें मला वाटूं लागलें. जीवनलाल रहात असलेलें घर माझ्या दुकानाच्या रस्त्यावरच होतें. त्या भागांत केव्हांतरी रहमतखान फिरतांना त्याच्या दृष्टीस पडेलच. त्यामुळें त्याचा आतांचा ग्रह आणखी दृढ होईल.

जीवनलालला मीं खऱ्या गोष्टींचा पत्ता लागूं दिला नाहीं तर मी दोन जुगारी इसमांच्या नादीं लागलों आहें असा प्रचार तो काबुलांतील हिंदी नागरिकांत करील. रहमतखानकडे बोट दाखवून तो सर्वांना सांगेल, कीं हाच तो जुगारी ! 'आर.' नें रहमतखानला पाहिलें होतें. अशा परिस्थितींत जीवनलालचा प्रचार सुरू झाला तर खरें रहस्य षट्कर्णी होण्यास मुळींच वेळ लागणार नाहीं. त्याचप्रमाणें जीवनलाल सारखा दुकानांत बसूं लागला तर मला सुभाषबाबूंचें कोणतेंच काम करतां येणार नाहीं.

हा सर्व धोका लक्षांत घेऊन मी जीवनलालला म्हणालों, "त्यांच्या तोंडावरच त्यांना जुगारी म्हणून आग पाखडणें अनुचित होतें. 'एम्.' हा जुव्वेबाज आहे हें मी जाणतों. परंतु तो दुसरा इसम ? त्याची काय माहिती आहे तुम्हांला ? मी त्यांना शंभर रुपये देत आहें हें पाहूनच तो डाकू आहे, जुगारी आहे, फंदाईत आहे, असा निष्कर्ष तुम्हीं कसा काढला ?"

"एम्. ची माझी पहिली भेट झाली तेव्हांपासून तो जुगारी आहे हें मला माहीत होतें." जीवनलाल उत्तरला, "त्याच्या मित्राचा चेहेराही तसाच दिसत होता. मी जें बोललों तें तुमच्या भल्यासाठींच. त्यामुळें तुम्हांला जर अवघड वाटत असेल तर ह्यापुढें मी तुमच्या कोणत्याही व्यवहारांत ढवळाढवळ करणार नाहीं; तुम्हांला वाटेल तें करा."

" माझ्या व्यवहारांत तुम्ही ढवळाढवळ करा अगर करूं नका. परंतु त्या भल्या माणसाचा अपमान कां केला तुम्हीं ?" मीं विचारलें.

" आतां मात्र कमाल झाली !" जीवनलाल म्हणाला, " कालच तुम्हीं सांगितलें, कीं तो कोण आहे हें मला माहीत नाहीं. आज तो भला माणूस आहे असें तुम्हीं सांगतां, त्याला शंभर रुपयांची नोटही देतां. तो मग आहे तरी कोण ? त्याला तुम्हीं शंभर रुपये कां दिले ? "

" तो कोण आहे हें तुम्हांला सांगावें लागूं नये म्हणूनच मी तो माझ्या ओळखीचा नाहीं असें तुम्हांला सांगितलें. " मी म्हणालों, " त्याला पैसे देण्यांत माझा एक विशिष्ट उद्देश आहे. त्या उद्देशाशीं तुम्हांला फारसें कर्तव्य नाहीं. म्हणूनच त्याला पैसे कां दिले हेंही मीं तुम्हांला सांगणार नाहीं."

जीवनलाल थोडा वेळ गप्प बसला. नंतर तो म्हणाला, " आतांपर्यंत तुम्ही माझ्यापासून कांहीं एक लपवून ठेवलें नाहीं. हें रहस्य ज्या अर्थीं तुम्ही मला सांगत नाहीं त्या अर्थीं तें मोठेंच गूढ असलें पाहिजे." " होय तें महान् रहस्य आहे हें खरेंच. " मी म्हणालों, " तुमच्यापुढें त्याची वाच्यता केल्यानें माझ्यावर मोठें संकट येण्याचा संभव आहे. तुम्हांला तें माहीत होऊनही कांहीं फायदा होणार नाहीं. आणि मुख्य म्हणजे तुमचा आणि त्याचा कांहींही संबंध नाहीं. "

ह्या उत्तरानें जीवनलालला अधिकच संशय आला. त्यानें माझी परोपरीनें विनवणी केली. आणा शपथा घेतल्या आणि ह्या प्रकाराच्या मुळाशीं काय गूढ आहे तें सांगण्याची विनंती केली. " ठीक आहे " मी म्हणालों, "मी ह्या गोष्टीवर विचार करीन आणि तुम्हांला उद्यां काय तें सांगेन. "

सायंकाळीं मी घरीं आलों. बोसबाबूंना झालेला प्रकार सांगितला. त्यांनीं जीवनलालविषयीं अधिक माहिती विचारली. नंतर ते म्हणाले, "माणूस मूर्ख व कमकुवत दिलाचा दिसतो. अशा माणसाला कधींही विश्वासांत घेऊं नये."

"पण त्याच्यापासून हें लपवून ठेवण्यांतही धोका आहे" मी म्हणालों. "तुम्हांला वाटेल तसें करा." बोसबाबू उत्तरले, "खऱ्या गोष्टीचा त्याला थांग लागूं देऊं नये असें मला वाटतें. आणि तुम्हांला सारें कांहीं त्याला सांगावयाचेंच असेल तर मी गेल्यानंतर सांगा. जास्तीत जास्त दोन दिवस मी येथें राहीन."

बोसबाबूंच्या ह्या सूचनेस मात्र मीं संमति दिली. 'एम्.' ची मुलाखत घेण्यासाठीं माझ्या दुकानावर न येतां दुसरी कोणती तरी जागा शोधून काढण्याविषयीं मीं रहमतखानला सांगितलें.

दुसरे दिवशीं जीवनलाल दुकानावर आला. त्यानें पुन्हा आदले दिवशींच्या गौप्याबद्दल सवाल केला. पत्नीच्या आजारामुळें त्या गोष्टीवर विचार करण्यास मला वेळच झाला नाहीं असें मीं सांगितलें. ह्या उत्तरानें तो गप्प बसला खरा,

पण मनांतल्या मनांत तो खूपच चिडला होता हें त्याचा चेहेरा पाहून कोणाच्याही सहज लक्षांत आलें असतें. सायंकाळीं मीं घरीं आलों त्यावेळीं पुढच्या प्रवासाची सर्व तयारी झाल्याचें रहमतखाननें मला सांगितलें. फक्त लॉरींतील जागा राखून ठेवावयाच्या तेवढ्याच राहिल्या होत्या.

दुसरे दिवशीं सकाळीं जीवनलाल पुन्हा माझ्या दुकानीं आला. पुन्हा त्यानें तोच प्रश्न केला. मीं शेवटीं त्याला सांगितलें, “तुम्ही निश्चित रहा. तुमच्यापासून मी कांहीं एक लपवून ठेवणार नाहीं ह्याविषयीं खात्री बाळगा.”

आम्हीं बोलत बसलों असतांनाच सिनोरा कॅरोनी आली. तिनें माझ्या हातांत एक पाकीट दिलें. जीवनलालनें तें पाहिलें. ती फारच खुषींत होती. मीं तिला तिच्या आनंदाचें कारण विचारलें. “हें पत्र वाचा म्हणजे तुम्हांला काय तें समजेल” तिनें उत्तर दिलें. “सर्व व्यवस्था झाली आहे काय?” मीं विचारलें. तिनें होकारार्थी उत्तर दिलें व ती निघून गेली.

सिनोरा कॅरोनी येऊन गेल्यानंतर जीवनलालची उत्कंठा अधिकच जागृत झाली. खरा प्रकार जाणून घेण्याविषयीं तो फारच अधीर झाला. सिनोरा कॅरोनीविषयीं त्यानें मला अनेक उलट सुलट प्रश्न विचारले. “तिनें कसला तरी पांढरा कागद तुम्हांला दिला त्यांत काय होतें?” कांहींच थांग न लागल्यामुळें त्यानें शेवटीं प्रश्न केला.

"कागद ? कसला कागद ? तिनें मला तर कांहींच दिलें नाहीं. तुम्ही जागे आहांत कीं झोपेंत ?" मी खऱ्या गोष्टीचा सपशेल इन्कार केला.

"मी झोपेंतही नाहीं आणि झोकूनही आलों नाहीं." जीवनलाल म्हणाला, "परंतु तुमच्या बाबतींत मात्र कांहींच कळेनासें झालें आहे. मी येथें आल्यापासून तुमच्यांत संपूर्ण बदल झाला आहे हें माझ्या निश्चितपणें निदर्शनास आलें आहे. तुमच्या प्रत्येक गोष्टीचा मला अर्थच लागत नाहीं. माझ्यासाठीं तरी तुम्ही एक न उकलणारें कोडें होऊन बसलां आहांत."

"मी पूर्वी होतों तसाच आहें" मी उत्तर दिलें. "तुम्हांला मात्र कसला तरी खोटा आभास होत आहे."

हा सारा मारा जीवनलालला असह्य झाला. तो मनांतले मनांत फारच कष्टी होऊन निघून गेला. तो निघून गेल्यानंतर मात्र मला हायसें वाटलें. सिनोरा कॅरोनीनें दिलेलें पत्र वाचण्यास मी फारच अधीर झालों होतों. जीवनलाल दुकानाबाहेर पडल्याबरोबर मीं तें पत्र फोडलें व वाचूं लागलों. पत्रांत पुढील मजकूर होता:—"कित्येक दिवसांनंतर मीं आपणांस पत्र लिहिलें. लिहिण्यासारखें कांहीं नव्हतेंच म्हणून मी स्तब्ध होतों. पण, आज रोमहून समाधानकारक उत्तर आलें आहे. येथें येणारे दूत रोमहून निघाले आहेत. एका आठवड्याच्या अवधींत ते येथें येतील.

पासपोर्टावर लावण्यासाठीं तुमच्या फोटोची आवश्यकता आहे. परवां सकाळीं ११ वाजतां आपण कृपा करून दराबमॅन रोडवर यावें. त्या ठिकाणीं एक मोटार तुमची वाट पहात उभी राहील. मोटारीचा नंबर....आहे. मोटारींत एक मनुष्य राहील. त्याच्याशीं कांहीं एक न बोलतां आपण मोटारींत बसा. तो तुम्हांला एका सुरक्षित स्थळीं घेऊन जाईल. त्या ठिकाणीं तुमचे फोटो काढण्यांत येतील. फोटो काढून झाल्यानंतर तीच मोटार तुम्हांला तुमच्या पहिल्या ठिकाणावर आणून सोडील. फोटो काढण्याची किंमत आपण देऊं नये."

हें पत्र वाचून मला फारच आनंद झाला. ह्या आनंदाच्या भरांत असतांनाच 'एम्.' आला. रहमतखानबरोबर रशियन सरहद्दींत जाऊं इच्छिणारा त्याचा मित्र अद्याप आला किंवा नाहीं ह्याची त्यानें चौकशी केली. मीं म्हणालों, "तो अद्याप आला नाहीं. परंतु आज सायंकाळीं येईल अशी अपेक्षा आहे. आजारी असल्यामुळें येण्यास उशीर लागत आहे असा मात्र त्याचा निरोप आला आहे."

"परंतु तो आतांपर्यंत आला नसेल तर उद्यां नाझर शरीफला जातां येणार नाहीं." 'एम्.' म्हणाला. "कां?" मीं विचारलें. "उद्यांच्या मोटारनें जावयाचें असेल तर आजच तिकिटें काढून ठेवलीं पाहिजेत. आजकाल लॉऱ्या फार कमी जातात आणि जाणारे लोक मात्र पुष्कळ असतात" 'एम्.'नें खुलासा केला.

"कांहीं हरकत नाहीं." मी म्हणालों, "तो आज आला तरी तो आजारी असल्यामुळें लगेच त्याला एवढ्या दूरचा प्रवास करतां येईल असें वाटत नाहीं. तो काबूलला आल्यानंतरच कधीं निघावयाचें तें आपण ठरवूं."

---

१०

# मास्कोच्या वाटेवर

सायंकाळीं मी उशिरां घरीं आलों. घरीं आल्यानंतर इटालियन वकिलाचें पत्र मीं बोसबाबूंना दिलें. पत्र वाचून झाल्यानंतर बोसबाबूंनीं मला विचारलें, "हें पत्र वाचून तुम्हांला काय वाटतें?"

"ह्या परिस्थितींत काय करावें हें आपणच ठरवा. इटालियन वकिलानें आश्वासन दिल्याप्रमाणें वाट पहावयाची किंवा 'एम्.' बरोबर जावयाचें ह्याचा निर्णय आपणच घ्यावा. 'एम्.' बरोबर जाण्याचें ठरविलें तरी तीन दिवस येथेंच रहावें लागणार आहे" मीं उत्तर दिलें.

"कां?" बोसबाबूंनीं विचारलें. "मोटारींतील जागा आज राखून ठेवल्या असत्या तर उद्यां जातां आलें असतें परंतु हा निरोप आल्यानंतर मीं जागा राखून ठेवल्या नाहींत." मीं स्पष्टिकरण केलें. "तुम्हीं केलें तें बरोबर केलें." बोसबाबू म्हणाले, "येथेंच जर तीन दिवस राहाणें भाग असेल तर इटालियन वकिलास फोटो देण्यास कांहींच हरकत नाहीं असें मला वाटतें. दोन्हीही योजनांवर पुन्हा विचार करण्यास आपणास भरपूर अवधि आहे. गट्टीराष्ट्रांच्या दूतांची वाट पाहाण्याचें ठरविलें तरी दहाबारा दिवस मोडतील. ह्या दूतांना येथें येण्यास एक आठवडा तरी लागेल. त्यानंतर तीन चार दिवस तरी पुढच्या तयारीस लागतील तेव्हां कुठें मला येथून निघतां येईल."

"ह्या गोष्टींची तूर्त तरी चर्चा नको. आणखी तीन दिवस आहेत. एवढ्या अवधींत दोन्ही योजनांवर आपल्याला भरपूर विचार करतां येईल" रहमतखान मध्येंच म्हणाला.

"ह्या गोष्टीवर आपण उद्यां विचार करूं." रहमतखानच्या म्हणण्यास संमति देत मी म्हणालों, "आजचा निकडीचा प्रश्न जीवनलालचा आहे. आज दुपारीं सिनोरा कॅरोनीनें मला पत्र दिलेलें त्याच्या निदर्शनास आलें. त्यानें त्या बाबत माझ्यावर प्रश्नांचा सारखा भडिमार केला. मीं त्याला कांहीं एक सांगितलें नाहीं. त्यामुळें तो रागांतच निघून गेला. माणूस अतिशय मूर्ख आहे. त्यामुळें उपद्रव होण्याचाही संभव आहे."

"त्या माणसाला विश्वासांत घेणें मला तरी पसंत नाहीं." बोसबाबू उत्तरले, "पण, आमचा येथील मुक्काम वाढला आहे ही गोष्ट लक्षांत घेऊन तुम्हांला योग्य वाटेल तें करा. त्याला सांगितल्याशिवाय गत्यंतरच नाहीं असें जर तुम्हांला वाटत असेल तरच सांगा."

× × ×

"काय दोस्त ? काल दिवसभर होतां तरी कुठें ?" दुसरे दिवशीं जीवनलाल दुकानावर आला त्यावेळीं मीं त्याला सवाल केला.

"येऊन तरी काय उपयोग ? तुम्हीं आम्हांला कांहीं सांगत नाहीं. तुमच्या अनेक भानगडी; तुमचीं रहस्यें, तुमचीं गौप्यें.... !" थोडा विरक्तीचा आव आणून जीवनलाल म्हणाला, "पण मी तुम्हांला एक प्रश्न विचारणार आहें."

"कांहीं नवीन आहे का त्यांत ?" मीं विचारलें

"प्रश्न जुनाच आहे; पण मी तो नव्यानें विचारणार आहें." जीवनलाल म्हणाला, "परवां एम्. बरोबर येथें तो माणूस आला होता ना ? आज त्याला मीं हिंदु गुजरींत पाहिलें. तुमच्या घरीं आला होता का तो ?"

"त्या माणसाविषयीं तुम्ही पुन्हा प्रश्न करणार नाहीं असें मला वाटलें होतें; परंतु माझा समज चुकीचा ठरला आहे." मी बोलूं लागलों, "ह्या प्रकरणांतील रहस्य तुम्हीं माझ्या पुरतेंच मर्यादित राहूं दिलें असतें तर फार चांगलें झालें असतें. पण,

तुमची उत्कंठा वाढत आहे. दिवसेंदिवस तुम्ही जास्त जास्त संशयी बनत चालला आहांत. हा राजकीय व्यवहार आहे. हें खडतर राजकारण आहे हें तुम्हांला मी पुन्हा एकवार बजावतों. तुम्हांला तुरुंगांत जावें लागेल. आणखीही कांहीं आपत्ति ओढवेल. तुम्हांला राजकारणाची फारशी गोडी नाहीं. म्हणून तुम्हीं कांहीं न विचारणेंच श्रेयस्कर ठरेल. त्यामुळें आपणा दोघांसही धोका आहे. तुम्हांला तें सांगण्याची मला भीति वाटते. कदाचित् अजाणतां तुम्हीं तें रहस्य फोडलें तर....?"

" मी तें फोडणार नाहीं. " जीवनलाल स्वतःची हमी देत म्हणाला, " त्यासाठीं मला कितीही कष्ट सहन करावे लागले, तुरुंगांत जावें लागलें, तरी मी गौप्य-स्फोट करणार नाहीं. "

"बोसबाबू माझ्या घरीं रहात आहेत; तुम्हांला दिसलेला माणूस हा त्यांचा एक सहकारी आहे." नाइलाजानें शेवटीं तें सत्य मीं जीवनलालला सांगितलें.

बोसबाबूंचें नांव ऐकल्याबरोबर जीवनलाल थक्कच झाला. त्याला तें खरें वाटेना. स्वतःच्या कानांवरही त्याचा विश्वास बसेना.

" तें कसें शक्य आहे ? " त्यानें विचारलें. मीं त्याला थोडक्यांत सर्व हकिकत सांगितली. सर्व हकिकत सांगून झाल्यानंतर तो म्हणाला, " कृपा करून मला त्यांचें दर्शन घेऊं द्या. "

" मला वाटलेंच होतें. " मी म्हणालों, " एकदां ही गोष्ट तुम्हांला समजली, कीं तुम्ही दर्शनाचा आग्रह धराल ह्याची मला कल्पना होती. म्हणूनच मी तें तुम्हांला सांगण्याचें टाळीत होतों. तुम्ही तरी थोडा विचार करा. एवढा मोठा माणूस, सर्व प्रकारचा धोका पत्करून येथें आलेला. अशा बिकट परिस्थितींत येथें रहात असतांना त्याला वाटेल त्या माणसाची भेट कशी घेतां येईल ? मीं तुम्हांला त्यांच्या येथील वास्तव्याबद्दल सांगितलें आहे असें त्यांना समजलें तर ते माझी मुळींच गय करणार नाहींत. " माझा युक्तिवाद त्याला पटेना. त्यानें एकच हट्ट धरला, " मला बोसबाबूंचें दर्शन पाहिजे ! "

शेवटीं बोसबाबूंना विचारून काय तें सांगतों असें सांगून मीं त्याला टाळलें.

रात्रीं आम्ही बराच वेळ बोलत बसलों. गट्टीराष्ट्रांच्या सहाय्यानें जर्मनी-इटलीस जावें, कीं एम्. च्या मदतीनें रशियन सरहद्दींत प्रवेश करावा, ह्यावर आमची बराच वेळ चर्चा झाली. पूर्वी ज्या ज्या वेळीं ह्या विषयावर चर्चा झाली त्या त्या वेळीं ' मास्कोखेरीज इतरत्र जाण्याची माझी तयारी नाहीं ' असें बोसबाबू म्हणत असत. परंतु आजच्या चर्चेंत त्यांच्या त्या वृत्तींत थोडा बदल झाल्याचें दिसून आलें. बराच वेळ भवति न भवति झाली. शेवटीं मूळ प्रश्न अनिर्णितच राहिला.

दुसरे दिवशीं सकाळीं रहमतखानबरोबर बोसबाबू फोटो काढण्यासाठीं गेले. दुपारीं दोन वाजतां ते माझ्या दुकानीं आले. त्याच दिवशीं सायंकाळीं ४-३० वाजतां हाजीसाहेबांनीं त्यांना चहासाठीं बोलावलें होतें. दोनअडीच तासांचा अवकाश होता. एवढ्या वेळांत बाजारांत फेरफटका करून साडेचारला हाजीसाहेबांच्या घरीं जावें असें मीं त्यांना सुचविलें. मीही ठरलेल्या वेळीं शक्यतर हाजीसाहेबांच्या घरीं येईन असें सांगितलें.

दोघेही त्याप्रमाणें बाहेर पडले. साडेचार वाजतां मी हाजींच्या घरीं गेलों. त्यावेळीं बोसबाबू जर्मन भाषेंत हाजी साहेबांच्या पत्नीशीं चर्चा करीत होते. आम्ही सर्वांनीं चहा घेतला व घरीं परतलों.

११

# काबुलांत शेवटची रात्र

दुसरे दिवशीं रात्रीं आम्हीं पुन्हा त्याच प्रश्नावर चर्चा केली. एम. बरोबर जावें असा मीं व रहमतखान ह्यांनीं सल्ला दिला.

रहमतखान म्हणाला, "रशियन सरहद्दीपर्यंतचा प्रवास अत्यंत त्रासाचा आहे. त्यांत नाना संकटांशीं सामना द्यावा लागेल ह्यांत संदेह नाहीं. कदाचित बरेच दिवस तुम्हांला रशियन तुरुंगांतही रहावें लागेल. पण तुम्हांला मास्कोला केव्हां तरी जातां येईल. तुम्ही रशियन तुरुंगांत आहांत हें वरिष्ठ अधिकाऱ्यांना समजलें तर ते तुम्हांला मॉस्कोला बोलावतील. परंतु एकदां तुम्ही गट्टी राष्ट्रांच्या हातीं लागलां म्हणजे अशा आणीबाणीच्या प्रसंगीं ते तुम्हांला मास्कोला जाऊं देतील असें मला वाटत नाहीं."

"इटालियन वकिलातीकडून कालचा निरोप आला नसता तर मी एम्.बरोबर खास गेलों असतों." बोसबाबू उतरले, "परंतु आतां त्यांनीं माझ्या प्रवासाची सर्व तयारी केली आहे. अशा वेळीं त्यांची निराशा करणें बरोबर नाहीं. शिवाय एम्. बरोबरचा प्रवास निश्चितपणें धोक्याचा आहे. रशियन सरहद्दींत जाण्यापूर्वींही मला अटक होण्याचा संभव आहे. उलट गट्टीराष्ट्रें सुरक्षित प्रवासाची सोय तरी करतील. त्यासाठीं आणखी दहा दिवस येथें थांबावें लागलें तरी काय हरकत आहे? गट्टी राष्ट्रें मला मास्कोला जाऊं देणार नाहींत अशी तुमची खात्री झाल्यासारखी दिसते. परंतु तुमचा हा समज चुकीचा आहे. मला निश्चितपणें मास्कोलाच जावयाचें आहे. परंतु येथून जाण्यापेक्षां रोम किंवा बर्लिनहून जाणें बरें असें मला वाटतें. आणखीही एक गोष्ट विचारांत घेण्यासारखी आहे. येथील रशियन वकिलानें मला मदत करण्यास नकार दिला. रशियांतून मला जाऊं देण्याचें रशियन सरकारनेंही नाकारलें आहे. त्यांना माझी गरज नसणें किंवा रशियांत माझें रहाणें त्यांच्या पसंतीस न उतरणेंही संभवनीय आहे. बर्लिन किंवा रोम येथील रशियन वकिलातीकडे मी ह्यां बाबतींत चौकशी करीन. त्यांनी मला रशियास जाऊं दिलें नाहीं तर मात्र गट्टी राष्ट्रांच्या प्रदेशांत मला रहावें लागेल."

रहमतखानचेंही तेंच मत पडलें. "रशियाला तुमची गरज वाटत नसेल तर तुम्ही रशियांत कसे जाणार?" त्यानें सरळच प्रश्न केला.

शेवटीं साधकबाधक चर्चेनंतर रोम किंवा बर्लिनलाच जावें असें ठरलें. हा निर्णय घेतल्यानंतर पूर्वीच्या योजनेबाबत निरवानिरव करणें आवश्यक होतें. म्हणून रहमतखाननें एम्. ची मुळींच भेट घेऊं नये असें मीं सुचविलें. त्याचप्रमाणें एम्.ला संशय येऊं नये म्हणून रशियाला जाणारा दोस्त एकाएकीं आजारी पडल्यामुळें रहमतखान त्याच्या शुश्रूषेसाठीं परत गेला आहे असें मीं एम्. ला सांगण्याचें ठरविलें. बोसबाबूंनींही त्यास संमति दिली.

दुसरे दिवशीं सकाळीं ११ वाजतां सिनोरा कॅरोनी माझ्या दुकानीं आली. पाठोपाठ जीवनलालही आला. तिनें मला एक पत्र दिलें व फोटो उत्तम निघाले आहेत असेंही सांगितलें. आतापर्यंत मीं सिनोरा कॅरोनीविषयीं जीवनलालला कांहींच सांगितलें नव्हतें. आतां मात्र तिच्यासंबंधीं सर्व कांही त्याला सांगावें लागलें. इटालियन वकिलाच्या पत्रांत पुढील मजकूर होता:—"आपला परवाना तयार आहे. ३।४ दिवसांत दूत येथें येऊन पोहोंचतील. आपण निघण्याच्या तयारींत रहा."

बोसबाबूंच्या दर्शनासाठीं जीवनलालचा आग्रह सारखा चालू होता. मला निरुपायानें संमति द्यावी लागली. तो फारच खूष झाला. त्यानें बोसबाबूंना नजर करण्यासाठीं कांहीं फळें घेतलीं व माझ्याबरोबर तो घरीं आला. त्यानें बोसबाबूंचें दर्शन घेतलें. इकडच्या तिकडच्या अर्धवट गप्पा मारल्या व आपण अव्यवस्थित व मूर्ख असल्याची बोसबाबूंची खात्री करून दिली.

ह्या घटनेनंतर मात्र जीवनलालनें आमचा पिच्छाच सोडला नाहीं. तो सारखा आमच्या पाठीशीं राही; प्रत्येक गोष्ट जाणून घेण्याचा आग्रह धरी. पण, एकादें काम सांगितलें म्हणजे मात्र टाळाटाळ करण्याचा प्रयत्न करी. बाजारांत रहमतखानबरोबर जाण्यास तो भीत असे. बोसबाबूंच्या बरोबर बाहेर पडावयाचें झालें तर त्याच्या उरांत धडकी भरे. सिनोरा कॅरोनी दुकानीं आली असतांना मात्र तो लांब लांब बाता मारी. आपण बोसबाबूंच्या सहकाऱ्यांपैकींच आहोंत असें तिला भासविण्याचा तो प्रयत्न करी.

[ अफगाण सरकारनें मला अटक करून हद्दपार केल्यानंतर काबूलच्या लोकांनीं जीवनलालला चांगलीच दहशत बसविली. तो माझा स्नेही असल्यामुळें त्यालाही हद्दपार करण्यांत येईल असें लोकांनीं सांगितलें व काबूल सोडून पसार होण्याचा सल्लाही दिला. मी हिंदुस्थानांत आल्यानंतर आठच दिवसांनीं तो हिंदुस्थानांत आला. पोलिसांनीं त्याला गिरफदार केलें व तुरुंगांत डांबून ठेवलें. ]

बोसबाबूंना दोन सूट शिवावयाचे होते. मीं निरनिराळ्या तऱ्हेचें कापड घरीं आणलें. त्यापैकीं बोसबाबूंनीं दोन प्रकारचें कापड पसंत केलें. हाजीसाहेबांच्या ओळखीचा एक शिंपी होता. तो त्यांचे सर्व कपडे शिवीत असे. हाजीसाहेब म्हणाले, ‘ बोसबाबूंना आमच्याकडे पाठवा. मी त्या शिंप्याला घरीं बोलावून घेईन. तो त्यांचें माप घेईल व

बोसबाबू जाण्यापूर्वी त्यांचे सर्व कपडे शिवून देईल.' बोसबाबूंनाही ही सूचना पसंत पडली.

दुसरे दिवशीं बोसबाबू माझ्याबरोबरच घराबाहेर पडले. दुपारीं एक वाजेपर्यंत ते बाजारांतच भटकले. नंतर हाजीसाहेबांच्या घरीं कपडे घेतण्यासाठीं ते गेले. हाजीसाहेबांच्या शिंप्यानें त्यांचें माप घेतलें व कपडेही पण वेळेवर शिवून दिले. एक जाकीट राहिलें होतें तें पुढें हाजीसाहेबांच्या पत्नीनें जर्मनींतील आपल्या बहिणीकडे पार्सलनें पाठवून दिलें आणि तिनें तें बोसबाबूंना दिलें. पुढच्या दोन दिवसांत प्रवासास लागणारें सर्व सामान आम्हीं खरेदी केलें.

दुसरे दिवशीं रहमतखाननें बोसबाबूंचें एक पत्र इटालियन वकिलास नेऊन दिलें. त्यानंतर लगेच इटालियन वकील व त्याची पत्नी दोघेंही माझ्या दुकानीं आलीं. सिनोरा कॅरोनीनें मला एक लखोटा दिला. "बोसबाबूंसाठीं हा शेवटचा लखोटा." हसत हसत तिनें मला बजावलें !

"बोसबाबूंचें सर्व सामान एका सूट केसमध्यें भरून दुकानावर पाठवून द्यावें. ता. १६ मार्च रोजीं दुपारीं एक माणूस येईल तो तें सर्व सामान घेऊन जाईल. बोसबाबूंनीं इटालियन वकिलातींतील सिनोर कॅरोशनी ह्यांच्या घरीं उत्तमचंदासह ता. १७ मार्च रोजीं रात्रीं ८ वाजतां यावें. तेथें त्यांना खाना देण्यांत येईल व पुढची सर्व माहितीही सांगण्यांत येईल. ता. १८ मार्च रोजीं त्यांना येथून निघावयाचें आहे." असा त्या लखोट्याचा संदेश होता.

हा संदेश आला त्यावेळीं बोसबाबू हाजीसाहेबांच्या घरीं होते. मी तेथें गेलों. "मला बक्षीस म्हणून कांहीं तरी खाण्यास द्या म्हणजे मी तुम्हांला एक चांगली बातमी सांगतों." मी बोसबाबूंना म्हणालों. "माझ्या जवळ दुसरें कांहीं खाण्यास देण्यासारखें नाहीं. हा केकचा तुकडा घ्या." बोसबाबूंनीं माझ्या हातावर केकचा तुकडा ठेवीत उत्तर दिलें. "तुमचें येथील खडतर जीवन संपुष्टांत आलें आहे." असें म्हणत मी तो लखोटा त्यांच्या हवालीं केला. त्यांनीं तो वाचला. त्यांना फारच आनंद झाला. मीं जी कांहीं अल्प स्वल्प सेवा केली त्याबद्दल त्यांनीं माझा फारच गौरव केला.

"जाणून किंवा अजाणता माझ्या हातून कांहीं अपराध घडला असेल, कांहीं चूका झाल्या असतील, आपणांस त्रास झाला असेल तर त्याबद्दल मला क्षमा करा" बोसबाबूंच्या चरणांवर स्पर्श करीत मी म्हणालों.

माझें उत्तर ऐकून बोसबाबू मनमोकळेपणानें हसले. "मी तुमच्या छोट्या मुलीवर फार रागावलों आहें." ते म्हणाले, "मी जेव्हां जेव्हां जेवीत असें त्या त्या वेळीं ती माझ्या पानांत पोळ्यांचा ढीग करीत असे. मला दोनच पोळ्यांची भूक असतांना पांच पोळ्या खाव्या लागत असत."

सायंकाळीं आम्ही बराच वेळपर्यंत हाजीसाहेबांच्या घरीं बोलत बसलों होतों. निघतेवेळीं हाजीसाहेबांनीं ता. १७ मार्च रोजीं दुपारीं बोसबाबूंना जेवणाचें निमंत्रण दिलें व

दुपारचा चहा होईपर्यंत तेथेंच राहाण्याची विनंती केली. बोसबाबूंनीं तें मान्य केलें.

ता. १६ मार्च रोजीं आम्हीं बोसबाबूंचें सर्व सामान एका सूटकेसमध्यें भरलें. मी तें माझ्याबरोबरच दुकानांत आणलें. सिनोर कॅरोनीचा व्यवस्थित पत्ता शेवटच्या लखोट्यांत असल्यामुळें आम्हांला तें घर धुंडण्यास फारसा वेळ लागला नाहीं.

त्या आठवड्यांत दोन वेळां एम्. माझ्याकडे आला. त्यानें माझ्या मित्राची चौकशी केली. मीं प्रथम तो आजारी असल्यामुळें आला नसल्याचें सांगितलें. एम्. दुसऱ्यांदा आला तेव्हां मात्र मीं त्याला प्रवासाची योजना रद्द करण्यांत आली आहे असें सांगितलें. मी म्हणालों, “मीं तुम्हांला रु. ४०० दिले आहेत. त्यांतून तुम्ही तुमच्या मित्राच्या भेटीसाठीं लुंगी व चप्पल खरेदी केली. आतां राहिलेले पैसे मला परत द्या.” पैसे परत मिळणार नाहींत ह्याची मला खात्री होती. पण त्याच वेळीं मला एक जुनी म्हण आठवली, ‘मैत्री तोडायची असेल तर मित्राला पैसे उसनवार द्या.’ मला एम्. ची मैत्री तोडावयाची होती, म्हणूनच मीं पैसे परत मागितले.

दुपारीं बरोबर दोन वाजतां सिनोर कॅरोनी दुकानावर आली. तिनें बोसबाबूंच्या सूटकेसची चौकशी केली. मीं ती सूटकेस तिच्या मोटारींत ठेवल्यानंतर ती निघून गेली.

ती रात्र....माझ्या झोपडींत बोसबाबूंची ती शेवटची रात्र होती !

१२

# बर्लिनला प्रयाण

दुसर दिवशीं सकाळीं बोसबाबूंनीं न्याहारी केली. मुलांचे पापे घेऊन त्यांचा निरोप घेतला व बरोबर अकरा वाजतां ते घराबाहेर पडले. राहिलेला सारा दिवस त्यांनीं हाजीसाहेबांच्या घरीं घालविला. हाजीसाहेबांच्या घरून सिनोरा कॅरोशनीच्या घरीं जात असतांना बोसबाबूंनीं स्वत:ची हॅट मला देऊन माझी टोपी घातली. हॅटमुळें उगीचच लोकांचें लक्ष वेधेल असें त्यांना वाटलें. सिनोरा कॅरोशनीच्या घरीं मीं त्यांना पोचतें केलें व त्यांचा निरोप घेतला. "अगदीं जपून वागा. बर्लिनला पोचल्याबरोबर मी तुम्हांला कळवीन." बोसबाबूंनीं मला केलेला तो शेवटचाच उपदेश !

ता. १८ मार्च रोजीं सकाळीं दहा वाजतां रहमतखान माझ्या दुकानीं आला. बोसबाबू रात्रीं ९ वाजतां रवाना

झाल्याचें त्यानें मला सांगितलें. त्यांच्याबरोबर दोन जर्मन व एक इटालियन इसम देण्यांत आला होता. इटालियनांनीं दिलेल्या पासपोर्टांत कॅरॅटाइन असें बोसबाबूंचें नांव नमूद करण्यांत आलें होतें.

त्यांच्या बरोबर गेलेल्या दोन जर्मन इसमांपैकीं डॉ. वेल्लर हा एक होता. तो फारच धूर्त होता असें हाजीसाहेबांकडून मला समजलें. बोसबाबूंना इटालियनांनीं आपल्या ताब्यांत घेऊं नये म्हणून जर्मन सरकारनें त्याची नेमणूक केली असावी.

जर्मनी आणि इटली दोस्त असले तरी उभय राष्ट्रांचे नागरिक परस्परांचा द्वेष करीत. बोसबाबू काबुलांतून गेल्या-नंतर तेथें असलेल्या जर्मनांनीं, इटालियन वकिलातीशीं संबंध न ठेवतां प्रत्यक्ष आमच्याशीं संबंध ठेवा असें आम्हांला बजावलें. इतकेंच नव्हे तर इटालियन लोकांस त्यांनीं कांहींही गंधवार्ता लागूं दिली नाहीं.

डॉ. वेल्लरनें बोसबाबूंना सरळ बार्लिनला नेलें! सर्वजण आपापल्या सामानासह मोटारींत बसून रशियन सरहद्दीपर्यंत गेले असें सिनोरा कॅरोनीनें मला नंतर सांगितलें. काबूल आणि रशियन सरहद्दीच्या मध्यावर असलेल्या पुल्खुमारी गांवीं ते त्या रात्रीं राहिले. दुसर दिवशीं सकाळीं त्यांनीं रशियन सरहद्दींत प्रवेश केला. ता. २० मार्च रोजीं बोसबाबू रेल्वेनें मास्कोला गेले. त्याच दिवशीं रहमतखानही हिंदुस्थानकडे रवाना झाला.

थोड्याच दिवसांनंतर काबूल येथील जर्मन वकिलातीकडे एक नियतकालिक आलें. बोसबाबूंच्या बर्लिन येथील आगमनाची वार्ता त्यांत होती. जर्मन वकिलातीनें तें नियतकालिक हाजीसाहेबांमार्फत माझ्याकडे पाठवून दिलें. एका पानावर बोसबाबूंच्या चित्राखालीं त्यांच्या आगमनाची बातमी देण्यांत आली होती. हाजीसाहेबांच्या पत्नीनें त्या बातमीचें भाषांतर केलें. तिचा आशय पुढीलप्रमाणें होता:— " कांहीं दिवसापूर्वी हिंदुस्थानांतून आकस्मिकरीत्या अंतर्धान पावलेले हिंदुस्थानचे महान् नेते आणि हिंदी राष्ट्रीयसभेचे माजी अध्यक्ष श्री. सुभाषचंद्र बोस ता. २८ मार्च रोजीं बर्लिन येथें सुखरूप येऊन पोचले."

कांहीं दिवसांनंतर सिनोरा कॅरोनी माझ्या दुकानीं आली. " बोसबाबू रशियन सरहद्दीपर्यंत मोटारींनें गेले. तेथून रेल्वेनें ते मास्कोला गेले. तेथें त्यांच्यासाठीं एक विमान सज्ज ठेवण्यांत आलें होतें. त्या विमानानें ते सरळ बर्लिनला गेले. ते रोमला अद्याप गेलेले नाहींत परंतु लवकरच जातील अशी अपेक्षा आहे. " असें तिनें मला सांगितलें.

बोसबाबू काबूलहून गेल्यानंतर थोड्याच दिवसांनीं एक इसम मला बाजारांत भेटला. तो ब्रिटिश गुप्तहेर खात्यांतला माणूस होता. माझी भेट होतांच तो म्हणाला, " माझें तुमच्याशीं कांहीं निकडीचें काम आहे. मी तुमच्याच दुकानाकडे निघालों होतों. तुम्ही रस्त्यांतच भेटलां हें बरेंच झालें ! "

मला थोडासा धक्का बसला आणि आश्चर्यही वाटलें. सरकारी दरबारीं वावरणारा हा माणूस, ह्याचें माझ्याशीं काय काम असणार ?

"काय हो, काय काम आहे बशीसाहेब? तुमच्यासाठीं मला काय बरें करतां येईल?" मीं विचारलें.

"काम म्हणाल तर निकडीचें आहे, म्हणाल तर फारसें महत्त्वाचें नाहीं. परंतु तें तुमच्याशिवाय दुसरें कोणीही करूं शकणार नाहीं हेंही तितकेंच खरें आहे." बशीसाहेबांनीं उत्तर दिलें.

ह्या उत्तरानें मी जास्तच गोंधळलों !

"मीं दोघां हिंदी इसमांना तें काम करण्यास सांगितलें, पण, त्यांच्यानें तें झालें नाहीं. त्यांनींच मला तुमचें नांव सुचविलें" बशीसाहेब म्हणाले. "हे हिंदी इसम आहेत तरी कोण? आणि तुमचें काम तरी काय आहे?" मीं विचारलें.

"नांवाची जास्त चिकित्सा करण्याचें कारण नाहीं. काम मात्र असें आहे, कीं" बशीसाहेबानीं सांगण्यास सुरुवात केली, "जर्मनींतील अफगाण वकील खान अल्ला नवाजखान हे तुमच्या माहितीचे आहेतच. ते माझे मित्र आहेत. ते दर सोमवारीं राजेसाहेबांशीं बर्लिनहून टेलिफोन-वरून बोलतात हेंही तुम्हांला निदान ऐकून माहीत असेलच."

“ खान अल्लानवाजखान हे जर्मनींतील अफगाण वकील आहेत हें मला माहीत आहे. पण ते बर्लिनहून टेलिफोनवरून बोलतात हें मला कसं समजणार? मी तें आज प्रथमच ऐकतों आहे. ” मीं उत्तर दिलें.

“ तुम्हांला तें माहीत नसेल. पण, काबुलांतील इतर सर्वांना तें माहीत आहे. ” बशीसाहेब म्हणाले, “ बरें तें जाऊं द्या. ह्या सोमवारीं अल्लानवाजखान माझ्याशींही टेलिफोनवरून बोलले. त्यांनीं मला असें सांगितलें आहे, कीं हिंदुस्थानांतून फरार झालेले दोन हिंदु काबूलला आले असून ते हिंदुगुजर मध्यें असलेल्या एका हिंदूच्या घरीं रहात आहेत. त्यांना जर्मनीला पाठविण्यासाठीं येथील जर्मन वकिलातीचे लोक आटोकाट प्रयत्न करीत आहेत असेंही मला समजलें आहे. ते कोठें रहात आहेत तें तुम्ही शोधून काढा आणि येत्या सोमवारपर्यंत मला कळवा. ”

“ फरारी हिंदूंची नांवें तुम्हांला अफगाण वकिलानें सांगितलीं नाहींत काय? ” मीं प्रश्न केला.

“ नांवें सांगितलीं आहेत आणि मीं तीं टिपूनही घेतलीं आहेत. एकाचें नांव कांहीं तरी....चंद्रबोस असें एक नांव आहे. ”

“ सुभाषचंद्र बोस तर नव्हे?” मीं विचारलें.

“ होय, होय, तेंच तें नांव. ”

" हिंदुस्थानचे ते एक महान् नेते आहेत." मी म्हणालों, " ते बंगाल प्रांताचे रहिवाशी आहेत. सुमारें दोन महिन्यांपूर्वी गूढ रीतीनें ते आपल्या रहात्या घरांतून नाहींसे झाले आहेत. पण ह्यांत कांहीं तरी, कुठें तरी, तुमच्या समजुतीचा घोटाळा झाला असला पाहिजे. नाहींतर एक बंगाली गृहस्थ, हिंदुस्थानचा एवढा मोठा पुढारी, हिंदुस्थानांतून फरार होऊन ह्या देशाची भाषा अवगत नसतांनाही येथें येणें कसें शक्य आहे? तुमच्याशीं टेलिफोनहून बोलणारा माणूस दारूच्या नशेंत असला पाहिजे."

" तें कांहीं मला माहीत नाहीं. पण अफगाण वकिलानें मला टेलिफोनवरून जें सांगितलें तें मी तुम्हांला सांगत आहें. तुम्ही शक्य तों प्रयत्न करून मला ह्याबाबत अधिक माहिती दिली तर मी तुमचा आभारी राहीन." बशीसाहेब म्हणाले.

" पण, बशीसाहेब," मी म्हणालों, " ह्या गोष्टीवर विश्वास ठेवण्यास माझी सद्सद्विवेक बुद्धि साफ इन्कार करीत आहे. आणि त्या बरोबरच हे दोन फरारी इसम ज्यांच्या घरीं राहिले आहेत त्यांचें नांवही तुम्हीं मला सांगितलें नाहीं. तो अफगाणिस्तानचा रहिवाशी आहे कीं परराष्ट्राचा? अल्ला-नवाजखानला इतक्यां दूर अंतरावरून इतक्या गोष्टी समजल्या तर त्यांना ते कोठें राहातात हेंही समजायला पाहिजे नाहीं का?" बशीसाहेब म्हणाले, " त्यांनीं मला नांव मात्र

सांगितलें नाहीं. परंतु ते हिंदु गुजरमध्यें रहात असतील तर त्यांचें नांव समजणें फारसें अवघड जाईल असें मला वाटत नाहीं."

मी उत्तरलों, "मी ह्या देशाचा रहिवाशी नाहीं. तुम्हांला माहीतच आहे. मी सकाळीं दुकानावर जातों व तेथून संध्याकाळीं घरीं जातों. माझ्या धंद्याशिवाय काबुलांतील इतर कोणत्याही गोष्टीची मला माहिती नाहीं. असें असतांना मी ह्या लोकांचा ठावठिकाणा कसा शोधून काढूं शकेन? शिवाय ह्या सर्व राजकारणाच्या भानगडी आहेत आणि मी राजकारणापासून नेहमींच अलिप्त असतों. तुम्ही एखाद्या काबुली माणसावर ही कामगिरी सोपवा. तो तुम्हांला सही सही पत्ता देऊं शकेल. पण एक गोष्ट मात्र तुम्हीं करावी अशी माझी विनंती आहे. सुभाषचंद्र बोस कोठें आहेत हें जर तुम्हांला कळलें तर मला सांगा. मला त्यांचें दर्शन घ्यावयाचें आहे."

बशीसाहेब पुन्हा म्हणाले, "तुम्हांला हें काम करतां आलें नाहीं तर काबुलांत दुसऱ्या कोणासही तें करतां येणार नाहीं. निदान मला दुसरा लायक इसम दिसत नाहीं. तुम्हांला त्यांच्या दर्शन हवें आहे पण ते आहेत कोठें हेंच मात्र अद्याप मला समजलें नाहीं."

बशीसाहेब बोलत असतांनाच मला त्यांच्या मूळ हेतूची कल्पना आली. त्यांनीं मुद्दाम अफगाण वकिलाची गोष्ट

बनवून माझा थांग घेण्याचा प्रयत्न केला हें मी समजलों. पण गुपित फुटलें कसें ? जर्मन वकिलातींतून तें फुटणें अशक्य होतें. कारण, इतक्या नालायक इसमांचा भरणा तेथें नव्हता. ह्या प्रकरणाचा सुगावा त्यांना दुसऱ्या कोणत्या तरी ठिकाणाहून लागला असावा. बोसबाबू काबूलहून पसार झाल्यानंतर हिंदुस्थान सरकार जागें झालें ह्याबद्दल मला त्यांतल्या त्यांत समाधान वाटूं लागलें. ह्या समाधानांतच ' हें काम माझ्यानें होणार नाहीं ' हें बशीसाहेबास सांगून मी दुकानावर गेलों.

दुसरे दिवशीं सकाळीं बशीसाहेब पुन्हा बाजारांत भेटले. त्यांनीं बोसबाबूंबरोबर असलेल्या दुसऱ्या इसमाचें नांव सांगितलें. त्यांना खऱ्या माणसाचा पत्ता लागला नसेल ह्या समजुतींत मी होतों, परंतु त्यांनीं खरें नांव सांगितलें तेव्हां मात्र माझ्या तोंडचें पाणी पळालें. तरी ताबडतोब स्वतःस सावरून मी म्हणालों, " ठीक आहे. मी प्रयत्न करीन. मला पत्ता लागलाच तर मी तुम्हांला कळवीन. पण, एक गोष्ट करा. पुन्हा अल्लानवाजखानशीं बोलण्याचा प्रसंग आला तर बोसबाबू ज्या माणसाच्या घरीं रहात आहेत त्याचें नांव विचारून घ्या. "

बशीसाहेबांच्या ह्या भेटीनंतर मात्र मनांत शंकाकुशंकांचें काहूर माजलें! मनाला वाटे, जर्मन वकिलातींतूनच हा गौप्यस्फोट तर झाला नसेल ? पुन्हा वाटे, तसें झालें असतें तर बोसबाबू कुठें राहातात हें ताबडतोब उघडकीस आलें

असतें. रहमतखानचें नांव पोलिसांनीं अंदाजानें घेतलें नसेल कशावरून ? बोसबाबू अंतर्धान पावल्यानंतर त्यांना आसरा देण्याच्या संशयावरून हिंदी पोलिसांनीं अनेक ठिकाणीं झडती घेतली असेल. ह्या झडतीसत्रांत रहमतखानच्या घराचा नंबर लागला असेल आणि रहमतखान फरारी आहे हें निदर्शनास आल्यानंतर बोसबाबू आणि रहमतखान ह्यांचा पोलिसांनीं संबंध जोडणें अशक्य नव्हतें !

कांहीं दिवसानंतर सिनोरा कॅरोनी माझ्या दुकानीवर आली. तिच्याबरोबर एक जर्मन गृहस्थ होता. जर्मन वकिलातींतील एक जबाबदार इसम म्हणून तिनें त्याची ओळख करून दिली. जर्मन वकिलातीनें रहस्य-स्फोट केला अशी मीं त्याचेजवळ तक्रार केली. त्यानंतर अल्लानवाजखानची बशीसाहेबांनीं सांगितलेली गोष्टही त्याला सांगितली. ही गोष्ट ऐकतांच दोघेही मनमोकळेपणानें हसले. तो जर्मन इसम म्हणाला, " आमच्या वकिलातींतून अशा प्रकारें रहस्य-स्फोट होणें अशक्य आहे; आणि अफगाण वकिलाला ह्याचा सुगावा लागणें तर अगदींच अशक्य आहे !

सिनोरा कॅरोनी म्हणाली, " पेशावर पोलिसांनीं रहमतखानचा शोध केला असेल व त्याचा पत्ता न लागल्यामुळें बोसबाबूंच्या अंतर्धानाचा व त्याचा संबंध जोडून देण्यांत आला असेल."

" मलाही तसेंच वाटतें." मी म्हणालों, " परंतु ह्या मूर्खांची तरी काय कमाल आहे ! शहरांतील सर्व लोक सोडून देऊन ते मलाच ह्या बाबतींत विचारतात."

तीं दोघेही हसलीं आणि निघून गेलीं.

काबुलाहून बोसबाबू गेल्यानंतर तीन महिन्यांनीं हाजी-साहेबांच्या पत्नीला बोसबाबूंनीं जर्मन भाषेंत लिहिलेलें एक पत्र आलें. ह्या पत्रांत तिच्या बहिणी संबंधानेंच जास्त उल्लेख होता. जाकीट पोचल्याचेंही त्यांनीं लिहिलें होतें. माझ्या संबंधीं दोनच ओळी होत्या., हाजीसाहेबांच्या पत्नीनें त्यांचें भाषांतर करून मला सांगितलें. त्या ओळींचा आशय असा:—

उत्तमचंद—नमस्ते, आपण माझ्यासाठीं जें कांहीं केलें त्याबद्दल मी आपला ऋणी आहें. साऱ्या आयुष्यभर मला त्याचा विसर पडणार नाहीं.—झियाउद्दीन. ”

जयहिंद

मराठी ग्रंथ संग्रहालय
ग्रं. क्र. १९२३६
(स्थळ. प्रत)
REFBK-0019236